सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शुक्रवार, ३० मे २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक २०१ | पाने १२ | किंमत रु. ६/-

| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |

ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com


एलिमिनेटर

मुंबई इंडियन्स वि. गुजरात टायटन्स

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : मुल्लानपूर, चंदीगढ

## विचारपुष्प



नि आपल्या सर्वांच्या मनात सामाजिक विषमता नष्ट करण्याचे ध्येय अवश्य असले पाहिजे. विषमतेमुळे आपला समाज कसा दुर्बल झाला आणि त्याचे कसे विघटन झाले, हे आपण लोकांसमोर दृढतेने आणले पाहिजे. विषमता नष्ट करण्याचे उपाय सांगितले पाहिजेत आणि प्रत्येक व्यक्तीने या प्रयत्नात योगदान द्यायला हवे.

**- बाळासाहेब देवरस**

रा. स्व. संघाचे तृतीय सरसंघचालक

### वारीतील वारकऱ्यांचा विमा व वाहनांना टोल माफी : शिंदे

**मुंबई** : आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येणार आहे, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले. आषाढी वारी निमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक झाली.

# हिंसाचार, अराजकतेमुळे पश्चिम बंगाल कलंकित

- पंतप्रधान मोदींचा ममता सरकारवर हल्लाबोल
- मुर्शिदाबाद दंगलीवेळी पोलिस मूकदर्शक

◆ **कोलकाता, २९ मे**

हिंसाचार, अराजकता आणि महिलांवर अत्याचारांची प्रकरणे हा पश्चिम बंगालला लागलेला कलंक आहे आणि हीच या प्रदेशाची ओळख बनली आहे. मुर्शिदाबाद आणि मालदा येथे झालेल्या हिंसाचारावेळी सरकारचा नाकर्तेपणा समोर आला. माता-भगिनींच्या घरांची तोडफोड होत असताना पोलिस मूकदर्शक बनले होते. सत्ताधारी पक्षाच्या आमदारांकडूनच दंगली घडवून आणल्या, असा हल्लाबोल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ममता सरकारवर केला.

पश्चिम बंगालच्या दौऱ्यावर असलेल्या मोदी यांनी गुरुवारी अलीपूरद्वार, कूचबिहार येथे १०१० कोटी रुपयांच्या शहरी गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी केली. यावेळी आयोजित कार्यक्रमात शिक्षक भरती घोटाळा आणि भ्रष्टाचाराचा उल्लेख करताना मोदी म्हणाले, सरकारचे निर्दयी स्वरूप मुर्शिदाबाद आणि मालदा येथील दंगलींमध्ये दिसून आले. सत्ताधारी पक्षाच्या लोकांनी दंगली घडवून आणल्या आणि जाळपोळ, घरांची तोडफोड केली. शालेय शिक्षकांच्या भरतीत झालेल्या कथित घोटाळ्याची दखल घेत सर्वोच्च न्यायालयाने राज्य अनुदानित शाळांमधील २५,७५३ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या अवैध ठरवल्या. घोटाळे, महिला अत्याचार, दंगली यामुळे राज्याची बदनामी होत आहे. भारताची वाटचाल विकसित राष्ट्राकडे होत असताना यात पश्चिम बंगालचा सहभाग अपेक्षित आणि आवश्यक आहे.

### ...तर पाकिस्तानवर पुन्हा हल्ला



ऑपरेशन सिंदूर अद्याप संपले नाही. देशात पुन्हा अतिरेकी हल्ला झाल्यास पाकिस्तानवर पुन्हा कारवाई केली जाईल. पाकिस्तान जेव्हापासून अस्तित्वात आला, तेव्हापासून त्यांनी फक्त दहशतवादालाच पोसले आहे. दहशतवाद आणि नरसंहार ही पाकिस्तानी सैन्याची सर्वात मोठी कौशल्ये आहेत, अशी टीका त्यांनी केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे स्वागत करताना पारंपरिक वेषभूषेतील बंगाली तरुणी

### गरिबांचे हक्क हिरावणाऱ्यांना सत्तेबाहेर काढा

पश्चिम बंगाल सध्या अनेक समस्यांनी ग्रस्त आहे. त्यात प्रामुख्याने हिंसाचार, अराजकता, महिलांची असुरक्षितता, बेरोजगारी भ्रष्टाचार आणि घोटाळ्यांचा समावेश आहे. गरिबांचे हक्क हिरावून राज्यकर्ते स्वतःचा फायदा करून घेत आहे. या सरकारने सत्तेर राहण्याचा अधिकार गमावला असून त्यांच्याकडे यापुढे सत्ता सोपवू नका. राज्यातील लोकांची देशाच्या विकासात भागीदारी हवी आहे, असे मोदी यावेळी म्हणाले.

या उद्देशाने, केंद्र सरकार येथे पायाभूत सुविधा, नवोपक्रम आणि गुंतवणुकीला सतत नवीन चालना देत आहे. ◀(वृत्तसंस्था)









सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे...



### महापालिकेच्या वतीने महाराणा प्रताप यांना अभिवादन

**सोलापूर, दि. २९ मे -**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने महाराणा प्रताप यांच्या जयंती दिनानिमित्त सात रस्ता येतील महाराणा प्रताप यांच्या पुतळ्यास तसेच कौन्सिल हॉल येथील आयुक्त यांच्या कार्यालयात महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस महापालिकेचे उपायुक्त किरणकुमार मोरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह रजपूत, विभागीय अधिकारी सतीश एकबोटे,कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओमप्रकाश वाघमारे, प्रताप मानसावाले, किसनसिंग बाबावाले, सुरेश सिताराम वाले, रणजीत सिताराम बुरानपुरे, प्रताप शिवसिंगवाले, अशोक खडके आदी मान्यवर उपस्थित होते.

### वाहनाच्या धडकेने अक्कलकोट रस्त्यांवर दोन कोल्ह्यांचा मृत्यू

**सोलापूर, दि. २९ मे -**

रस्ता ओलांडत असताना अज्ञात वाहनांच्या धडकेने अक्कलकोट रस्त्यावर दोन वेगवेगळ्या ठिकाणी दोन कोल्ह्यांचा मृत्यू झाला. ही बाब गुरुवारी सकाळी उघडकीस आली.सोलापूर ते अक्कलकोट रस्त्यावरील




वळसंग वाडा हॉटेलच्या काही अंतर अगोदर एक कोल्हा रस्त्या अपघातात दुर्दैवी मृत्युमुखी पावला. तसेच आणि थोडेच काही अंतरावर म्हणजेच कर्जाळ येथील वनविभागाच्या चेक पोस्ट च्या अगदी समोर तिथे एक अजून एक कोल्ह्याचा दुर्दैवी अपघाती मृत्यू झाला. साधारण वळसंग वाडा हॉटेल ते वनविभागाचे चेकपोस्ट ऑफिस या अंतरामध्ये दोन वेगवेगळ्या अपघातात दोन कोल्ह्यांचा दुर्दैवी अंत झाला. विकासीकरणामुळे व महामार्गाच्या वाढत्या संख्येने या वन्यजीवांचे रस्ते अपघातात मृत्युमुखी पडण्याची संख्या वाढत असल्याबद्दल वन्यजीप प्रेमींमधून नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

### सोलापूर जिल्ह्यात मनाई आदेश लागू; अप्पर जिल्हादंडाधिकारी यांचा आदेश

**सोलापूर, दि. २९ मे -**

सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात सर्वत्र शांतता, कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून १ जून ते १५ जून २०२५ या कालावधीत महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) व ३७ (३) अन्वये मनाई आदेश लागू करण्यात आलेले आहेत. अपर जिल्हादंडाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी याबाबतचे आदेश जारी केले आहेत. या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, भाले, तलवारी, भाले, सुरे, झेंडा लावलेली काठी किंवा शरीरास ईजा करण्याकरीता वापरता येईल अशी कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही ज्वालाग्राही अगर स्फोटक पदार्थ वाहून नेणे, दगड किंवा फेकावयाची उपकरणे, व्यक्ती अगर त्यांची प्रेत यात्रा, प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, सार्वजनिक घोषणा करणे, असभ्य हावभाव करणे, ग्राम्य




भाषा वापरणे, सभ्यता अगर निती विरुध्द निरनिराळ्या जाती जमातीच्या भावना दुखावल्या जातील, त्यामुळे त्यांच्यात भांडणे बखेडे निर्माण होवून शांततेस बाधा होईल, सोंगे अगर चिन्हे कोणताही जिन्नस तयार करुन त्याचा प्रसार करण्यास मनाई करण्यात येत आहे. हा आदेश अत्यावश्यक सेवा, तसेच सरकारी नोकरांना त्यांची कर्तव्ये अधिकार बजाविताना उपरनिर्दीष्ठ वस्तू हाताळाव्या लागतात आणि ज्या व्यक्तींना जिल्हादंडाधिकारी, पोलीस अधीक्षक (ग्रा.), उपविभागीय दंडाधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक, दुय्यम पोलीस निरीक्षक यांनी दिलेल्या परवानगीस लागू होणार नाहीत.

# वर्षासमोर आत्मदहनासाठी आलेल्या सोलापूरच्या युवकाची सुखरूप घरवापसी

## पोलिसांच्या तत्परतेमुळे अनर्थ टळला

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई, दि. २९ मे-**

पोलीस ठाण्यात दाखल तक्रारीबाबत पोलिसांकडून दुर्लक्ष होत असल्याच्या कारणामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा बंगल्यासमोर आत्मदहन करण्यासाठी आलेल्या सोलापुरातील एका तरुणाला पोलिसांनी तत्परतेंने ताब्यात घेऊन सुखरूपपणे सोलापूरला घरवापसी केली. अजित रामकृष्ण मैंदर्गी असे त्याचे नाव असून त्याच्याकडील बॅगेत १०० मिली लिटर पेट्रोल व लायटर मिळून आला.

बुधवारी दुपारी तो आत्मदहन करण्यासाठी एका टॅक्सीतून उतरल्याक्षणी मलबार हिल पोलिसांनी तत्परता दाखवित त्याला ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला. त्याची समजूत काढून गावी पाठविण्यात आले. अजित मैंदर्गी याने सोलापुरातील फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. मात्र त्याबाबत कार्यवाही होत नसल्याने त्याने मुख्यमंत्र्यांच्या मुंबईतील बंगल्यासमोर जाऊन आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता.त्यानुसार तो मुंबईसाठी निघाल्याची माहिती समजल्यानंतर फौजदार चावडी पोलीस ठाण्याकडून मुंबई पोलिसांना त्याबाबत माहिती देण्यात आली होती. त्यानुसार दक्षिण मुंबईचे अप्पर आयुक्त अभिनव देशमुख यांनी मलबार हिल व मुख्यमंत्र्यांचे निवासस्थान असलेल्या परिसरात साध्या वेशातील पोलीस बंदोबस्त वाढविला होता.

बुधवारी दुपारी साडेतीनच्या सुमारास अजित मैंदर्गी हा एका टॅक्सीतून उतरला. त्याला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्याकडे एका बाटलीत पेट्रोल व लायटर मिळाला. त्याच्याविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम १२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अर्जदार यांना नोटिस देऊन गावी कुटुंबीयांकडे पाठविण्यात आले.

# पोलिसातील तक्रार मागे घे म्हणून घरावर दगडफेक

## मोदी परिसरात शिवाजी नगरातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ मे -**

पोलिसात केलेली तक्रार मागे घ्या म्हणून घरावर दगडफेक केली. हा प्रकार मोदी परिसरातील शिवाजी नगरात गुरुवारी दुपारी ४.३० वाजता घडला.

झवेरिया अब्दुल हफीज शेख (वय २३, रा. शिवाजी नगर, मोदी) असे दगडफेकीत जखमी झालेल्या महिलेचे नाव आहे. यातील दगडफेक करणारे कुमार झंगडेकर व यल्लुबाई झंगडेकर व जखमी झवेरिया यांच्यात यापूर्वी तक्रार झाली होती. या तक्रारीनंतर



झवेरिया यांनी पोलिसात झंगडेकर यांच्या विरोधात तक्रार केली आहे. गुरुवारी दुपारी ४.३० वाजता ती तक्रार माघारी घे, म्हणून झंगडेकर यांच्यासह इतर इतर तीन जणांनी शेख यांच्या घरावर दडगफेक केली. यात दगड चेह-याला लागून झवेरिया या जखमी झाल्याने त्या स्वत: सायंकाळी ५.१५ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



# संजय गांधी निराधार योजनेचे अनुदान तात्काळ जमा करा

## संभाजी ब्रिगेडची निवेदनाद्वारे मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ मे -**

शहरातील विविध भागात राहत असलेले वयोवृद्ध निराधार विधवा दिव्यांग लाभार्थी हे संजय गांधी निराधार अनुदान न मिळाल्याने या योजने पासून गेल्या चार-पाच महिन्यापासून वंचित असून त्यांना तात्काळ अनुदान देण्यात यावे या मागणीचे निवेदन यांना संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आले.

केंद्र सरकार व राज्य शासन यांच्या वतीने संजय गांधी निराधार योजना राबविण्यात येते याचा फायदा वृद्ध निराधार दिव्यांग विधवा बेघर यांना होत असतो पण गेल्या चार-पाच महिन्यापासून अनुदान न मिळाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून उदरनिर्वाह व औषधांचा खर्च कसा करावा या चिंतेत आहेत.

राज्य शासनाच्या वतीने लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये अनुदान देण्यात येते राज्यातील अनेक लाडक्या बहिणी ह्या सक्षम आहेत अनुदानाची खरी गरज समाजातील ज्येष्ठ नागरिक दिव्यांग विधवा निराधार लोकांना आहे त्यामुळे प्राध्यान्याने संजय गांधी निराधार योजनेतील लाभार्थ्यांना अनुदान वितरित करण्यात यावेत तसेच या योजनाचे अनुदान खुपच कमी असून या अनुदानात महिन्याला किमान ३००० अशी वाढ करण्यात यावी कारण सध्याची महागाई बघता हे अनुदान खूपच अपुरे आहे. याबाबत प्रशासनाच्या वतीने शासन दरबारी अनुदानात वाढ करण्याबाबत पत्र व्यवहार करावा अशी मागणी करण्यात आली. संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कद, जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महिला आघाडीचे जिल्हाध्यक्ष मीनल दास, शहराध्यक्ष शिरीष जगदाळे, जिल्हा संपर्कप्रमुख छत्रगुण माने, शहर उपाध्यक्ष सिद्धाराम सवय, शहर संघटक शेखर कंटेकर, जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप निंबाळकर, लखन पारसे, दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष सुनीता घंटे आदी उपस्थित होते.

# आता गृहनिर्माण संस्थांमध्ये चार्जिंग सुविधा बंधनकारक



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

वाहनांमधून बाहेर पडणाऱ्या धुरामुळे वायुप्रदूषणात मोठ्या प्रमाणावर भर पडत आहे. राज्य सरकारने पर्यावरणाचे संवर्धन करण्यासाठी, विद्युत वाहनांचे उत्पादन व वापराला चालना देण्यासाठी महाराष्ट्र विद्युत वाहन धोरण २०२५ आखले आहे. या धोरणानुसार, भविष्यातील निवासी, व्यावसायिक गृहनिर्माण संस्थांना विद्युत वाहनांसाठी चार्जिंग सुविधा उपलब्ध करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

वाहनांमधून बाहेर पडणाऱ्या घातक विषारी वायूचे प्रमाण कमी करण्यासाठी राज्य सरकारने पर्यावरणपूरक विद्युत वाहने खरेदी करण्यास प्राधान्य दिले आहे. नागरिकांनी विजेवर चालणारी शेती उपयोगी, मालवाहतूक, प्रवासी वाहने खरेदी करण्यावर भर देण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी महाराष्ट्र विद्युत वाहन धोरण २०२५ या माध्यमातून उपाययोजना, सवलत, पथकर माफी वाहनधारकांना प्रदान केली जात आहे. राज्य सरकारने महाराष्ट्र विद्युत वाहन धोरण २०२५ आखले आहे. या विद्युत वाहन धोरणानुसार चार्जिंगची सुविधा अनिवार्य केली आहे.

विद्युत वाहने वाढल्यास प्रत्येक ठिकाणी चार्जिंग स्थानकांची आवश्यकता आहे. त्यामुळे राज्य आणि राष्ट्रीय महामार्ग, इंधन भरणा केंद्राच्या ठिकाणी, एसटी महामंडळाच्या बसथांब्यावर आणि आगारात चार्जिंग स्थानकांची निर्मिती करण्यात येणार आहे.

**धोरणात काय?**

- नवीन निवासी इमारतींची संरचना व बांधकाम करताना विद्युत वाहनांचा विचार करणे अपेक्षित.
- वाहनतळातील सर्व जागा विद्युत वाहनांसाठी चार्जिंग सुविधांनी सुसज्ज असणे आवश्यक.
- व्यावसायिक इमारतीतील वाहनतळाच्या जागेपैकी किमान ५० टक्के जागा चार्जिंगसाठी.
- भविष्यात चार्जरची उभारणी करण्यासाठी वाहनतळावर तारांची रचना करण्याची व्यवस्था गरजेची.
- सध्याच्या गृहनिर्माण सोसायट्यांच्या किमान ५० टक्के सभासदांच्या मान्यतेने विद्युत वाहनांच्या सामूहिक चार्जिंगसाठी जागा उपलब्ध करावी.
- व्यावसायिक इमारतीत २० टक्के जागेत चालू स्थितीतील चार्जिंग स्थानके आवश्यक.

# बांधकाम विभागातील लाचखोर वरिष्ठ लिपिकास अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ मे -**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर गावातील भूमिगत गटार व सिमेंट रस्ता कामाचे अडीच लाखाचे बील काढून देण्यासाठी पाच हजाराची लाच स्विकारल्याप्रकरणी सार्वजनिक बांधकाम विभागातील वरिष्ठ लिपिक शंकर काशीनाथ कवठे यास लाच लुचपत विभागाने गुन्हा दाखल करून अटक केली. याबाबत सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तक्रारदार यांनी दक्षिण सोलापूर तालुक्यातील हत्तुर येथील चर्मकार वस्ती येथे भूमिगत गटार व सिमेंट रस्त्याची कामे केली होती. केलेल्या कामाचे एकुण ४ लाख २४ हजार ७५९ रुपये बिला पैकी अडीच लाखाचे बील काढायचे होते. बील काढून देण्यासाठी वरिष्ठ लिपिक शंकर कवठे यांनी तक्रारदार यांच्याकडे साहेबांच्या नावाने पाच हजाराच्या लाचेची मागणी केली व ती स्विकारण्याची तयारी दर्शवली. त्यावरून वरिष्ठ लिपिकाच्या विरोधात सदर बझार पोलिसांत गुन्हा दाखल झाला आहे. ही कारवाई पोलिस अधिक्षक शिरीष सरदेशपांडे व अपर पोलिस अधिक्षक डॉ. शीतल जानवे-खराडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूरच्या पथकाने केली.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छळ

**सोलापूर :** चारित्र्याच्या संशयावरून पत्नीचा छळ करणाऱ्या पतीवर गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत वृषाली हर्षवर्धन पाटील (वय ३३) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन हर्षवर्धन मुकुंदराव पाटील (दोघे रा. भोकर, अजंठा बौध्द विहार, रेणापूर, जि. नांदेड) याच्याविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. विवाह झाल्यापासून २ महिन्यानंतर पती हर्षवर्धनने वृषाली हिचा शारीरीक व मानकिस छळ केला. वृषालीच्या चारित्र्याचा संशय घेऊन तु येथे राहू नको नाही तर तुला मारून टाकेन अशी धमकी देऊन मारहाण करून शारीरीक व मानसिक छळ केला. तसेच घरातून पैसे चोरून नेले म्हणून खोटे आरोप करेन, अशी धमकी दिली. हवालदार गायकवाड पुढील तपास करीत आहेत.


# पनाश : ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है...

## नियमांची पायमल्ली अन् नैतिक मूल्यांचे अध:पतन !

सोलापूर शहरातील सर्वाधिक उंच मानल्या जाणाऱ्या विजापूर रोडवरील तब्बल १७ मजली पनाश टॉवरच्या बांधकाम प्रकरणाने नवा ''आदर्श'' घडविला आहे. बांधकाम परवानग्या या जागा मालकाशिवाय इतर मयत व्यक्तीच्या नावाने देण्यात आल्या आहेत. पिक्चर, सिनेमाला लाजवेल असे प्रकार या प्रकरणात घडले आहे, असे चौकशी अहवालातून स्पष्ट होते. विविध नियमांची चक्क मोडतोड आणि सोयीस्कर अर्थ काढून विविध मार्गाने या टॉवरची उंची गाठली आहे. १४ वर्ष अर्थपूर्ण प्रवास करत हे प्रकरण आता वेगळ्या वळणावर येऊन ठेपले आहे. टॉवर उभारताना प्रशासकीय कारभारात नियमांची पायमल्ली आणि नैतिक मूल्यांची घसरण झाल्याचे प्रकर्षाने निदर्शनास आले आहे. माजी ज्येष्ठ नगरसेवक प्रभाकर जामगुंडे यांनी याप्रकरणी आवाज उठवला. हे प्रकरण उजेडात आणले. अन्यथा विविध मार्गाने हे प्रकरण रफादफा झाले असते. या प्रकरणात महत्त्वाचे म्हणजे यापूर्वीचे महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी गांभीर्याने लक्ष घातले. याप्रकरणी संबंधित विकासकाला नोटीसा बजावल्या होत्या. त्यानंतर आता महापालिकेचे विद्यमान आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी हे प्रकरण धसास लावण्यासाठी गांभीर्याने लक्ष घातले आहे.

महापालिका उपायुक्त आशिष लोकरे आणि नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर यांनी याप्रकरणी चौकशी केली. या समितीने आपला अहवाल मनपा आयुक्तांना सादर केला. त्यानंतर याप्रकरणी महापालिकेच्या आजी- माजी डझनभर अधिकारी कर्मचाऱ्यांना नोटीसा धाडल्या आहेत. महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार यांनी या नोटीसा बजावल्या आहेत. याप्रकरणी सोलापूर महापालिकेचे विद्यमान अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, तत्कालीन अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे. तत्कालीन नगर अभियंता (निवृत्त) सुभाष सावस्कर, लक्ष्मण चलवादी (निवृत्त), सध्याचे सहायक अभियंता रामचंद्र पेंटर, नागनाथ बाबर, मोहन कांबळे (निवृत्त), एस. व्ही. जाधव, श्रीकांत खानापुरे, दीपक भादुले, अब्दुल चंदरकी, झाकीर हुसेन नायकवाडी आदी आजी - माजी अधिकारी - कर्मचाऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. कनिष्ठ अभियंता ते अतिरिक्त आयुक्त यांच्यापर्यंत अधिकाऱ्यांना जबाबदार धरून या नोटीस काढल्या आहेत. पनाश प्रकरणी या नोटीसा म्हणजे ''ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है...''असेच मानले जात आहे.

पिक्चरलाही लाजवेल असे डोके चक्रावून टाकणारे हे प्रकरण असल्याचे बोलले जात आहे. याप्रकरणी दोषी आढळणाऱ्या सर्वांवर आता कारवाई अटळ मानली जात आहे. नोटीसीचा खुलासा समाधानकारक असल्यास विभागीय चौकशी होईल आणि त्यानंतर नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येईल. ज्या ज्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी हे प्रकरण



हाताळले त्यात जे चुकले, दोषी ठरतील त्यांना कारवाईच्या माध्यमातून ठोकले जाणार.. हे आता निश्चित झाले असल्याची स्थिती दिसून येते. या उंच टॉवर उभारणीमध्ये मात्र नैतिक मूल्याचे अध:पतन झाल्याचे दिसून येते. महापालिकेच्या चौकशी अहवालात अनेक धक्कादायक बाबी पुढे आल्या आहेत. त्यानुसार हे प्रकरण किती गंभीर आहे, हे स्पष्ट होते.

या प्रकरणात विकसक मंत्री चंडक डेव्हलपर्स प्रा.लि. व सोलापूर महानगरपालिका यांनी समावेशक आरक्षण अंतर्गत विकसित करण्याचे निश्चित केले होते. परंतु करारनामा करताना विविध बाबींची पूर्तता करणे आवश्यक होते. तसे केले नसल्याचे निदर्शनास येते.करारनाम्यामध्ये बाबत स्वयंस्पष्ट तरतूद असल्याचे दिसून येत नाही. समावेशक आरक्षणाच्या माध्यमातून विकसीत

करण्याबाबतच्या तरतुदींमधील या शब्द समूहाचा विकसक यांच्या दृष्टीने सोयीचा अर्थ लावून महानगरपालिकेला अपेक्षित विकसित क्षेत्र कमी निश्चित करण्यात आले. अतिशय गंभीर बाब आहे.

यामध्ये बांधकाम परवाना देताना मालकीबाबत कागदपत्रांची पडताळणी करण्यात आली नाही. जागेची मोजणी करून बांधकाम परवानगी देणे आवश्यक असताना तशी कार्यवाही झालेली नाही. बांधकाम परवानग्या देताना भूखंडाच्या क्षेत्रात तफावत दिसून येते. भूखंडाची मोजणी न करता किंवा मोजणी नकाश्याशिवाय समावेशक आरक्षण विकसित करण्यासाठी करारनामा व त्याला अनुसरून बांधकाम परवाना देण्यात आला.

सन २०११ या वर्षात दिलेल्या दोन्ही बांधकाम परवानग्या या जागा मालकाशिवाय इतर मयत व्यक्तीच्या नावाने देण्यात आल्या असून ही बाब प्रशासकीय दृष्ट्या तत्कालीन वरिष्ठ अधिकारी यांची दिशाभूल करणारी व महापालिकेच्या हिताविरुद्ध आहे. सन २०१२ नंतर मंत्रीचंडक डेव्हलपर्स ही कंपनी गॅलोर या कंपनीने टेकओव्हर केली व मालकी हक्कांमध्ये बदल झाला. त्यामुळे मागील करार नवीन मालकांद्वारे रिफ्रेश करणे आवश्यक असते तसे केले गेले नाही.

समावेशक आरक्षण विकसित करण्याच्या अटींचे व नियमांचे पालन झालेले नसताना तसेच करारानुसार जागेचे हस्तांतरण झालेले नसतानाही सुधारित बांधकाम परवाना देण्यात आला.आरक्षण विकसित करण्याच्या करारनाम्याचा कालावधी ४० महिने असताना करारनाम्यानुसार कार्यवाही झालेली नसताना तसेच सुधारित बांधकाम परवानगी देताना विहित कालावधीत आरक्षित क्षेत्र ताब्यात मिळेल का याची दक्षता घेण्यात आलेली नाही. विशेष म्हणजे मूळ करार व वाढीव कालावधी संपल्यास झालेला करारनामा संपुष्टात आल्याची बाब वरिष्ठांच्या निदर्शनास न आणून देता सुधारित परवानगी देणे प्रशासकीय दृष्ट्या उचित ठरत नाही.

समावेशक आरक्षणाच्या अट व नियमाचे पालन न करता हस्तांतरित क्षेत्राचे हस्तांतरण करताना अपेक्षित क्षेत्राऐवजी कमी क्षेत्र ताब्यात घेतले. विकसित जागा ताब्यात घेताना आरक्षणाचा उद्देश, वापर व ताबा याच्यात विसंगती दिसून येते. मूळ करार व वाढीव कालावधी संपल्यास झालेला करारनामा संपुष्टात आल्याची बाब वरिष्ठांच्या निदर्शनास न आणून देता त्याच्या आधारे आरक्षण विकसनाची प्रक्रिया राबविणे उचित नव्हते. जागा हस्तांतरण करताना रीतसर सुधारित करारनामा करून क्षेत्र निश्चित करणे




आवश्यक होते. समावेशक आरक्षण विकसित करण्याच्या अटींचे व नियमांचे पालन झालेले नसताना सुधारित बांधकाम परवाना देण्यात आला.

महत्त्वाचे म्हणजे सुधारित बांधकाम परवानगी घेताना प्रस्तावित प्रस्तावावर सर्व मिळकतदार यांची स्वाक्षरी व संमती घेणे आवश्यक होते परंतु तशी कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. विकसक यांनी मूळ करारनाम्यानुसार विहित कालावधीत कोणतीही शर्त पूर्ण केलेली नसताना नवीन यु डी सी पी आर नुसार त्यांना विकास शुल्क आकारणीतील सूट व भरण्यासाठी दिलेली सवलत देण्यात आली. सुधारित बांधकाम परवानगी देताना उभारण्यात आलेल्या संरचनेच्या परिक्षणाची आवश्यकता होती तसे प्रमाणपत्र घेतले नाही. सुधारित बांधकाम परवानगी मध्ये एकूण प्रस्तावित क्षेत्र हे २० हजार चौ.मी. पेक्षा जास्त असल्याने विकसकास घेणे आवश्यक होते अद्याप ते प्राप्त असल्याचे अभिलेखावरून दिसून येत नाही. महानगरपालिकेने विकसक यांना सुधारित बांधकाम परवानगी देताना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार वाढीव चटई क्षेत्र विषयक लाभ अनुज्ञेय केले असल्याने महानगरपालिकेला समावेशक आरक्षण अंतर्गत आरक्षित जागेतील क्षेत्रात मालकी हक्क तसेच विकसित क्षेत्र मिळणे आवश्यक होते पण अशी कार्यवाही करण्यात आलेली नाही. महानगरपालिकेचे संभाव्य नुकसान झाले आहे.

दरम्यान, समितीने यासंदर्भात महत्त्वपूर्ण शिफारशी केल्या आहेत. या प्रकल्पात महानगरपालिकेने विकसक यांना सुधारित बांधकाम परवानगी देताना एकत्रिकृत विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीनुसार वाढीव चटई क्षेत्रविषयक लाभ अनुज्ञेय केले असल्याने सद्यस्थितीत जी इमारत उभारण्यात आली आहे तिची वस्तुनिष्ठ संरचनात्मक स्थिरता तपासणी करणे आवश्यक आहे. मूळ परवानगी ही +९ इतक्याच मजल्यांची होती. बांधकाम नियमावलीत वेळोवेळी झालेल्या बदलानुसार विकसक यांनी वाढीव चटई क्षेत्र प्राप्त करून सुधारित परवानग्या घेतल्या असून सुधारित परवानगी नुसार बेसमेंट (पार्किंग)+ तळ मजला (पार्किंग)+१७ मजले अशी इमारत उभारली आहे. वाढीव मजल्यांचा भार मूळ संरचना पेलू शकते का? असा एक प्रश्न आता उपस्थित झाला आहे.याबाबत स्पष्टता आवश्यक आहे.

विकसक यांना सुधारित परवानगी देताना स्पेक्ट्रम कन्सल्टंट यांचे संरचनात्मक स्थिरता प्रमाणपत्र जोडले असल्याचे नमूद आहे. हे प्रमाणपत्र हे बाबत तांत्रिक तपशील दर्शविणारे पत्र आहे त्यातून इमारतीच्या संरचनेच्या सुरक्षितता विषयक कोणतीही खात्री असल्याचे नमूद केलेले नाही. मुलतः सुधारित बांधकाम परवानगी देताना उभारण्यात आलेल्या संरचनेच्या परिक्षणाची आवश्यकता आहे. या प्रकल्प जागी रहिवासास असणाऱ्या नागरिकांच्या जिविताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या इमारतीचे संरचनात्मक परिक्षण तातडीने होणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला समावेशक आरक्षण अंतर्गत आरक्षित जागेतील क्षेत्रात मालकी हक्क तसेच विकसित क्षेत्र मिळणे आवश्यक आहे. तशी

मागणी करून क्षेत्र ताब्यात घेणे आवश्यक आहे. यात जागा मालकी क्षेत्र ३७५८.४० चौ.मी. विकसित क्षेत्र २३४९.00 चौ.मी. आहे. त्याची अंमलबजावणी होणे शक्य नसल्यास, विकसक यांनी सोलापूर महानगरपालिकेला एकूण आरक्षित क्षेत्राच्या ४० टक्के म्हणजे ३७५८.४० चौ.मी. इतके क्षेत्र आणि एकूण आरक्षित क्षेत्राच्या २५ टक्के म्हणजे २३४९ चौ.मी. इतके बांधकाम क्षेत्र हस्तांतरण करणे शक्य नसल्यास विकसक यांनी उपलब्ध इमारतीमधील २५ टक्के (२३४९ चौ.मी.) बांधकाम क्षेत्र व महानगरपालिकेला हस्तांतरित करावयाच्या जागेऐवजी सिद्ध शीघ्र गणकाच्या ४० टक्के नुसार येणाऱ्या दरानुसार होणाऱ्या हस्तांतरित होणाऱ्या जमिनीच्या मूल्यांकना इतकी रक्कम महानगरपालिकेला मोबदला म्हणून देण्यात यावी अशी तरतूद आहे.

त्यानुसार सद्यस्थितीत महानगरपालिकेला जागा हस्तांतरित करून देणे शक्य नसल्यास विकसक यांनी महानगरपालिकेला उपलब्ध बांधकामातील २५ टक्के (२३४९ चौ.मी.) बांधकाम क्षेत्र व महानगरपालिकेला हस्तांतरित करावयाच्या जागेऐवजी सन २०२५-२६ च्या वार्षिक सिद्ध शीघ्र गणकानुसार रक्कम रुपये १ कोटी ४१ लाख ३१ हजार ५८४ रुपये इतकी रक्कम महानगरपालिकेकडे जमा करणे आवश्यक आहे. या गंभीर प्रकरणातील प्रशासकीय अनियमितता, कायदेशीर तरतुदींचा अयोग्य अर्थ प्रस्तावित करून दिलेला अनुचित लाभ व महापालिकेचे आर्थिक नुकसान झाल्याचे दिसून येत आहे.यामुळेच '' ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है.

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित



## आईशी अनैतिक संबंध; एकाचा खून करून प्रेत पुरले

### संशयितास दोन जूनपर्यंत पोलिस कोठडी

**तभा वृत्तसेवा**
**मोहोळ, दि. २९ मे-**

आईसोबत असलेले अनैतिक संबंध लक्षात आल्याने अपहरण करून खून केला व प्रेतही पुरुन टाकून पुरावाही नष्ट केला. ही घटना सौदणे (ता. मोहोळ) येथे २८ मे रोजी उघड झाली आहे. यातील संशयित आरोपीला २ जूनपर्यंत न्यायालयाने पोलीस कोठडी सुनावली आहे.

याबाबत मोहोळ पोलिसाकडून मिळालेल्या माहितीनुसार तानाजी तुकाराम नामदे यांचा मुलगा नेताजी हा दळण आणण्यासाठी गेला. तो दळण घेवून परत आला नाही म्हणून सौदणे गावातील झोपडपटटी येथे गिरणी मालकाकडे नेताजीचे वडील यांनी चौकशी केली असता तो २४ मे रोजी दळण ठेवून अर्ध्या तासात येतो, असे सांगून गेला तो परत आलाच नाही असे सांगितले.




त्यानंतर २६ मे रोजी विकास गुरवकडून वॉटस्‌अपवर मेसेज पाठवले असल्याचे सांगण्यात आले. दरम्यान नेताजी याचा मोबाइल हा बंद लागत होता. कुटुंबीयांकडून नेताजीची शोधाशोध सुरू असताना गावातील इसम आदित्य चंद्रकांत वाघमारे याने असे सांगितले की, आम्हास २४ मे रोजी रोजी सव्वा आठ वाजणेच्या सुमारास नेताजी यास मोटारसायकल घेवुन घराच्या दिशेने येताना गुरव यांच्या घरासमोर पाहिले होते. त्यानंतर नेताजीचे वडील तुकाराम नामदे यांनी माझा मुलगा नेताजी हा अद्यापपर्यंत मिळून न आल्याने नेताजी याचे विकास गुरव याच्या आईशी असलेल्या प्रेमसंबंधाबाबत त्यास माहिती झाल्याने विकास गुरव यानेच नेताजी याचे अपहरण करुन लपवुन ठेवल्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे माझा मुलगा नेताजी तानाजी नामदे (वय ३२) याचे विकास मारुती गुरव अथवा अन्य कोणीतरी अपहरण करुन लपवुन ठेवले आहे म्हणून नेताजीचे वडील यांनी २८ मे रोजी मोहोळ पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली.

याबाबत मोहोळ पोलिसांनी तपास सुरु केला दरम्यान पोलिसांनी संशयित म्हणून विकास गुरव याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे चौकशी केली असता त्याने सुरुवातीला उडवा उडवीची उत्तरे दिली. त्यानंतर मात्र पोलिसांनी अधिक संशय व्यक्त करत चौकशी केली असता त्याने नेताजी याचा खून करून पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत शेतात पुरले असल्याचे सांगितले. पोलिसांच्या पथकाने पंचासमक्ष संशयित आरोपी गुरव याने दाखवल्याप्रमाणे प्रेत कार्यकारी दंडाधिकारी मोहोळ यांच्या समक्ष बाहेर काढून शासकीय रुग्णालय सोलापूर येथील तज्ञ डॉक्टरांच्या उपस्थितीत शवविच्छेदन करण्यात आले.

पोलिसांनी अटक केलेल्या विकास गुरव याला न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला दोन जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून अधिक तपास मोहोळ पोलीस करत आहेत. सदर प्रकरणी गुन्हे प्रकटीकरण शाखा, पेनुर बीट अधिकारी आणि अंमलदार तसेच इतर अधिकारी आणि अंमलदार यांनी तपास करून गुन्हा उघडकीस आणला आहे.



सोलापूर : सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सुरेश हसापूरे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना सुभाष पाटोळे, संतोष पवार, मोतीलाल राठोड, मुबारक शेख, जयशकर पाटील, बनसिध्द बन्ने, बाबूराव कोळी.

## व्यापाऱ्यांकडून पंढरपूर नगरपरिषदेला श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ मे -**

गेल्या दहा दिवसापासून पंढरपूर शहरात दमदार पाऊस पडत आहे मात्र पावसाचे पाणी वाहून जाण्यासाठी नगरपरिषदेने उपाय योजना केली नसल्यामुळे छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौफाळा दरम्यान मोठ्या प्रमाणात पाणी साठत आहे. याचा त्रास व्यापारी, नागरिक, भाविक तसेच वाहनचालक यांना सहन करावा लागत आहे. याकडे नगरपरिषद दुर्लक्ष करत असल्यामुळे नुकतेच व्यापाऱ्यांनी नगरपरिषदेला श्रद्धांजली वाहून आंदोलन केले.



दरम्यान पंढरपूर हे राज्यातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र असल्यामुळे विठ्ठलाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुविधा मिळाव्यात यासाठी शासन कोट्ट्यवधी रुपयांचा निधी देत आहे. या निधीतून पंढरपूर शहरातील रस्ते करण्यात येत आहेत. मात्र गेल्या काही दिवसापासून रस्त्यांची दुरावस्था झाली असून अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत तर पावसाचे पाणी अनेक रस्त्यावर साठत आहे. दरम्यान शहरातील मुख्य रस्ता असलेल्या स्टेशन रोडवरील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते चौफाळा दरम्यान पावसाचे पाणी साठत असल्यामुळे याचा त्रास व्यापारी, नागरिक, भाविक, वाहनचालक यांना सहन करावा लागत आहे. मात्र याकडे नगर परिषदेचे दुर्लक्ष असल्यामुळे व्यापाऱ्यांनी नगर परिषदेला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून आंदोलन केले. या आंदोलनानंतर तरी आता नगरपरिषदेमधील अधिकारी लक्ष देतील का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आरती पाटील खून प्रकरण; दोघांना ७ दिवसाची कोठडी

**मंगळवेढा, दि.२९ मे**

मंगळवेढा न्यायालयात पत्नीने सोडचिठ्ठी व पोटगीबाबत दाखल केलेल्या दाव्याचा राग मनात धरून पत्नी आरती अमोल पाटील (वय ३२) हिच्या खून प्रकरणी पोलिसांनी अमोल अंबादास पाटील,विमल अंबादास पाटील या दोघांना अटक करून न्यायाधीश एस.एन.गंगवाल-शहा यांच्यासमोर उभे केले असता त्या दोघा आरोपींना सात दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.



या प्रकरणी पोलिस निरिक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली तपासिक अंमलदार तथा पोलिस उपनिरिक्षक नागेश बनकर यांनी वरील दोन आरोपींना अटक करून न्यायालयात उभे केले.यावेळी तपास अधिकार्यांनी या गुन्हयात इतर कोणाचा सहभाग आहे का,चाकू जप्त करणे आदी मुद्दे मांडल्यानंतर न्यायालयाने दि.३ जूनपर्यंत म्हणजेच सात दिवसाची पोलिस कोठडी सुनावली आहे.

## बनावट नोटरी, कब्जापावती करून फसवणूक

### मजरेवाडीतील २२ प्लॉटधारकांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे -**

बनावट नोटरी कब्जापावती व करारपत्र तयार करून मिळकत नोंदीसाठी महापालिका मालमत्ता कर विभागाकडे प्रस्ताव सादर केल्याप्रकरणी २२ जणांविरुद्ध एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

खाजाभाई शब्बीर शेख (वय ४७), संजय मधुकर जाधव, रोहन रमेश पगडे, अश्पाक अली मुस्ताफ अली सय्यद, युन्नुस नूरअहमद निलगुंडे, नरेश राजय्या दुडम, रजिया गुलाम अब्बास शेख, इक्बाल मेहबूब शेकष रेश्मा वाहिद कोतकुंडी, जब्बार हुसेन बागवान, रेश्मा जावीद पिरजादे, एतेमाश अजमोद्दी हिप्परगी, रेश्मा नुरुद्दीन डंके, असीफ मौलाली मोमीन, लतीफ बंगम रफिक पिरजादे, जरीन बाबू पटेल, आसीफ अ. अत्तार शेख, अल्ताफ हुसेन गौस, मजरुद्दीन मुनाफ सय्यद, नागय्या शिवलिंगप्पा स्वामी, म. हुसेन खाजाभाई कटोर, सरेश करेप्पा जंगम (सर्व रा. सोलापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत याप्रकरणी महापालिका मालमत्ता कर विभागातील सूर्यकांत धोंडप्पा खसगे (वय ५७, रा. सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. एक एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत शहरातील हद्दवाढ भागातील मजरेवाडी, राजीव गांधी नगर, शिवपार्वती नगर, येमुलवाडी, चंद्रकला नगरातील प्लॉट लिहून घेणारे आणि मिळकत नोंदीसाठी प्रस्ताव सादर करणारे भोगवटादार यांनी यातील संशयितांकरवी बनावट कागदपत्रे तयार केली. संशयितांनी स्टँप पेपरवरील वर्षे पुसून त्यावर अस्तित्वातच नसलेले नोटरी ॲड. एल. पी. देशपांडे व एच. एल. खान यांचा बनावट नोटरी कब्जापावती व करारपत्र तयार केला. त्या मिळक नोंदीसाठी महापालिका मिळकत कर विभागाकडे प्रस्ताव सादर करून जागा मालक व महापालिकेची फसवणूक केली.

**या क्रमांकाच्या प्लॉटची बनवली बनावट नोटरी...**

मनपा हद्दवाढ ६७, मजरेवाडीतील राजीव गांधी नगरातील प्लॉट क्रमांक २०७, २४८, २३४, २८०, २६३, २०२, ११२, २८०, १४५, शिवपार्वती नगरातील ६, ४९, ३०६, ३०८, १३३, ७३८, ७३९, ८९१, ७४१, १३१, १०२७, १०२८, १०२२, १०२३, ८९६, ३१९, ७२५, ७४०, ६५१, ७१२, ८७७, ७४३, ७४५, ७२१, ७२२, ८८८, येमुलवाडीतील ६३/अ, ६४/अ, चंद्रकला नगरातील २५५, सत्य साई नगरातील १४१.



## अग्रलेख...

# चर्चा तर होणारच!

कोणत्याही गोष्टीच्या वाटचालीचे 'काळ' हे महत्त्वाचे माध्यम असते. म्हणजे असे की, जसजसा काळ पुढे सरकत जातो, तसतसे कोणत्याही एखाद्या गोष्टीच्या वाटचालीचे टप्पेही बदलत जातात. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी एका माध्यम समूहासोबतच्या मुलाखतीच्या कार्यक्रमात राजकारणाच्या अधोगतीचा मुद्दा अधोरेखित केला आणि राजकारणाचा स्तर घसरत चालल्याबद्दल चिंता व्यक्त केली. पण राजकारणाचा स्तर घसरत चालला किंवा राजकीय संस्कृतीची अधोगती होत आहे, हा काही त्यांनी नव्याने केलेला गौप्यस्फोट नसल्याने फडणवीस यांच्या त्या वक्तव्याचे आश्चर्य वाटावे किंवा धक्का बसावा, अशी स्थिती आज राहिलेली नाही. महाराष्ट्राच्या राजकारणास सुसंस्कृततेची परंपरा आहे. महाराष्ट्रातील राजकीय नेत्यांनी या राज्यात देशाला आदर्श वाटावी अशी राजकीय संस्कृती रुजविली आहे आणि त्यामध्ये व्यक्तिद्वेषाला थारा नाही, अशी वक्तव्ये गेल्या अनेक दशकांत अनेक राजकीय नेत्यांच्या मुखातून महाराष्ट्राने ऐकलेली आहेत. वैचारिक मतभेदांमुळे व्यक्तिगत स्नेहाला बाधा येत नाही, असेही अनेक जण वारंवार बोलत राहिले आहेत, पण या इतिहासावरही सातत्याने प्रश्नचिन्हेच उमटविली गेली. राजकारणाचा स्तर घसरत चालल्याबद्दल फडणवीस यांनी नव्याने व्यक्त केलेल्या जुन्याच चिंतेमुळे पुन्हा एकदा या प्रश्नाने नव्याने डोके वर काढले आहे, हीच या चर्चेची नव्याने समोर येणारी बाब ठरेल. कदाचित आता पुन्हा एकदा, राजकारणाच्या संस्कृतीचा इतिहास उगाळला जाईल. म्हणूनच महाराष्ट्राच्या राजकारणातील संस्कृतीच्या ऱ्हासाच्या काळासोबत घसरत गेलेल्या टप्प्यांचा मागोवा घेणे गरजेचे ठरते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुलाखतीदरम्यान राज्यातील घसरत्या राजकीय संस्कृतीचा संदर्भ स्पष्ट करताना २०१९ मधील विधानसभा निवडणुकीनंतर तत्कालीन शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी दगाफटका करून पाठीत खंजीर खुपसल्याचा उल्लेख केला आहे. तेव्हापासून राजकारणाची संस्कृती बिघडली असे त्यांनी म्हटले असले, तरी बिघडलेल्या त्या संस्कृतीचे चटके त्याही आधीपासून खुद्द फडणवीस यांनीच सोसलेले आहेत. महाराष्ट्राने ते अनुभवले आहेत. २०१९ च्या निवडणुकीत जनतेने भाजपा-शिवसेना युतीला सत्तास्थापनेचा स्पष्ट कौल दिला आणि काँग्रेसप्रणीत आघाडीला सत्तेपासून रोखण्याचा स्पष्ट जनादेश दिला, तरीही उद्धव ठाकरे यांनी केवळ भाजपाला मुख्यमंत्रिपदापासून रोखण्यासाठी व फडणवीस यांच्या नेतृत्वाचे खच्चीकरण करून सत्ता संपादन करण्यासाठी काँग्रेसप्रणीत आघाडीसोबत जाण्याचा निर्णय घेतला, ही टोचणी फडणवीस यांच्या मनास खोलवर वेदना देत असते, हे लपून राहिलेले नाही. ठाकरे यांनी विश्वासघात केलाच; पाठीत खंजीरही खुपसला, या भावनेचा पुनरुच्चार ते करत असतात. ज्या राजकारणाच्या संस्कृतीचे गोडवे राष्ट्रवादी काँग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष शरद पवार सातत्याने गात असतात, त्या शरद पवारांनीच उद्धव ठाकरे यांना त्या राजकीय कोलांटउडीसाठी प्रोत्साहन दिले होते, ही बाब महाराष्ट्रास ठाऊक आहे. उद्धव ठाकरे यांनी पाठीत खंजीर खुपसल्याची जी भावना देवेंद्र फडणवीस वारंवार बोलून दाखवितात, तो खंजीर पवार यांच्या प्रेरणेतूनच ठाकरे यांनी हाती घेतला असावा. कारण मुख्यमंत्रिपद आपल्याला मिळेल अशी आपली अपेक्षाच नव्हती; पवार यांनीच आग्रह केल्यामुळे हे पद आपल्या पदरात पडले, असे ठाकरे यांनी त्यानंतर अनेकदा जाहीरपणे सांगितले आहे. राजकारणाच्या इतिहासातील ज्या संस्कृतीचे गोडवे पवार आदी जुने नेते वारंवार गात होते, त्याच काळात पाठीत खंजीर खुपसण्याच्या राजकारणाचा जन्म झाला होता, हेही महाराष्ट्र जाणतो. त्यामुळे राजकारणाचा स्तर खालावत चालल्याची फडणवीस यांनी व्यक्त केलेली खंत गेल्या पाच-सहा वर्षांत जन्माला आलेली नाही, तर या प्रक्रियेचा जन्म कितीतरी दशकांपूर्वीच महाराष्ट्रात झाला आहे, याची नोंद घ्यावी लागेल. फडणवीस यांनी या मुद्याला नव्याने हात घातल्यामुळे यापुढे जेव्हा राजकारणाच्या पातळीची चर्चा होईल, तेव्हा हा इतिहास दुर्लक्षून चालणार नाही. राजकारणाचा घसरता स्तर, बिघडलेली संस्कृती, राजकारणाचे गुन्हेगारीकरण यांसोबतच राजकारणाचे टोळीकरण हे सारे टप्पे काळासोबत महाराष्ट्राने गेल्या काही दशकांत अनुभवले आहेत. महाराष्ट्राच्या राजकारणातील संस्कृतीचा उदोउदो जेव्हा ऐन बहराला आला होता, तेव्हा याच राज्याच्या राजकारणाच्या गुन्हेगारीकरणाची चर्चा जोरात सुरू झाली होती. गुन्हेगारी विश्व आणि राजकीय नेत्यांचे संबंध या तेव्हा ऐरणीवर असलेल्या चर्चेच्या केंद्रस्थानी महाराष्ट्रातीलच काही प्रभावशाली राजकीय नेते होते, हा फार जुना भूतकाळ नाही. सुमारे पाच दशकांपूर्वी सन १९८० च्या दशकात, महाराष्ट्रातील एक प्रसिद्ध तत्त्वज्ञ, विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या, राज्यातील घसरत्या राजकीय संस्कृतीविषयी खंत व्यक्त करणाऱ्या सखोल चिंतनाचे दाखले आजही दिले जातात. याचा अर्थ, राजकारणाचा स्तर खालावत असल्याचा मुद्दा १९८० च्या दशकापासून किंवा त्याही अगोदरपासून महाराष्ट्राच्या चिंतेचा विषय ठरला आहे, हे स्पष्ट आहे. तसेही राजकारणाचा घसरलेला स्तर ही काही एकट्या महाराष्ट्राच्या राजकीय चिंतेची बाब राहिलेलीच नाही. एकूणच संपूर्ण राजकीय विश्वातच या चिंतेचे सावट पसरलेले असून राज्य, देशच नव्हे, तर जगातील जवळपास सर्वच देशांतील सामान्य जनता या चिंतेचे उसासे टाकत जुन्या राजकारणासोबत वर्तमानाची तुलना करताना आढळत असते. प्रसिद्ध समाजवादी विचारवंत एस. एम. जोशी हे महाराष्ट्रातील एक आदरणीय राजकीय नेते म्हणून ओळखले जातात. १९८४ मध्ये त्यांच्या ८२ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या चाहत्यांनी त्यांच्या सहस्रचंद्र दर्शन सोहळ्याचा घाट घातला. त्याचे औचित्य साधून एक गौरव ग्रंथही प्रसिद्ध करण्यात आला. त्या ग्रंथातच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी राजकारणाच्या अधोगतीविषयी प्रकट चिंतन केले होते. राजकारणातच नव्हे, तर एकूणच संसदीय लोकशाही पद्धती अंतर्गत कार्यपद्धतीचीच अधोगती होत असल्याची खंत त्यांनी या लेखात मांडली होती. भारतामध्ये निवडणुकीनंतर एक पक्ष सत्तेवरून दूर झाला तर दुसरा सक्षम पर्यायी पक्ष सत्तेवर यावा, अशी परिस्थिती सध्या दिसत नाही. नजीकच्या भविष्यातही ती उद्भवेल असे वाटत नाही, ही तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांची तेव्हाची भविष्यवाणी पुढे सातत्याने आठवावी, अशी राजकीय परिस्थिती सर्वत्रच दिसत गेली; महाराष्ट्रही त्याला अपवाद राहिला नाही. २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी केलेली राजकीय कृती म्हणजे त्या भविष्यवाणीचेच पुढचे वास्तव ठरावे. त्याआधीच्या पाच वर्षांत, भाजपासोबत सत्तेत असूनही ठाकरे यांच्या पक्षाने विरोधी पक्षाहूनही प्रखर अशी विरोधकांची भूमिका वठवून फडणवीस सरकारला जेरीस आणले होते, तेव्हाही अनेकांस राजकारणाच्या अधोगतीचा विचार अस्वस्थ करतच होता. राजकारणाच्या केंद्रस्थानी असलेल्या सत्तेचे आकर्षण विलक्षण प्रक्षोभक आहे. सगळ्या तऱ्हेच्या वासना आणि मोहांना चेतविणारे आहे. त्यामुळे पक्षापक्षांमध्ये अवांतर गट निर्माण होतात आणि ते एकमेकांचे पाय ओढू लागतात. आयाराम-गयाराम, दलबदलूंचे पीक त्यातूनच फोफावत जाते. ज्या पक्षाची सद्दी असते तेथे आयारामांची गर्दी वाढते आणि ज्या पक्षांची शक्ती क्षीण होते, तेथे गयाराम उत्पन्न होतात. यातूनच गुन्हेगारीकरण वाढते व ध्येयशून्य राजकारणाचा जन्म होतो, असे त्या लेखात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले होते. बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्या मुलाखतीत राजकारणाच्या अधोगतीची चिंता व्यक्त केली, तेव्हा तर्कतीर्थांनी चार दशकांपूर्वी व्यक्त केलेले विचार म्हणजे आजच्या राजकारणाविषयी वर्तविलेली भविष्यवाणीच होती, याची खात्री पटल्याखेरीज राहात नाही. त्यामुळे राजकारणाची अधोगती ही काळासोबत अधिकाधिक खालच्या स्तरावर सरकणारी एक शाश्वत प्रक्रिया आहे, हेच स्पष्ट झाले आहे. केवळ संस्कृतीचे आणि इतिहासाचे गोडवे गाऊन या प्रक्रियेची पसरणारी पाळेमुळे रोखता येणार नाहीत, हेदेखील एव्हाना स्पष्ट झाले आहे. तरीही, चर्चा तर व्हायलाच हवी.


## प्रासंगिक

# गुलजार, द ग्रेट!

**अरुण म्हात्रे**

देशातच नव्हे तर जगात आपली ओळख निर्माण करणाऱ्या प्रख्यात कवी गुलजार यांना ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान होणे ही त्याच्याबरोबरच प्रत्येक चाहत्यासाठी, संगीतप्रेमीसाठी आनंदाची बाब आहे, असे मला वाटते. 'गुलजार' असे एकेरी संबोधनच त्याच्यावरील अतीव आणि आंतरिक प्रेमाची साक्ष देण्यास पुरेसे आहे. हिंदी आणि उर्दूमध्ये कविता, गीते लिहिली असली, तरी त्याची मराठीशी घट्ट नाळ जोडलेली असणे, हीदेखील आपल्याला त्याच्याशी जोडणारी मोठी बाब म्हणता येईल. गुलजार कुसुमाग्रजांच्या कवितांचे भाषांतर करू शकला. तर, दुसरीकडे शांताबाईंनी त्याच्या 'त्रिवेणी'चे मराठीत भाषांतर केले. याचे त्याने तोंडभरून कौतुकही केले. एकमेकांबरोबर असणारे असे नाते फार देखणे असते. तो मराठी वाचतो. आपल्याला उर्दू ऐकवतो. या अर्थाने तो कायमच खूप मराठीमय वाटतो. या संदर्भात बोलायचे तर आपण सत्यदेव दुबे यांच्या पंक्तीत त्याचे नाव घेऊ शकतो. दुबे हिंदी असले तरी आयुष्य संपूर्ण मराठी नाट्यसृष्टीला वाहून घेतले होते, तसेच गुलजारचेही आहे. तो उर्दू वा हिंदीला मानतो तेवढेच मराठीलाही मानतो. किशोर कदम आणि गुलजार एकत्रितपणे हा सुंदर प्रयोग करतात.

माझ्याप्रमाणेच आपल्यापैकी प्रत्येकाचा त्याच्या गाण्यांशी अगदी जवळचा, जिव्हाळ्याचा संबंध आहे. चित्रपटांमधील त्याची गाणी अनेकांच्या हृदयाचा ठाव घेणारी, त्याच्याशी जोडून ठेवणारी आहेत. काही कार्यक्रमांच्या निमित्ताने मंचावर एकत्र आलो असता त्यांच्याशी संवाद साधण्याचे प्रसंगही मला लाभले. अर्थातच वैयक्तिकदृष्ट्या ती माझ्यासाठी फार मोठी बाब आहे. त्याच्या गाण्यांविषयी काय आणि किती बोलणार...! 'बंदिनी'मधील त्याचे पहिले गाणे कोण विसरु शकेल? 'मोरा गोरा अंग लैलै...' पासून त्याच्या गाण्यांनी रसिकांच्या मनाचा ठाव घेतला, तो सिलसिला अजूनही संपलेला नाही. 'इजाजत', 'मौसम', 'आंधी...' किती यादी देणार? अनेक गाणी आपल्या ओठांवर असून ती त्याची आहेत तितकीच आपल्या प्रत्येकाची आहेत. ती सहज ओठांवर येतात. हलकेच गुणगुणाविशी वाटतात. कवी म्हणून मला नेहमी वाटते की, गाणी लिहिणे ही एक कला आहे. यमके जुळवत काहींना ती जमते. बरेच गीतकार या पद्धतीने गाणी लिहितात. मात्र, गुलजार असे कधीच करत नाही.



त्याचे गाणे आशयाच्या अंगाने येते. त्याच्या कवितेत कृत्रिम गोष्टीदेखील जिवंत रूप घेऊन येतात. त्याच्या कवितेत रात्र ढळत नाही तर हातून निसटते. एखादा क्षण हातून हलकेच ओघळतो. त्याची कविता वाट बघणारी तिन्हीसांज दाखवते. काव्यशास्त्रामध्ये याला आम्ही 'व्यक्तिकरण' म्हणतो. ही बाब गुलजारला फार छान जमली आहे. म्हणूनच त्याच्या कवितेतील पाऊस आपल्याला जवळचा मित्र भेटावा तसा भेटतो. तो 'मेरा कोई सामान लौटा दो...' म्हणतो तेव्हा ते सामान आठवणी, भूतकाळातील घटना, सहवास या सगळ्यांचे गाठोडे असते. वस्तू, सामान, निसर्ग, आठवणी या सगळ्यांना व्यक्तिरूप देणारी, आपलेसे करणारी, अधिक जवळ आणणारी त्याची ही शैली फार देखणी आहे. म्हणूनच ती तुम्हा-आम्हा प्रत्येकाला आवडणारी आहे. याच हक्काने आपण त्याला एकेरी नावाने बोलवतो. शैलेंद्र, निदा फाजली, साहिर यांच्या श्रेणीत बसणारे हे एक जवळचे नाव आहे. खरे सांगायचे तर, कवितेच्या प्रांतातील आम्ही सगळेच साहिरनंतर आदराने पाहतो ते नाव म्हणजे गुलजार.

'मेरे अपने' नावाचा चित्रपट मला आठवतो. यात हाती काम नसणाऱ्या युवकांच्या प्रश्नाला हात घातला होता. त्या काळात भारतभर बेरोजगार युवकांच्या चळवळी सुरू झाल्या होत्या. नोकरीसाठी तरुण वाट मिळेल तिथे पळत होते. या सगळ्याचे चित्रीकरण यात अगदी नेमकेपणाने दिसते. ही शिकलेली तरुण मुले हाती काम नसल्यामुळे गुंडगिरीकडे कशी वळतात, त्यांचे गट कसे होतात, ते कसे गुन्हेगारी करू लागतात हे प्रभावीपणे सांगण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. गुलजारची ग्रेट गोष्ट म्हणजे त्याने हे सगळे प्रत्यक्ष सुरू होते, त्याच काळात एका कथानकातून विषय रुपेरी पडद्यावर आणला. आपल्याकडे 'अधांतर' नावाचे नाटक जवळपास याच विषयावर बेतलेले आहे. पण ते रंगमंचावर यायला जवळपास २० वर्षे लागली. जयंत पवार यांनी ते लिहिले आणि गिरणी कामगारांचा प्रश्न मंचावर आणला. पण 'मेरे अपने' हा चित्रपट त्याच्या किती तरी आधी गुलजारने पडद्यावर आणला होता. यातील एक वृद्धा या तरुणांना सांभाळते आणि सन्मार्गी आणण्याचा प्रयत्न करते. पुढे 'अंकुश'मध्ये याच प्रश्नाला हात घालण्यात आला, पण गुलजारने त्याआधीच हाताला काम नसणाऱ्या युवकांच्या समस्येला तोंड फोडले. कोणीतरी आपल्याला आपले म्हणावे, ही या तरुणांच्या मनातील भावना त्याने शब्दांवाटे मांडली. गुलजारने अशा अनेक मानवी भावनांना वाट मोकळी करून दिली.

'सब कुछ ठीकठाक है...' हे त्याचे गाणेही असेच लक्षात राहिले आहे. खरे तर परिस्थिती अगदीच विपरीत असते. काहीच नीट नसते. आयुष्य भरकटलेले असते. तरीही चित्रपटातील तरुण 'सब कुछ ठीकठाक है' म्हणतात तेव्हा एक प्रकारे परिस्थितीवर प्रहार होतो, नैराश्य व्यक्त होते आणि हे सगळे उपहासात्मक शैलीत होते. म्हणजेच कधी गुलजार पराकोटीच्या तरल शैलीत लिहिताना दिसतो तर दुसरीकडे तो असेही काही लिहून जातो. तो 'आंधी'मधील गाणी लिहितो आणि तोच नंतर 'बिडी जलै ले..' लिहितो. ही रेंज अफलातून आहे. खरेच तो अस्सल मुंबईकर झाला आहे. मुंबईचे सगळे वातावरण त्याच्या रक्तात मिसळून घेतल्यामुळे तो करतो ते सामान्य माणसाला जवळचे वाटते.

सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे गुलजारने एस. डी. बर्मन, सलील चौधरी, लक्ष्मीकांत-प्यारेलाल, आर. डी. बर्मन, मदनमोहन ते अगदी ए. आर. रेहमान यांच्याबरोबरही काम केले आहे. ही रेंज असामान्य म्हणावी लागेल. कवी म्हणून गुलजारचा हा गुण मला अत्यंत मोलाचा वाटतो. गाणी लिहिताना संगीतकारांशी संबंध येतो तेव्हा प्रत्येकाची निकड वेगळी असते. प्रत्येक संगीतकार गाण्याचे वेगळे मीटर सांगत असतो. त्याला कसे गाणे हवे आहे, ते स्पष्ट करत असतो. सगळ्याच कवींना प्रत्येकाला हवे तसे गाणे देणे शक्य होत नाही. आपण 'तेथे पाहिजे जातीचे...' म्हणतो; तसे येथे असते. या धर्तीवर पाहता गुलजार सांगाल ते सगळे देणारा माणूस आहे, असे मला वाटतो. तो कोणत्याही मीटरमध्ये लिहू शकतो. आजही मी 'मिली' वा 'घर'मधील गाणी ऐकतो तेव्हा तो किती आपल्या मानसिकतेशी जोडलेला आहे, हे समजते. त्याची प्रत्येक ओळ आपल्या मनाने कधी ना कधी अनुभवलेली असते. म्हणूनच त्याची गाणी जाणकारांबरोबर सर्वसामान्यांनाही आवडतात. अभिजात, समीक्षक वर्गाला त्याचे काव्य आवडते, तसेच सामान्यातील सामान्यही त्याचा आस्वाद घेऊ शकतो. या कसोटीवर उतरत असल्यामुळेच गुलजार ग्रेट ठरतो. ▮

(लेखक प्रसिद्ध कवी आहेत)

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# अकरावी प्रवेशाचा फार्स!

ठरावीक निर्णय आणि प्रक्रिया पूर्वनियोजित असल्यामुळे त्या सुरळीतच व्हायला हव्यात, ही अपेक्षा करणं चुकीचं आहे का? हा प्रश्न अशासाठी की, गेली कित्येक वर्षे दहावी बोर्डाच्या परीक्षेचे निकाल जाहीर होतात आणि मग अकरावीच्या प्रवेशाला सुरुवात होते. पण, गेल्या किमान तीन दशकांमध्ये आपण कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी एक फूलप्रूफ, अचूक व्यवस्था लावू शकलो नाही. एखाद्या वर्षी गोंधळ झाला तर समजता येईलही; पण किमान १५ लाख विद्यार्थ्यांच्या प्रवेशाची प्रक्रिया म्हणजे दरवर्षीचा फार्स झाला आहे. त्रस्त पालक आणि गोंधळलेल्या विद्यार्थ्यांच्या रांगा हे चित्र दरवर्षी थोड्याफार फरकाने बघायला मिळतंच.

गेली काही वर्षे नागपूरसह मुंबई, पुणे, छत्रपती संभाजी नगर अशा मोठ्या शहरांमध्येच अकरावीची केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया होती. यावर्षी संपूर्ण राज्यामध्ये शहरी आणि ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रवेश याच प्रक्रियेतून होत आहेत. अर्ज भरण्याच्या पहिल्याच दिवशी संकेतस्थळ बंद पडले, लॉग इन होऊ शकले नाही आणि एकूणच यंत्रणेचा फज्जा उडाला. राज्यस्तरीय ऑनलाईन केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमुळे सर्व विद्यार्थ्यांना समान संधी, प्रवेश प्रक्रियेदरम्यान होणाऱ्या गैरव्यवहाराला आळा, कनिष्ठ महाविद्यालयाच्या क्षमतेनुसार प्रवेश आणि अवाजवी शुल्क आकारणीला निर्बंध, ही 'ऑन पेपर' उद्दिष्टं ठेवून केलेल्या या सुरुवातीची व्यवहार्य अंमलबजावणी शक्य होत नसल्याचे मान्य करावे लागेल. दरवर्षी प्रवेश प्रक्रिया लांबत असल्याने अकरावीचे वर्ग सुरू होण्यास अनेकदा सप्टेंबर उगवतो. आता विद्यार्थी संख्या सहा पटींनी वाढली. राज्यभरात दहावीच्या परीक्षेला साधारणपणे १५ ते १६ लाख विद्यार्थी बसतात. त्यापैकी जवळपास १४ लाख उत्तीर्ण होतात आणि अकराव्या वर्गात प्रवेश घेण्यासाठी प्रयत्न सुरू करतात. ऑनलाईन अर्ज नोंदणी सुरू झाल्यावर १४ लाखांपैकी बहुतांश विद्यार्थ्यांनी अर्ज भरण्यासाठी संकेतस्थळावर लॉग-इन केलं. एकाच वेळी इतक्या मोठ्या प्रमाणात लॉग-इनचा परिणाम यंत्रणा कोलमडण्यात झाला. हा तांत्रिक बिघाड दुरुस्त करण्यासाठीचा वेळ लक्षात घेऊन प्रवेश प्रक्रिया पुढे ढकलण्यात आली. शहरी भागात सर्वच विद्यार्थ्यांना नामांकित कनिष्ठ महाविद्यालयांमध्येच प्रवेश हवा असतो. त्यासाठी विद्यार्थी पुढच्या फेरीसाठी वाट बघत राहतात आणि प्रक्रिया लांबत राहते. विद्यार्थी मिळेल त्या महाविद्यालयात प्रवेश घेऊन मोकळे होतात. वास्तविक या महाविद्यालयांमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया करण्याची फारशी गरज नसते; पण करायचेच असेल तर त्यांना चांगल्या आणि समान पायाभूत सुविधा देण्यासाठी खटाटोप करायलाच हवा. इंटरनेट घरोघरी पोहोचलेलं असलं, तरी ऑनलाईन फॉर्म भरताना, किती साईझचा फोटो, इतर कागदपत्रांच्या व्यवस्थित स्कॅन केलेल्या इमेजेस आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विषयांची अचूक निवड करण्यासाठी मुलांना मार्गदर्शन करायला कोणी नसतं. याचा फायदा घेऊन, सायबर कॅफेतील 'तज्ज्ञ' पालकांना लुबाडायला तयारच असतात. शहरी भागात सगळ्या सोयीसुविधा असतानाही पालक-बालकांना इतका मनस्ताप होत असेल तर ग्रामीण भागातील मुलांविषयी बोलायलाच नको. हे सरकारी यंत्रणेचं अपयश आहे. बरं, इतकी झटापट करूनही ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील गोंधळ सुरू राहिल्यास, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे जीव आणि वर्ष दोन्ही टांगणीला लागतं.

या सगळ्या प्रक्रियेत महत्त्वाचे आहेत विषय किंवा ब्रॅन्च! मोठमोठ्या शिक्षण संस्थांच्या आणि शिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या अभ्यासक्रमांच्या समांतर चालणारी व्यवस्था शिकवणी किंवा कोचिंग क्लासेसची आहे. कोचिंग क्लासेस आणि महाविद्यालयांचा 'मिलाफ' सर्वज्ञात आहे. प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करण्याची जबाबदारीसुद्धा कोचिंग क्लासचे प्रोफेशनल्स घेतात. मग, अकरावी आणि बारावी अशी दोन वर्षे विद्यार्थी महाविद्यालयाकडे फिरकतसुद्धा नाही. प्रॅक्टिकल्स किंवा तत्सम एखाद्या परीक्षेसाठी जायचे असेल तर गोष्ट निराळी! पण, कोचिंग क्लासेसमध्ये मात्र या मुलांची उपस्थिती आवश्यक असते. ही सुविधा केवळ विज्ञान आणि वाणिज्य शाखेत प्रवेश घेणाऱ्यांसाठी आहे. कला शाखेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मात्र महाविद्यालयात जाण्याला पर्याय नाही. कोचिंग क्लासेसमध्ये भरभक्कम शुल्क देण्यास सक्षम पालकांच्या पाल्याला टक्के कमी असले तरी चालतात. 'सब घोडे बारा टके' हा न्याय तिथे लागतो. हे कडू असलं तरी हेच व्यवहारातील सत्य आहे. प्रवेश प्रक्रियेतील या गोंधळातून निष्पन्न होतच नाही आणि होणारही नाही. इतका सगळा द्राविडी प्राणायाम होऊनही महाविद्यालयांमध्ये जागा रिकाम्या राहतात आणि दुसरीकडे विद्यार्थी महाविद्यालयीन प्रवेशापासून वंचित राहतात. हे व्यस्त प्रमाण कसं साधायचं? हा व्यवस्थेपुढचा प्रश्न आहे. शिक्षण व्यवस्था उभी करणं म्हणजे भरमसाट महाविद्यालयांना शेकडो जागांची परवानगी देणं नाही तर असलेल्या व्यवस्थेमध्ये दर्जात्मक सुधारणा करणं आहे, हे आपण लक्षात घेऊ तेव्हाच बदल होतील. तोपर्यंत या सगळ्या 'देण्याघेण्या'च्या व्यवहारात शिक्षण होरपळत राहणार आहे. ▮

९८५०३३९२४०

## दखल

# भाजपाचे स्वबळाचे संकेत?

**मोरेश्वर बडगे**

भाजपाचे चाणक्य आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह नुकतेच महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येऊन गेले. या दौऱ्यानंतर राजकारण तापलं आहे. तसे पाहिले तर आता मोठ्या निवडणुका नाहीत. व्हायच्या आहेत त्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्या साडेचार वर्षांपासून रखडल्या आहेत. वेगवेगळ्या कारणाने लोक न्यायालयात गेले आणि निवडणुका रखडल्या. मुंबई महापालिकेवर तीन वर्षांपासून प्रशासक आहे. तब्बल २९ महापालिका, ३४ जिल्हा परिषदा, ३३६ पंचायत समित्या, २४८ नगर परिषदा तसेच ४१ नगर पंचायत... इथे काही वर्षांपासून निवडणुका झाल्या नाहीत. कुठे ओबीसी आरक्षण तर कुठे प्रभाग रचना मुद्यावर न्यायालयात आव्हान दिल्यामुळे या निवडणुका होऊ शकल्या नाहीत. सर्वोच्च न्यायालयापुढे हा विषय आला तेव्हा न्यायालयही हादरले असणार. येत्या चार महिन्यात निवडणुका घ्या, असा आदेशच या न्यायालयाने दिला. त्यानंतर धावपळ सुरू झाली आहे. राज्य निवडणूक आयोग, राज्य सरकार आणि तमाम राजकीय पक्ष या साऱ्यांची दमछाक सुरू आहे. इतक्या निवडणुका घ्यायच्या म्हणजे मोठी सर्कस. मिनी विधानसभाच म्हणायची. दिवाळीच्या मागेपुढे या निवडणुका होतील, असा अंदाज आहे. काय होणार या मिनी विधानसभा निवडणुकीत? या निवडणुका महायुती म्हणूनच लढल्या जातील असे कालपर्यंत बोलले जात होते. मात्र, या निवडणुका आणि खासकरून मुंबईच्या निवडणुका भाजपा स्वबळावर लढेल, असे संकेत अमित शाह यांच्या ताज्या भेटीत मिळाल्याची जोरदार चर्चा आहे. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे हे बंधू एकत्रितपणे या निवडणुका लढवणार आहेत का? हे दोन भाऊ एकत्र आले तर किमान मुंबई महापालिका निवडणुकीत चमत्कार करू शकतात, असे मानले जाते. पण ते एकत्र येतील का? ज्या कारणाने ते एकमेकांपासून दूर गेले त्याच कारणाने ते एकत्र येणे अवघड आहे. मात्र, मीडियाला चघळायला हा विषय सोपा आहे. एक मात्र नक्की, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत शरद पवारांनी फुंकलेली महाविकास आघाडी नावाची गाजराची पुंगी यावेळी वाजणार नाही. आघाडीच्या नेत्यांनी मागेच ती मोडून खाल्ली आहे.



महापालिका निवडणुका भाजपासाठी यावेळी महत्त्वाच्या झाल्या आहेत. त्याला कारणही तसेच आहे. भाजपाला कुठल्याही परिस्थितीत मुंबई महापालिकेची निवडणूक जिंकायची आहे. एकूण २२७ वार्डांची मुंबई महापालिका तब्बल २६ वर्षे शिवसेनेच्या हातात राहिली आहे. त्या जोरावर शिवसेना दादागिरी करत आली. मुंबई महापालिकेची शेवटची निवडणूक गेल्या वेळी २०१७ साली झाली, त्यावेळी देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री होते. राज्यात युतीचे सरकार होते. मात्र त्यावेळी शिवसेना आणि भाजपा वेगवेगळे लढले होते. भाजपाला ८२ जिंकता आल्या तर शिवसेनेने त्याच्या दोन जागा जास्त म्हणजे ८४ जागा जिंकल्या. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना 'जुगाड' करून मुंबई महापालिकेत सत्ता मिळवता आली असती. मात्र फडणवीसांनी उद्धव ठाकरेंना झुकते माप दिले. भाजपाला पुढे ते महागात पडलं. आठ वर्षांत पुलाखालून बरेच पाणी वाहून गेले आहे. खूप काही बदलले आहे. ठाकरेंच्या शिवसेनेचीही तूटफूट झाली आहे. भाजपा या आपल्या सच्च्या मित्राला सोडून शरद पवारांची संगत करणाऱ्या उद्धव ठाकरे यांना त्यांच्याच आमदारांनी शिक्षा केली. मोठे बंड झाले. सरकार पडले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री झाले. ठाकरे यांच्या हातून सत्ता गेली, पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले. तरीही त्यांची मस्ती जिरली नाही. 'वडिलांचा पक्ष चोरला' म्हणून उद्धव ठाकरे अजूनही 'हाय तोबा' करीत असतात. उद्धव आणि त्यांची सेना तसे पाहिले तर संपल्यात जमा आहे. धुगधुगी बाकी आहे. मुंबई महापालिका हिसकली तर उबाठा पूर्ण संपते. त्यामुळेच फडणवीसांनी जोरदार चक्रव्यूह रचला आहे. मात्र शिवसेनेचे सुप्रीमो आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबईसाठी वेगळी तयारी सुरू केल्याने वेगळाच पेचप्रसंग उभा राहू शकतो. शिंदे यांनी ठाकरेंचे तब्बल ५० पेक्षा माजी नगरसेवक फोडले आहेत. आता त्यांनी भाजपाकडे १०७ जागांवर दावा सांगितला आहे. निम्म्या जागा शिंदेसेनेला सोडल्या तर उद्या ते महापौरपदावर दावा ठोकू शकतात. भाजपाला तर यावेळी कुठल्याही परिस्थितीत मुंबईवर आपला महापौर बसवायचा आहे. भाजपा आणि फडणवीस यावेळी तडजोड करण्याच्या मानसिकतेत नाहीत. त्यामुळे मुंबईच्या जागावाटपावर संघर्ष होऊ शकतो. मुंबईपुरत्या काही जागी 'मैत्रीच्या लढती' घेऊन मार्ग मोकळा केला जाऊ शकतो. २०२९ सालची निवडणूक भाजपाला पूर्णपणे स्वबळावर लढायची आहे. शत-प्रतिशत भाजपा त्याचे ट्रेलर म्हणून भाजपा या महापालिका निवडणुकांकडे पाहत आहे. स्वबळाची चाचणी करायला भाजपाने सांगितले त्यामागे तोच हेतू आहे. मुंबईमध्ये मराठी टक्का घटला, अशी ओरड नेहमीच कानावर येते. मुंबईमध्ये फक्त १८ टक्के मराठी मतदार उरले आहेत, असे सांगितले जाते. मात्र काहींच्या मते, आजही मुंबईमध्ये ३७ टक्के मराठी मतं आहेत. १९ टक्के मुस्लिम मतदार आहे. १७ टक्के उत्तर भारतीय तर १५ टक्के मारवाडी, जैन आदी हिंदी भाषी आहेत. ही १९ टक्के मुस्लिम मतं कशी वळतात, त्यावर मुंबईचा निकाल वळू शकतो. उद्धव ठाकरे या 'हिरव्या' मतां'वरच ठाकूरकी दाखवत आहेत, हे विसरता येत नाही. अमित शाह यातून कसा मार्ग काढतात ते पाहायचे. कारण शिंदे यांना गमावणे भाजपाला परवडणार नाही. त्यामुळे शेवटपर्यंत ताणून धरले जाईल. महायुती मैदानात दिसेल का? ते शेवटच्या टप्प्यात दिसेल. महापालिका निवडणुकीत मतदारसंघ फार मोठे नसतात. लहानशीही लाट चालली तर निकाल फिरतो. यावेळीही ती शक्यता नाकारता येत नाही. बंडखोर मोठ्या संख्येने मैदानात दिसतील.

मुंबई, ठाणे आणि पुणे या तीन महापालिका 'सोन्याच्या कोंबड्या' आहेत. मुंबईत अजितदादांच्या राष्ट्रवादीची फारशी ताकद नाही. मात्र पुण्यात आहे. एकनाथ शिंदे यांचा ठाण्यात जोर आहे. मात्र यावेळी भाजपामधूनही ठाण्यासाठी आवाज निघू लागला आहे. उद्धव ठाकरे यांची पूर्वीसारखी हवा आता राहिलेली नाही. तरीही ठाकरेसेनेला गृहीत धरता येणार नाही. ठाकरे बंधू एकत्र आले तर ते 'गेमचेंजर' ठरू शकते. मात्र, हे दोघे भाऊ एकत्र येण्याची शक्यता अंधुक आहे. फक्त मीडियामध्ये चर्चा आहे. पण त्या भावांची कुठे इच्छा आहे? 'ठाकरे ब्रँड' संपणार नाही, असा दावा नुकताच केला गेला. तो संपला की नाही संपला ते महापालिका निवडणूक निकालच सांगू शकेल. काश्मिरातील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात २६ पर्यटक मारले गेले. मोदी सरकारने त्याचा बदला घेतला; त्या घटनेला बरेच दिवस लोटले. मात्र 'ऑपरेशन सिंदूर'ने निर्माण झालेले देशभक्तीचे वातावरण अजून मिटलेले नाही. या हवेचा भाजपा कसा फायदा उठवतो ते पाहायचे. ▮

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### पाकिस्तानातील स्थैर्याची चिंता

भारताने सिंधू नदीचा पाणी करार स्थगित करण्याची घोषणा केल्यावर काही जणांकडून मानवतावादी सूर उमटू लागला की शेजारील राष्ट्रात स्थैर्य असणे हे भारताच्याही हिताचे आहे वगैरे. पाण्याअभावी पाकिस्तानात जर उपासमार होऊ लागली तर त्यामुळे जो उद्रेक होईल त्याची झळ भारतालादेखील सोसावी लागेल असा एकूण हा विचार आहे. भारताने नुकताच पाकिस्तानला मार दिला. पण त्याचा काय परिणाम झाला? तिथे विजयोत्सव साजरा करून हारलेल्या जनरलची पदोन्नती करून त्याला फिल्ड मार्शल हे सर्वोच्च सन्मानाचे पद बहाल करण्यात आले. आता त्यांच्याकडे अधिक प्रभावी डिफेन्स सिस्टिम व मिसाईल खरेदी करण्याच्या गोष्टी त्यांचे विश्लेषक करीत आहेत. अजूनही त्यांना हे भान आलेले दिसत नाही की आपला देश कर्जबाजारी झालेला असताना भारतद्वेष थांबवून अंतर्गत आर्थिक सुधारणा करण्यावर भर दिला पाहिजे. गरीब राहू, मार खाऊ, पण भारतात कारवाया करतच राहू हे त्यांचे धोरण आहे. त्यामुळे पाकिस्तान गरीब राहिला तरी वैर करतच राहणार आणि आपण दयाळूपणे पाणी देत राहिलो तरी त्यातून निर्माण होणारा पैसा वापरून उलट आणखी कुरापती वाढवणार. त्यामुळे अधूनमधून पाकिस्तानची खुमखुमी जिरवतच राहावे लागेल. म्हणूनच आपण पाकिस्तानला पाणी देत राहून त्यांच्याकडील स्थैर्याची चिंता करण्याचे काही कारण नाही.

**रवींद्र पंडित**/ ८४२४९८४३५०

### नदीजोड प्रकल्पात वाशीम जिल्ह्याचा समावेश करा

महाराष्ट्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेत नदीजोड प्रकल्प ही एक प्रमुख योजना आहे. या प्रकल्पांतर्गत विदर्भातील वैनगंगा, नळगंगा पैनगंगा या नद्या जोडून विदर्भातील नागपूर, अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला, बुलढाणा, वाशीम या जिल्ह्यातील लाखो हेक्टर जमीन सिंचनाखाली येत आहे. त्याचप्रमाणे पिण्याच्या पाण्याचा महत्त्वाचा प्रश्न या प्रकल्पामुळे निकाली निघणार आहे. याशिवाय या प्रकल्पामुळे निरनिराळे उद्योग उभारून रोजगाराचा प्रश्न पण सुटत आहे. त्यामुळे या जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये, युवकांमध्ये एक सकारात्मक ऊर्जा निर्माण झाली आहे. प्रत्येक जण या प्रकल्पाचे कालवे कसे कसे जातील याचे मनामध्ये आराखडे बांधत आहे. महत्त्वाचे म्हणजे या प्रकल्पाचे काम युद्धपातळीवर सुरू होत आहे. परंतु विदर्भातील इतर जिल्ह्यांप्रमाणे वाशीम जिल्ह्याला तेवढे झुकते माप दिसत नाही. कारण या प्रकल्पामध्ये वाशीम जिल्ह्याचा नंतर समावेश झाला आहे असे वाचण्यात आले. वास्तविक पाहता वाशीम जिल्ह्यामध्ये पैनगंगा ही प्रमुख नदी आहे. या नदीचा उगम अजिंठा डोंगरांमध्ये उगम होऊन ती मेहकर तालुक्यातून वाशीम जिल्ह्यात प्रवेश करताना पश्चिम पूर्व अशी वाहते व या नदीच्या उत्तर आणि दक्षिण या दोन्ही दिशेला शेतकऱ्याची लाखो हेक्टर जमीन आहे. विशेष म्हणजे यामध्ये प्रामुख्याने वाशीम जिल्ह्यातील संपूर्ण रिसोड तालुक्याचा समावेश होतो. या तालुक्यातील जवळपास १०० लहान-मोठ्या खेड्यांचा समावेश होतो आणि प्रत्येक खेड्याला छोट्या मोठ्या नद्या आहेत. परंतु या नद्यांना पावसाळ्याशिवाय इतर ऋतूत पाणीच राहत नाही. तेव्हा या प्रकल्पाचे काम सुरू होताना स्थानिक लोकप्रतिनिधी व इतर शेतकऱ्यांनी यामध्ये लक्ष घालून संपूर्ण वाशीम जिल्ह्याला या नदीजोड प्रकल्पाचा कसा फायदा होईल हे शासनाच्या निदर्शनास आणून द्यावे, जेणेकरून संपूर्ण वाशीम जिल्हा या प्रकल्पामुळे सुजलाम् सुफलाम् होईल.

**धनंजय पांडे**/ ९४०४९१७८४७

### मंदिरे श्रद्धेसोबत विकासाचेही केंद्रे

मंदिर हा शब्द उच्चारला तरीही मनाला शांतता, स्थिरता आणि आनंदाची अनुभूती प्राप्त होते. मंदिरे केवळ मनःशांती देत नाही तर जीवन सकारात्मकतेने जगण्यासाठी ऊर्जा देतात. तसेच समाज आणि राष्ट्राच्या विकासात आणि संकटात महत्त्वाची भूमिका बजावतात. याची अनेक उदाहरणे देता येतील. परंतु आज श्री काशी विश्वनाथ मंदिराविषयी बघू. श्री काशी विश्वनाथ मंदिरात २४ वर्षांत १२ पट भाविकांची संध्या वाढली आणि तेथील संपत्तीचा स्रोतसुद्धा चारपट वाढला. हे धन समाजोपयोगी कार्यात वापरण्यात आले. उदाहरणार्थ सात नवीन उड्डाणपूल, तीन रिंगरोड, दोन चारपदरी रस्त्यांची निर्मिती करण्यात आली. त्यामुळे काशीसह आजूबाजूचे जिल्हे व अन्य राज्यांशी संपर्क सुलभ झाला. शहरातही नवीन उड्डाणपूल बांधण्यात आले. त्यामुळे दळणवळणाच्या अडचणी दूर झाल्या. २४ वर्षांपूर्वीच्या काशीत आणि आताच्या काशीत हायटेक बदल झालेला आहे. पूर्वी जिथे केवळ सामान्य आजारांवर उपचार होत होते, तिथे आज सीटी स्कॅन, एमआरआयसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. रुग्णांना फिरावे लागत नाही. सांगण्याचे तात्पर्य हेच की, आज तेथे औद्योगीकरण, दळणवळण आणि आरोग्यसेवा यामध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. आज काशीची ओळख केवळ धार्मिक नगरी म्हणून राहिलेली नाही. इथे लक्षात घेण्याचा मुद्दा हा की, तिथे झालेल्या आमूलाग्र परिवर्तनात लागणारे धन मंदिराच्या दानपेटीतील होते. हे केवळ एका मंदिराचे उदाहरण आहे. इतर ठिकाणीही अशा प्रकारचे प्रयत्न होत असतात. त्यामुळे मंदिरामुळे केवळ श्रद्धा नव्हे, तर देशाच्या अर्थव्यवस्थेलाही चालना मिळते आणि मंदिरांचा देशाच्या विकासात मोठा वाटा आहे, हे सिद्ध होते. ▮

**प्रिया बागडदेव**/ छिंदवाडा

## महत्वाचे...



## विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी जैन समाजातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा : ललित गांधी

**सोलापूर, दि.२९ मे-**

शैक्षणिक विद्यार्थ्यांना अल्पसंख्यांकांची कुठलीही माहिती नाही. त्याचे मिळणारे सवलतीची माहिती घेताना त्यांना अनेक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते. त्यांच्यासाठी वेगळे कार्यालय करण्यात यावे, अशी मागणी भारतीय जैन संघटनेचे राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील यांनी केली आहे. अल्पसंख्यांक विभाग विकास महामंडळाचे राज्याध्यक्ष ललित गांधी हे सोलापूर दौऱ्यावर आले असताना त्यांना एका निवेदनाद्वारे ही मागणी करण्यात आली. यावेळी भारतीय जैन संघटनेचे केतन शहा, प्रशांत वर्धमाने, अशोक भालेराव, सुहास छंचुरे, ऋषिकेश कोंडेकर, किशोर जैन, अभिनंदन विभूते, कोमल पाचोरे देवेंद्र षटगार, माया पाटील, पंकजा पंडित, सुजाता देशमाने आदींची उपस्थिती होती. यावेळी गांधी म्हणाले, याचा विचार करण्यात येईल. परंतु अल्पसंख्यांकाच्या योजनेची विद्यार्थ्यांना माहिती करून देण्यासाठी समाजातील कार्यकर्त्यांनी पुढाकार घ्यावा. असे आव्हानही त्यांनी केले.



## माता रमाई यांच्या स्मृती दिनानिमित्त आयडल्स संस्थेतर्फे अभिवादन

**सोलापूर, दि.२९ मे-**

आयडल्स बहुउद्देशीय सामाजिक संस्था संपर्क कार्यालय कस्तुरबा मार्केट येथे त्यागमुर्ती माता रमाई भिमराव आंबेडकर यांच्या स्मुर्ती दिनानिमित्त आयडल्स बहुउद्देशीय सामाजिक संस्थेतर्फे अभिवादन करण्यात आले. यावेळेस आयडल्स बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कुणाल भैय्या बाबरे व प्रशांत शिंदे यांच्या वतीने माता रमाई यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून सामुदायिक बुद्ध वंदना घेण्यात आली. यावेळेस उत्सव अध्यक्ष श्रीशैल हिरेमठ ,ड राज बाबरे ,शेरा तुळसे ,सुमित बाबरे , पियूष दावणे, रोहन गायकवाड यांची उपस्थिती होती.



## स्वातंत्र्यवीर सावरकर यांना मनपा प्राथमिक शिक्षण मंडळात अभिवादन

**सोलापूर, दि.२९ मे-**

महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे मुख्य लिपिक माहेजबीन शेख यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मनपा प्राथमिक शिक्षण मंडळाचे लेखापाल मल्लिकार्जुन हिरेमठ, पर्यवेक्षक मनीष बांगर, भगवान मुंडे, सुरेश कासार, निलोफर सय्यद, सुवर्णा गुरव, रूपाली कंची, मीनाक्षी कानडे, महेश वालावलकर,सारंग अंजीखाने, ताहीर बिराजदार, अविनाश शिंदे, भगवान गायकवाड, गुरुप्रसाद तलवार, दत्तात्रेय सोनवणे, सचिन जाधवर, प्रशांत साठे, नागेश जगदाळे,अमोल दस, भालचंद्र साखरे, सचिन साखरे, सायली ढोले आदी उपस्थित होते.



## महापालिकेच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांना अभिवादन

**सोलापूर, दि.२९ मे-**

सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या जयंती निमित्त श्री मार्कंडेय उद्यान येथील स्वातंत्र्यवीर वि.दा सावरकर यांच्या पुतळ्यास आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त मनीषा मगर,कामगार कल्याण व जनसंपर्क अधिकारी ओम प्रकाश वाघमारे विभागीय अधिकारी महेश क्षीरसागर,भाजप शहर अध्यक्ष रोहिणी तडवळकर, माजी महापौर श्रीकांचना यन्नम, विश्वनाथ बेंद्रे, श्रीनिवास करली,पांडुरंग दिड्डी, रामचंद्र जन्नू, प्रशांत बडवे, श्री बिरू, विजय पुकाळे, नागेश सरगम, मनोज कलशेट्टी आदी मान्यवर उपस्थित होते. कौन्सिल हॉल येथील कार्यालयात स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांच्या प्रतिमेस सहाय्यक आयुक्त मनीषा मगर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी नितीन गायकवाड, महादेव येळे,शुभम चव्हाण, सचिन पोरे, अशोक खडके, सिद्धू तिमिगार आदी मान्यवर उपस्थित होते.

# श्रीरामलिंग चौडेश्वरी देवीच्या यात्रेची मिरवणुकीने सांगता

### यात्रा उत्सवकाळात पुरणपोळी, आमरस नैवेद्य देण्याची प्रथा, भक्त करतात दांडा अर्पण

### पारंपरिक नृत्य, लाठीकाठी खेळाचे ठरले विशेष आकर्षण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

श्री रामलिंग चौडेश्वरी यात्रेनिमित्त शुक्रवार पेठेतील मंदिरातून चौडेश्वरी देवीची मिरवणूक निघाली. भर पावसातही भक्तांचा उत्साह पाहण्यासारखा होता. शुक्रवारपेठ, माणिक चौक, चाटी गल्ली, शेटेवाडा आदी भागातून ही मिरवणूक निघाली. पावसाची संततधार असतानाही चौडेश्वरी देवीचा कुणकी खेळ (नृत्य), लाठी काठी खेळ, पैसे, खारीक घेण्याचा खेळ, काठीचा मिळणारा प्रसाद असे खेळ सादरीकरण झाले.

महिलांकडून देवीची ओटीभरण करण्यात आले. पावसातही मिरवणूक ठरलेल्या मार्गावरून, परंपरा जपत काढण्यात आली, हे वैशीष्ट्य पाहायला मिळाले. चौडेश्वरी मंदिरात सकाळपासूनच दर्शनासाठी रिघ लागली होती. देवीला पुरणपोळी, आमरस नैवेद्य देण्याची प्रथा आहे. भाविक देवीसाठी दांडा अर्पण करतात. पुरणपोळीचा नैवेद्य, गहू अर्पण करतात. सायंकाळी पाच वाजता मंदिरातून मिरवणूक निघाली.

चंद्रकांत अंबलगी, शिवशरण पायानी (मदन हिप्परगा), चिदंबर सराफ यांनी देवीचा मका (मुखवटा) परिधान केला होता. शुक्रवार पेठ, माणिक चौक, चाटी गल्ली भागातून देवीची मिरवणूक निघाली. कुणकी (नृत्य) पाहण्यासाठी भाविकांची गर्दी मोठी होती. प्रत्येकाच्या घरासमोर देवीचे ओटीभरण होते. सायंकाळी यात्रेचा समारोप झाला.

मंदिराचे ट्रस्टी अध्यक्ष ॲड. काशिनाथ रूगे, सचिव गुरुनाथ निंबाळे, खजिनदार-बसवराज चितली, नागेश कणगी, अमर महेत्रे यांच्यासह विविध मान्यवर सदस्य, पदाधिकारी यांनी नियोजन केले होते.माणिक चौकातील आजोबा गणपती मंदिरासमोर बैंड व सनईच्या तालावर हा कुणकी नृत्याचा खेळ झाला. मंदिर व शेटे वाड्याजवळ पैसे, खोबरं, खारीक एका जागी ठेवतात. ते भाविक घेताना देवी तिच्या हातातील छडीने साहित्य घ्यायला विरोध करते. कडीआटा (काठी खेळ) असे पारंपरिक खेळ याप्रसंगी साजरे झाले. शुक्रवार पेठेत सदानंद मैंदर्गी यांच्या घरी माहेरची ओटी भरण्याचा मान आहे. त्यानुसार चौडेश्वरी देवी त्यांच्या घरी जाऊन माहेरचा पाहुणचार घेतला. ओटी भरण्यात आली. मिरवणूकीवेळी भाविकांनी अतिशय श्रद्धेने देवीची ओटी भरली.

> **भक्तांच्या नवसाला पावणारी देवी**
>
> चौडेश्वरी देवी जागृत आहे. दर शुक्रवारी, मंगळवारी, पौर्णिमा, अमावास्येला भाविकांची गर्दी असते. मंदिरात मूर्तीला बाशिंग बांधण्याची प्रथा आहे. ज्यांचे लग्न ठरत नाही असे भाविक मंदिरात बाशिंग बांधतात, मनोकामना पूर्ण होते, अशी प्रथा व येथील भक्तांची श्रध्दा आहे. अनेक भक्तांच्या नवसाला पावणारी देवी म्हणून भाविकांची श्रध्दा आहे. कणगी परिवाराची तिसरी पिढी मंदिरात पुजारी म्हणून सेवा देत आहे.
>
> **-शिवानंद कणगी, मुख्य पुजारी मंदिर**

# शीतसाखळी प्रकल्प अन् कांदा चाळीसाठी लक्षांक प्राप्त

### जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी भोसले



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

सोलापूर जिल्ह्यात प्राथमिक प्रक्रिया केंद्र, एकात्मिक शीतसाखळी प्रकल्प व कांदाचाळ या घटकांसाठी लक्षांक प्राप्त झालेला आहे. एकात्मिक काढणीपश्चात व्यवस्थापन अंतर्गत प्राथमिक प्रक्रिया केंद्र या घटकासाठी (एमआयडीएच योजनेच्या इतर घटकांसोबत जोडलेला असावा.) खर्च मर्यादा रुपये ३५ लाख प्रति युनिट असून, अनुदान मर्यादा ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी ३५ टक्के व कमाल रुपये १२ लाख २५ हजार आणि अनुसूचित क्षेत्रासाठी ५० टक्के व कमाल रुपये १७ लाख ५० हजार बँक कर्जाशी निगडीत असेल. तसेच एकात्मिक शीतसाखळी प्रकल्पासाठी खर्च मर्यादा रुपये १० कोटी प्रति प्रकल्प, ग्राह्य भांडवली खर्चाच्या सर्वसाधारण क्षेत्रासाठी ३५ टक्के व कमाल रुपये ३ कोटी ५० लाख आणि अनुसूचित क्षेत्रासाठी ५० टक्के व कमाल रुपये ५ कोटी बँक कर्जाशी निगडीत असल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शुक्राचार्य भोसले यांनी दिली.

राज्याच्या कृषी उत्पादनात फलोत्पादन पिकांचा महत्वाचा वाटा आहे. फलोत्पादन पिकांचे मुल्यवर्धन प्रक्रिया करून शीतगृहांमध्ये साठवणूक करून फलोत्पादन पिकांचे पदार्थ वर्षभर सर्व हंगामात उपलब्ध होऊ शकतात. यासाठी काढणीपश्चात व्यवस्थापन कार्यक्रम, पणन सुविधा व प्रक्रिया प्रकल्प उभारणीसाठी शासनाकडून अर्थसहाय्य देण्यात येते. काढणी पश्चात व्यवस्थापन कार्यक्रम पणन सुविधा व प्रक्रियांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध घटकांचा लाभ घेण्यासाठी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर संकेतस्थळावर फलोउत्पादन या घटकाखाली अर्ज करावेत, असे आवाहन भोसले यांनी केले आहे.



# सोलापुरात जैन विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करणार

### वालचंदच्या भेटीप्रसंगी ललित गांधी यांची ग्वाही

**सोलापूर, दि.२९ मे-**

जैन समाजाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व करिअरविषयक मार्गदर्शन मिळावे यासाठी सोलापुरात स्वतंत्र 'जैन कक्ष' स्थापन करण्याचा संकल्प आहे. ''वालचंद संस्था म्हणजे केवळ शिक्षणसंस्था नव्हे, तर मूल्य, दृष्टिकोन आणि सामाजिक बांधिलकी यांचे प्रतीक आहे. अशा संस्थेशी जोडले जाणे, ही माझ्यासाठी गौरवाची बाब आहे,'' असे भावनिक उद्‌गार जैन आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ललित गांधीगांधी यांनी यावेळी व्यक्त केले.

वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीया संस्थेला त्यांनी दिलेल्या सदिच्छा भेटीनंतर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी वालचंद शिक्षण समूहाचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी यांनी त्यांचे स्वागत केले. या वेळी संस्थेचे विश्वस्त वैभव गांधी, पराग शहा, उद्योगपती संजीव पाटील, केतन शहा, सर्व प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच जैन समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली होती. मोठ्या संख्येने उपस्थित होते. '' ही संस्था महाराष्ट्रासह देशभरात गुणवत्तापूर्ण, संस्कारक्षम आणि आधुनिक शिक्षणासाठी ओळखली जाते. तिचा पाया घालणारे शेठ वालचंद हिराचंद हे केवळ यशस्वी उद्योगपती नव्हते, तर शिक्षणाच्या माध्यमातून समाज परिवर्तनाची दूरदृष्टी असलेले व्यक्तिमत्त्व होते,'' असे सांगून गांधी पुढे म्हणाले, ''मी ज्या चेंबर ऑफ कॉमर्सच्या अध्यक्षपदी आहे, त्याच संस्थेचे कधीकाळी शेठ वालचंदही अध्यक्ष होते, ही गोष्ट माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे.''

# २५ वर्षांनी जुन्या आठवणींना दिला उजाळा

### लोकसेवा हायस्कूलमधील दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

येथील लोकसेवा हायस्कूलच्या २००० सालच्या दहावी बॅचचे विद्यार्थी २५ वर्षांनी एकत्र येत जुन्या आठवणींना उजाळा दिला. सोलापुरातील महालक्ष्मी हॉल येथे रविवार (दि.२५) रोजी माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

शहरातील लोकसेवा हायस्कूल येथील २००० सालच्या दहावी बॅचचे विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास प्रशालेच्या माजी मुख्याध्यापिका जेरे, तांबोळकर, खजूरकर, धोत्रे, अंगडी, कांबळे, कोडमूर, चौगुले, बागल, चव्हाण यांच्यासह आदी शिक्षकांची प्रमुख उपस्थिती व २०० माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

यावेळी चौगुले, सालपे, कोडमुर, उपरे, तावसे, चव्हाण, माविनमर यांच्यासह अन्य शिक्षकांनी माजी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. तसेच परदेशातून शरद बागल, ज्योती विजापूरे, प्रशांत तेल्लूर या माजी विद्यार्थ्यांनीही कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. माजी विद्यार्थी मेळाव्यात सर्व विद्यार्थ्यांनी शाळेतील गप्पा गोष्टी, खेळ, अभ्यास, एकत्रित डबा खाणे, शाळेतील सहल अशा विविध जुन्या आवठणींना उजाळा दिल्या. कार्यक्रमानंतर सर्व उपस्थित गुरुजणांसह माजी विद्यार्थ्यांनी स्नेह भोजनाचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक रेखा बनसोडे यांनी केले. सूत्रसंचालन रघुनाथ चिटकीन यांनी तर आभार विवेक शिंगे यांनी मानले. मेळावा यशस्वितेसाठी रघुनंदन चिटकेन, शिवराज मोने, विवेक शिंगे, योगेश पाटील, पुरुषोत्तम गुंड, मधुकर शेराल, संगीता निंबाळकर, रुपाली बसुदे, वर्षा होमकर यांनी परिश्रम घेतले.

> **या शिक्षकांनी दिल्या शुभेच्छा**
>
> नलावडे, होटकर, कोतवाल, मुल्ला, इंगळे, जहागीरदार, कंजारे, कोष्टी, हिरेमठ, एन.डी. जाधव, अनिल धोत्रे, सुनील धोत्रे, नलावडे, सुरेश देवकर यांनी कार्यक्रमासाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत.


**जाहीर प्रसिध्दीकरण**

तमाम लोकांना कळविण्यात येते की, डिस्ट्रिक्ट व सब डिस्ट्रिक्ट सोलापूर महानगरपालिका सोलापूर शहर हद्दीतील न्यु पाच्छा पेठ हद्दीतील लक्ष्मी नरसिंह झोपडपट्टीमधील म्यु घर नं. १०, यांसी मिळकत क्र. ०८०९३०१९२७, यांसी एकूण क्षेत्रफळ २५० चौ. फूट इतकी असून सदरची मिळकत ही मूळतः आमचे अशिल नं. १ इरफान शेखअली मुलाणी यांचे आजोबा साहेबलाल गुलाबअहमद मुलाणी यांचे मालकीची होती. साहेबलाल गुलाबअहमद मुलाणी यांचे दि. १४/०२/१९९९ रोजी निधन झाले आहे. अशिल नं. १ इरफान शेखअली मुलाणी यांचे वडिल शेखअली साहेब मुलाणी यांचेही दि. ०३/०२/२०१० रोजी निधन झालेले आहे. साहेबलाल गुलाबअहमद मुलाणी यांना आमचे अशिल नं. १ इरफान शेखअली मुलाणी, २. मुलअहमद शेखअली मुलाणी व ३. नगमा अस्लम शेख असे वारसदार आहेत.

ज्याअर्थी वर कलम १ मध्ये नमूद केलेली मिळकत ही मूळतः साहेबलाल गुलाबअहमद मुलाणी यांच्या कब्जे वहिवाटीची होती. वर नमूद मिळकतीचे मयताच्या पश्चात आमचे अशिल नं.१ ते ३ हेच वारसदार आहेत. तरी नमूद केलेल्या मिळकतीच्या ग.व.सु. च्या कर आकारणी दप्तरी मयत साहेबलाल गुलाबअहमद मुलाणी यांचे नाव कमी करून आमचे अशिलांची नावाची नोंद करण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी तमाम लोकांना विशेषतः जिल्हा सोलापूर शहर सोलापूर लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, जाहीर नोटीस प्रसिध्द केल्यानंतर ०८ दिवसांचे आत मयत साहेबलाल गुलाब अहमद मुलाणी यांचे वारसदारांचे नावे वर नमूद मिळकतींस नोंद करण्यासाठी कोणाचीही व कसलीही हरकत अथवा तक्रार असल्यास याखाली नमूद विधिज्ञ यांचे पत्यावर लेखी स्वरूपात पुराव्यानिशी सादर करावी. ही जाहीर नोटीस दिली ता. २९/०५/२०२५.

सही/-
ॲड दिपाली बी. मडूर
बी.ए., एल एल. बी.,
पदमाई निवास, प्लॉट नं.३३,
आदर्श नगर, सोलापूर ९८२३४३०२२२
अशिलातर्फे ॲडव्होकेट



**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
**पुरवठा, स्थापना आणि विविध इतर कामे**

विभागीय रेल्वे व्यवस्थापक (काम),भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने मध्य रेल्वे, सोलापूर, खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/ठेकेदारांकडून ई-निविदा मागवत आहेत : **(1) निविदा सूचना क्रमांक : 06-2025-SrDENCo. कामाचे नाव :** सोलापूर विभाग - GFL-78 क्रमांकांचा पुरवठा आणि स्थापना. **कामाची अंदाजे किंमत:** 12,15,69,552/-. **बकाना रक्कम:** 7,57,900/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 60 महिने. **देखभाल खर्च:** 60 महिने. **(2) निविदा सूचना क्रमांक:** 07-2025-सिडेंको. **कामाचे नाव :** कव्हर शेड, नैसर्गिक गटार, रिटेनिंग वॉलचा विस्तार आणि इतर विविध सुविधांसाठी उर्वरित ठणइ काम. DEN/T/SUR आणि ADEN/KLBG विभागांतर्गत काम करते. **कामाची अंदाजे किंमत :** 22,06,75,626.85. **बकाया रक्कम :** 12,53,400/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 12 महिने. **देखभाल कालावधी :** 12 महिने. **(3) निविदा सूचना क्रमांक :** 08-2025-SrDENCO. **कामाचे नाव :** नैसर्गिक नाल्यांची व्यवस्था, रिटेनिंग वॉलचा विस्तार आणि DEN/KWV आणि ADEN/PVR विभागांतर्गत इतर विविध कामांसाठी RUB चे उर्वरित काम. **कामाची अंदाजे किंमत:** 20,38,48,220.21. **बकाया रक्कम :** 11,69,300/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 12 महिने. **देखभालीचा कालावधी :** 12 महिने. **(४) निविदा सूचना क्रमांक :** 09-2025-सिडेंको. **कामाचे नाव :** DEN/LUR आणि ADEN/PVR विभागांतर्गत कव्हर शेड, नैसर्गिक नाले, रिटेनिंग वॉलचा विस्तार आणि इतर विविध कामांसाठी RUBS चे उर्वरित काम. **कामाची अंदाजे किंमत:** 20,19,42,026.21. **बकाया रक्कम :** 11,59,800/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 12 महिने. **देखभालीचा कालावधी :** 12 महिने. **(5) निविदा सूचना क्रमांक:** 10-2025-सिडेंको. **कामाचे नाव:** ADEN/PVR विभागांतर्गत कव्हर शेड, नैसर्गिक नाले, रिटेनिंग वॉलचा विस्तार आणि इतर विविध कामांसाठी RUBS चे उर्वरित काम. **कामाची अंदाजे किंमत :** रु.22,83,89,848.25. **बक्षिसे:** 12,82,000/-. **काम पूर्ण करण्याचा कालावधी:** 12 महिने. **देखभाल कालावधी:** 12 महिने. **www.ireps.gov.in वेबसाइटवर कोट केलेल्या निविदा अपलोड करण्याची अंतिम तारीख आणि वेळ:** 18/06/2025 दुपारी 3.00 वाजेपर्यंत. **www.ireps.gov.in वर निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ:** 18/06/2025 दुपारी 3.30 वाजेपर्यंत. संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत कोणतेही बदल/शुद्धीपत्रक जारी केले आहे ते लक्षात घेता येईल. वेबसाइट: **www.ireps.gov.in**

डीआरएम (पश्चिम)
सोलापूर

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है
Sai/SUR/48



यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India
क्षेत्रीय कार्यालय – अहमदनगर
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहिल्यानगर – ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला भाळवणी गाव, ता. पंढरपुर, जि. सोलापूर शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर सर्व सुविधा असलेली १२०० स्क्वे फुट (+ – १०%) कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेची वेबसाईट www.unionbankofindia.co.in / गव्हर्नमेंट्स ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in वर उपलब्ध आहे. इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. २०/०६/२०२५ दुपारी ४.०० वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. २९/०५/२०२५ अहिल्यानगर
क्षेत्रीय प्रमुख
क्षेत्रीय कार्यालय, अहमदनगर
ARL



**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम जनतेस व विशेषतः सोलापूर शहर येथील नागरिकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन डि व सब डि सोलापूर तालुका उत्तर सोलापूर पैकी, शहर सोलापूर महानगरपालिकेच्या हद्दवाढ भागातील प्रताप नगर विभागातील वैष्णवी वुड्स फेज-२ए या नावाने ओळखले जाणारे नगरामधील गट नं. ७/१ पैकी प्लॉट नं. ६ याचे क्षेत्र १०३. ५० चौ.मी. आणि प्लॉट नं. ७ याचे क्षेत्र १०३. ५० चौ.मी इतके असून यातील प्लॉट नं. ६ यांसी चतुः सिमा :- पूर्वेसः ९.०० मी रुंदीचा रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १५, दक्षिणेसः प्लॉट नं.७, उत्तरेसः प्लॉट नं. ५ आहे, आणि प्लॉट नं. ७ यांसी चतुः सिमा : पूर्वेसः ९.०० मी रुंदीचा रस्ता, पश्चिमेसः प्लॉट नं. १४, दक्षिणेसः प्लॉट नं.८, उत्तरेसः प्लॉट नं. ६ येणे प्रमाणे चतुः सिमेतील संपूर्ण मिळकत तद्रभूत वस्तुसह व वहिवाटीच्या सर्व हक्कासहची ही १) श्री. संभाजी रघुनाथ तुपे रा. बंगलोर २) श्री. यशवर्धन नितीन तुपे ३) श्री. धनंजय निवृत्ती थिटे ४) श्री. जितेंद्र दिलीप शिंदे ५) श्री. अनिल रामलिंग रेड्डी चौघे रा. पुणे यांच्या मालकीची आहे. तथापी या सर्वांनी सदर मिळकतीचे संपूर्ण देखरेख, व्यवहार करण्याचे अधिकार कुलमुखत्यार दस्त क्रमांक १४७६३ दिनांकः- १९/०६/२०२४ ने श्री. अभिषेक पूर्णचंद्र राव रा. सोलापूर यांना दिलेले आहे. सदरच्या कुलमुखत्यार दस्तने कुलमुखत्यार धाकर म्हणुन वरील सर्व व्यक्तीची मान्यता घेऊन सदर मिळकत हि आमचे अशिल ९. श्री संजय वसंतराव झिंगाडे २. सौ. सरोजना संजय झिंगाडे ३. श्री आकाश संजय झिंगाडे, सर्व रा. सोलापूर यांना कायम खुषखरेदी करुन देण्याचे ठरवून इसारा दस्त करून रक्कम स्विकारलेली आहे. सदरचे मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याचे हमी व खात्री कुलमुखत्यार धारक यांनी आमचे अशिलांना दिलेली आहे.

तरी वर नमूद मिळकतीबाबत कोणाचाही काहीही हरकत, हक्क व हितसंबंध, दान, लिज, टाच, गहाण, बैंक जसी, बोजा, खाजगी सावकारी, साठेखत, खरेदीखत, कब्जेपावती, पोटगी व इतर हक्क प्रस्थापित असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत कागदोपत्रासह, विहित मुदतीत लेखी म्हणणे व कागदपत्रे सादर करावे व स्वतःची हरकत, तक्रार नोंदवावे. सदर नमूद मुदतीत कोणाचाही कसलीही हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राहय धरुन आमचे अशिल हे सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मग त्यानंतर कोणाचेही तक्रार किंवा हरकत चालणार नाही व ते आमचे अशिलांच्या हक्कावर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी. **ही खरेदीपूर्व जाहीर नोटीस दिली दि. ३०/०५/२०२५.**

सही/-
ॲड. एफ.एस. कडेचुर
B.A.LLB.LLM
प्लॉट नं. ०१, मुमताज नगर, कुमठा नाका, सोलापूर - ४१३००६.
मो. ९८९०३९८४५५
(अशिलातर्फे ॲडव्होकेट)



**मध्य रेल्वे**
सोलापुर मंडळ
**ई-टेंडर सूचना**

सिनीअर डिव्हिजनल इलेक्ट्रिकल इंजिनिअर, जनरल, सेंट्रल रेल्वे, सोलापूर, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वे ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि पात्रताधारक इलेक्ट्रिकल कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-टेंडर आमंत्रित करत आहेत. **निविदा क्रमांक:** SUR/L/T/2024/30R1. **कामाचे नाव:** वाडी यार्डला 'अ' वर्ग म [illegible] इलेक्ट्रिकल जनरल सर्व्हिस भाग. (पुनर्निविदा) **ऑफरची वैधता:** 60 दिवस. **वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ :** 23/06/2025 दुपारी 3.00 वाजता. बोली सुरक्षा खर्च **www.ireps.gov.in** वेबसाइटवर ई-पेमेंटद्वारे भरला जाईल. **अंदाजे खर्चः** रु.1,17,77,433.48. **बिल्ड सुरक्षाः** रु.2,08,900/-. **पूर्णता कालावधीः** 12 महिने.

वरिष्ठ डीईई (जनरल) सोलापूर

खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है
Sai/SUR/49



**सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**
**टेंडर नोटीस**

सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर या संस्थेस सन २०२५-२०२६ या वर्षाकरीता स्टेशनरी खरेदी करावयाची आहे व आवश्यक असणारी छपाई छापून घ्यावयाची आहे. तरी ज्यांना स्टेशनरीचे पुरवठा करावयाचा आहे व छपाई काम करावयाचे आहे त्यांनी आपली दरपत्रक दिनांक ६/६/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे मुख्य कार्यालयात आणून द्यावेत.

यासंबंधीची स्टेशनरी साहित्याची यादी तसेच छपाई यादी व छपाई नमुने सोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर मुख्य कार्यालय, श्री. सिध्देश्वर बाजार पेठ, हैद्राबाद रोड येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहे.

सही/-
सचिव सभापती
कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर

जा.नं. : स्टेशनरी व छपाई/६२१
दिनांक : २९/५/२०२५



महाराष्ट्र शासन
**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,**
सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर
सात रस्ता, कारीगर पेट्रोल पंपासमोर, सोलापूर ४१३ ००३

**निविदा सुचना क्रमांक ०१ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर हे महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडे निविदा पत्रात नमुद केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करीत असलेल्या कंत्राटदारांकडून खालील तारखेपासून बी-१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां. विभाग, सोलापूर यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| | |
|---|---|
| **निविदा उपलब्ध तारीख** | दि.३०/०५/२०२५ (वेळ सकाळी १०.०० वाजेपासून) ते दि.०६/०६/२०२५ (सायं.१८.१५ पर्यंत) |
| **निविदा पूर्व बैठक** | ----------- निरंक ----------- |
| **भरलेल्या निविदा सादर करण्याची तारीख** | दि.०६/०६/२०२५ (वेळ सकाळी १८.१५ वाजेपर्यंत) |
| **निविदा उघडण्याचे दिनांक, ठिकाण व वेळ** | दि.०९/०६/२०२५ (वेळ सकाळी ११.०० वाजता किंवा नंतर शक्य झाल्यास) मा. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांचे कार्यालयात |

**कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर कार्यालयातील सूचना फलक.**

(मनोज रा. ठाकरे)
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर

आरओसी-२०२५-२६/क्र.५/C८७७

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### जेसिका पेगुला, बुब्लिक तिसऱ्या फेरीत

**पॅरिस** : फ्रेंच ओपन टेनिस स्पर्धेत गुरुवारी रोलॅण्ड गॅरोस येथे जेसिका पेगुलाने अमेरिकन संघाचे नेतृत्व करत आपल्याच देशाची ॲन लीवर ६-३, ७-६(३) असा संघर्षपूर्ण विजय मिळवला आणि हंगामातील तिचा ३० वा सामना जिंकला. तृतीय विश्वमानांकित ३१ वर्षीय जेसिकाने आपल्या कारकिर्दीत तिसऱ्यांदा फ्रेंच ओपनच्या तिसऱ्या फेरीत प्रवेश केला. पुरुष विभागात ॲलेक्झांडर बुब्लिकने जोरदार मुसंडी मारत ९ व्या मानांकित ॲलेक्स डी मिनौरचा २-६, २-६, ६-४, ६-३, ६-२ असा पराभव केला आणि तिसऱ्या फेरीत आपले स्थान निश्चित केले. बुब्लिकने पाच सेटच्या रोमांचक पुनरागमन केले, रोलॅण्ड-गॅरोस २०२५ मधील आतापर्यंतच्या सर्वात उल्लेखनीय पुनरागमनांपैकी एक आहे. ६२ व्या मानांकित बुब्लिकचा पुढील सामना तिसऱ्या फेरीत पोर्तुगीज पात्रताधारक हेनरिक रोचाशी होईल. रोचाने अखेर तीन तासांपेक्षा जास्त काळ खेळताना मियामी एटीपी मास्टर्स विजेता जाकुब मेन्सिकला पाच सेटमध्ये २-६, १-६, ६-४, ६-३, ६-३ असे हरविले. जगातील २०० व्या क्रमांकावर असलेल्या आणि ग्रॅण्ड स्लॅम मुख्य ड्रॉमध्ये पदार्पण करणाऱ्या या तरुण पोर्तुगीज खेळाडूने दोन सेट पिछाडीवरून पुनरागमन करत पाच सेटमध्ये विजय मिळवला. ■

### भारतीय संघ कतार, बहरीन, ब्रुनेई दारुस्सलामविरुद्ध खेळणार

**क्वालालम्पूर** : एएफसी २३ वर्षांखालील आशियाई चषक पात्रता फेरी फुटबॉल सामन्यांचे वेळापत्रक गुरुवारी येथे जाहीर करण्यात आले असून भारतीय संघाचा गट एच मध्ये समावेश करण्यात आला आहे. या गटात भारतीय संघाचा सामना यजमान कतार, बहरीन व ब्रुनेई दारुस्सलाम यांच्याशी होईल. येथील एएफसी हाऊस येथे हा ड्रॉ काढण्यात आला. चार संघांपैकी सर्वोच्च मानांकित संघ कतार हा गट एच चे आयोजन करेल आणि त्याचे सामने १ ते ९ सप्टेंबर दरम्यान खेळवले जातील. एकूण ४४ संघांना प्रत्येकी चार संघांच्या ११ गटात विभागण्यात आले आहे. गट विजेते व चार सर्वोत्तम उपविजेते संघ, यजमान सौदी अरबसह, जानेवारी २०२६ मध्ये होणाऱ्या एएफसी २३ वर्षांखालील आशियाई चषकाच्या सातव्या आवृत्तीसाठी १६ संघांची निवड पूर्ण करतील. सोडतीसाठी सीडिंग स्पर्धेच्या मागील तीन आवृत्त्यांमधील संघांच्या अंतिम क्रमवारीतून घेतलेल्या गुण प्रणालीवर आधारित होती. भारताला गट क्रमांक ३ मध्ये स्थान देण्यात आले. भारताने यापूर्वी नौशाद मूसा यांना आपल्या २३ वर्षांखालील राष्ट्रीय संघाचे मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्त करण्यात आले होते. मूसा १ जूनपासून कोलकाता येथे प्रशिक्षण शिबिरासाठी येणार असून तेव्हापासून पदभार स्वीकारतील. त्यानंतर ते ताजिकिस्तान (१८ जून) आणि किर्गिस्तान प्रजासत्ताक (२१ जून) विरुद्ध दोन प्रदर्शनी सामने खेळण्यासाठी ताजिकिस्तानला रवाना होतील, असे अखिल भारतीय फुटबॉल महासंघाने (एआयएफएफ) सांगितले.

### ऑस्ट्रेलिया महिला संघ भारत दौऱ्यावर येणार

**मुंबई** : ऑस्ट्रेलियन महिला संघ सप्टेंबरमध्ये तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेसाठी भारताचा दौरा करणार आहे. ही मालिका महिला वन-डे विश्वचषकापूर्वी महत्त्वाची तयारी म्हणून काम करेल, अशी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) गुरुवारी पुष्टी केली. मालिकेतील पहिला वन-डे सामना १४ सप्टेंबर रोजी खेळला जाईल, त्यानंतर दुसरा आणि तिसरा सामना अनुक्रमे १७ आणि २० सप्टेंबर रोजी खेळला जाईल. चेन्नईच्या एम. ए. चिदम्बरम् स्टेडियमवर मालिकेतील तिन्ही सामने खेळविले जाणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील भारतीय संघ २८ जूनपासून इंग्लंडच्या दौऱ्याने विश्वचषकाच्या तयारीची सुरुवात करेल. सप्टेंबरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन सामन्यांच्या वन-डे मालिकेत खेळण्यापूर्वी भारत पाच टी-२० आणि तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये इंग्लंडशी सामना करणार आहे. ■

# गुजरात-मुंबईची आज कठीण परीक्षा

◆ **मुल्लानपूर, २९ मे**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स आणि हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखालील मुंबई इंडियन्स यांच्यादरम्यान एलिमिनेटर सामना खेळला जाणार आहे. या सामन्यातील विजयी संघ क्वॉलिफायर २ सामन्यात खेळण्यासाठी पात्र ठरेल. या विजयी संघाला अंतिम फेरी गाठण्यासाठी क्वॉलिफायर १ सामन्यातील पराभूत संघाविरुद्ध खेळावे लागणार आहे. क्वॉलिफायर १ सामन्यातील विजयी संघ थेट अंतिम फेरीत पोहोचेल.

विजेतेपदासाठी प्रबख दावेदारपैकी एक असलेल्या शुभमन गिलच्या गुजरात टायटन्सने आपली गती गमावली आहे, गुजरात टायटन्सने गत चार हंगामात तीन वेळा प्ले-ऑफमध्ये स्थान मिळवले आहे. २०२२ मध्ये पदार्पणात गुजरातने आयपीएल ट्रॉफी जिंकली आहे. तिकडे पाचवेळच्या विजेता बलाढ्य मुंबई इंडियन्स अजूनही काही समस्यांना तोंड देत आहेत.

तथापि, शुभमन गिल आणि हार्दिक पांड्या दोघांनाही सिद्ध करायचे आहे. टायटन्सने सर्वतोपरी प्रयत्न केल्यास गिल या नवनियुक्त भारतीय कसोटी संघ कर्णधाराच्या नेतृत्व कौशल्यात प्रचंड वाढ होईल. गत वर्षी संघात परतल्यानंतर हार्दिकला चाहत्यांचा प्रेम परत मिळाला आहे व आयपीएल ट्रॉफी फ्रॅन्चायझीच्या महान खेळाडूंच्या यादीत त्याचे स्थान पक्के करेल. पण त्यांच्या वैभवाच्या शोधात, दोन्ही कर्णधारांनी समोरील समस्या सोडवण्याचा मार्ग शोधला पाहिजे.

टायटन्सला प्ले-ऑफमध्ये जाण्यापूर्वी आपली गती कमी झाल्यामुळे त्यांना काळजी करण्याची अधिक गरज आहे. गत दोन पराभवांनंतर त्यांना आपल्या खेळात सुधारण करण्याची आवश्यकता आहे.

वेगवान गोलंदाज मोहम्मद सिराजला पॉवरप्लेमध्ये ब्रेकथ्रू मिळवून द्यावे लागतील. डावखुरा वेगवान गोलंदाज अर्शद खान नवीन चेंडूसह संघर्ष करत असल्यामुळे प्रसिध कृष्णासारख्या खेळाडूंवर दबाव वाढला आहे. कृष्णा या हंगामात २३ बळींसह टायटन्सचा हुकमी खेळाडू आहे.

वेगवान गोलंदाजीतील कमतरतांव्यतिरिक्त फिरकी गोलंदाज रशीद खानच्या अकार्यक्षमतेमुळे त्यांच्या गोलंदाजीची समस्या वाढली आहे. फलंदाजीच्या आघाडीवर साई सुदर्शन, गिल व जोस बटलरसह अव्वल तीन खेळाडूंनी आपल्या प्ले-ऑफ प्रवासात मोठे योगदान दिले.

साखळी फेरीनंतर राष्ट्रीय कर्तव्यासाठी निघालेल्या जोस बटलरची अनुपस्थिती निश्चितच जाणवेल. बटलरच्या जागी कुसल मेंडिसची निवड करण्यात आली आहे, पण तोही तितकाच आत्मविश्वास निर्माण करू शकतो का हे बघणे शिल्लक आहे.

शाहरुख खान व शेरफेन रदरफोर्डचा समावेश असलेला मधला खेळाडू सर्वात विश्वासार्ह नाही, त्यामुळे टायटन्स मुंबई इंडियन्सविरुद्ध असुरक्षित आहे.

टायटन्सप्रमाणेच, मुंबई इंडियन्सवरही परदेशी खेळाडूंच्या नुकसानीचा परिणाम झाला आहे. रोहित शर्मासोबत रेयान रिकेल्टनने त्यांच्यासाठी वरच्या क्रमांकावर चांगली कामगिरी केली होती, परंतु दक्षिण आफ्रिकेचा फलंदाज आता राष्ट्रीय कर्तव्यासाठी जात आहे. इंग्लंडचा फलंदाज विल जॅक्ससाठीही हेच आहे.

रिचर्ड ग्लीसन व चॅरिथ असलंका यांच्यासोबत मुंबई इंडियन्ससाठी बदली खेळाडूंपैकी एक म्हणून इंग्लंडचा फलंदाज जॉनी बेअरस्टोला संधी मिळाली नाही. रोहित शर्मासोबत अव्वल फलंदाजांच्या फळीत बेअरस्टो सलामीला येऊ शकतो. इंग्लंडचा खेळाडू निश्चितच डाव सुरू करण्याची अपेक्षा करेल. तिलक वर्माची संथ धावसंख्या ही संघासमोरील आणखी एक चिंता आहे.

सूर्यकुमार यादवने एका हंगामात विक्रमी ६४० धावा करून फलंदाजी विभागात मोठी कामगिरी केली आहे. जर तो अपयशी ठरला तर मुंबई इंडियन्ससमोर एक मोठे आव्हान असेल. प्रथम फलंदाजी करताना मुंबईच्या फलंदाजांच्या धावा किती वेगाने होतात यावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे व हार्दिकला यावर लक्ष केंद्रित करावे लागेल. तथापि, त्यांचा मजबूत गोलंदाजीचे आक्रमण नेहमीच प्रतिस्पर्धी संघासाठी मोठा धोका निर्माण करतो. ◂(वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**गुजरात टायटन्स वि. मुंबई इंडियन्स**
**स्थळ** : महाराजा यादविंद्रसिंग आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम, मुल्लानपूर
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर



# रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा अंतिम फेरीत प्रवेश

### पंजाब किंग्जचा ७ गडी राखून पराभव

**मोहाली, दि. २९ मे-**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ९ वर्षांनंतर आयपीएलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. गुरुवारी क्वालिफायर-१ मध्ये त्यांनी पंजाब किंग्जचा ८ गडी राखून पराभव केला. सलामीवीर फिल साल्टने अर्धशतक झळकावले. जोश हेझलवूड आणि सुयश शर्माने प्रत्येकी ३ गडी टिपले.

गुरुवारी न्यू चंदीगड येथील महाराजा यादवेंद्र सिंह स्टेडियमवर बंगळुरूने गोलंदाजीचा निर्णय घेतला. पंजाब किंग्ज १४.१ षटकात फक्त १०१ धावा करू शकले. मार्कस स्टोइनिसने २६ धावा केल्या. यश दयालने २ विकेट्स घेतल्या. आरसीबीने १० षटकात फक्त २ विकेट्स गमावून लक्ष्य गाठले.

बंगळुरूने चौथ्यांदा आयपीएलच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. संघाने २०१६ मध्ये शेवटचा विजेतेपद सामना खेळला होता, परंतु तो उपविजेता ठरला. आरसीबी आता ३ जून रोजी अहमदाबादमध्ये अंतिम सामना खेळेल. दुसरीकडे, पंजाब किंग्जचा सामना १ जून रोजी क्वालिफायर-२ मध्ये एलिमिनेटरच्या विजेत्याशी होईल. एलिमिनेटर शुक्रवारी मुंबई आणि गुजरात यांच्यात होईल.

# अविनाश साबळे, ज्योती याराजीला सुवर्ण

### आशियाई ॲथ्लेटिक्स

◆ **गुमी, २९ मे**

कोरियातील गुमी येथे सुरु असलेल्या आशियाई ॲथ्लेटिक्स स्पर्धेत गुरुवारी राष्ट्रीय विक्रमधारक अविनाश साबळेने ३००० मीटर स्टीपलचेसमध्ये सुवर्णपदक जिंकले. सुवर्णपदक जिंकणारा अविनाश हा ३६ वर्षांनंतरचा पहिला भारतीय पुरुष ठरला. ज्योती याराजीने नवीन स्पर्धा विक्रमासह सुवर्णपदक जिंकले. ज्योतीच्या सुवर्णपदकासह भारताचे या स्पर्धेत आतापर्यंत १० पदके झालीत, यात ४ सुवर्ण, ४ रौप्य आणि दोन कांस्यपदकांचा समावेश आहे.

दोन वेळचाा ऑलिम्पियन व आशियाई क्रीडा स्पर्धेचा विजेता असलेल्या ३० वर्षीय साबळेने ८:२०.९२ सेकंदात अंतिम रेषा ओलांडून विजय मिळवला. जपानच्या युतारो निने (८:२४.४१ सेकंद) याने रौप्यपदक, तर कतारच्या झकारिया एलाहलामीने





(८:२७.१२ सेकंद) कांस्यपदक जिंकले. साबळेने २०१९ च्या दोहा येथे झालेल्या आवृत्तीत रौप्यपदक जिंकले होते. तथापि, कोरियामधील त्याच्या कामगिरीमुळे तो हरबेल सिंग (१९७५) आणि दिना राम (१९८९) नंतर या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारा तिसराच खेळाडू ठरला आहे. २०२४ च्या पॅरिस ऑलिम्पिकमध्ये अविनाशने ८:१४.१८ सेकंद वेळ नोंदवत ११वे स्थान पटकावले होते, त्यामुळे त्याने सप्टेंबरमध्ये टोकियो येथे होणाऱ्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेसाठी ८:१५.०० सेकंदांचा प्रवेश मानक आधीच पूर्ण केला आहे.

**ज्योतीला स्पर्धा विक्रम नोंदवत १०० मीटर हर्डल्सचे सुवर्ण**

ज्योती याराजीने गुरुवारी आशियाई ॲथ्लेटिक्स स्पर्धेत महिलांच्या १०० मीटर अडथळ्यांमध्ये आपले सुवर्णपदक जिंकून नवा स्पर्धा विक्रम प्रस्थापित केला. ज्योतीने १२.९६ सेकंदांच्या वेळेसह सुवर्णपदक जिंकले. २०२३ मध्ये बँकॉक येथे झालेल्या मागील आवृत्तीतही तिने पहिले स्थान पटकावले होते. तिने जपानच्या युमी तनाकाने चीनच्या वू यान्नीला ०.००७ सेकंदांनी हरविले. युमीला रौप्यपदक मिळाले. ◂(वृत्तसंस्था)

### पंजाबला आयपीएल ट्रॉफी जिंकून देणे हेच ध्येय : अय्यर

**नवी दिल्ली** : पंजाब किंग्जला पहिल्यांदाच आयपीएल चषक जिंकून देण्यात मदत करणे, हे माझे ध्येय आहे, असे कर्णधार श्रेयस अय्यर म्हणाला. संघाच्या नव्या मानसिकतेबद्दल आणि संघाच्या जेतेपदाच्या दुष्काळाचा शेवट करण्यासाठी व आयपीएल ट्रॉफी घरी आणण्यासाठी आणि चाहत्यांना आनंद साजरा करण्यासाठी श्रेयसने हे प्रेरणादायी विधान केले. कोलकाता नाईट रायडर्स (केकेआर) साठी आयपीएल २०२४ विजेता कर्णधार अय्यरला गत वर्षीच्या लिलावात पंजाबने २६.७५ कोटी रुपयांना विकत घेतले. पंजाबने खर्च केलेला पैसा श्रेयस अय्यरने सार्थकी लावला, कारण संघाने अव्वल दोन क्रमांकामध्ये स्थान मिळवले आहे आणि २०१४ नंतर पहिल्यांदाच प्लेऑफमध्ये पोहोचला आहे. ■

# १९ व्या वाढदिवशी गुकेशची मुसंडी

**स्टॅव्हँजर (नॉर्वे), २९ मे**

विश्वविजेता डी. गुकेशने १९ व्या वाढदिवशी जोरदार मुसंडी मारून आपली मोहीम पुन्हा रुळावर आणली. गुरुवारी येथे नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेत तिसऱ्या फेरीत गुकेशने अमेरिकेच्या द्वितीय विश्वमानांकित हिकारू नाकामुराला हरवून आपले खाते उघडले.

या स्पर्धेत अर्जुन एरिगाईसीला पहिला पराभव पत्करावा लागला. पहिल्या दोन फेऱ्यांमध्ये प्रथम विश्वमानांकितक नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसन व देशबांधव अर्जुन एरिगाईसी यांच्याकडून सलग दोन पराभव पत्करणाऱ्या गुकेशने सर्वोत्तम रॅपिड आणि ब्लिट्झ खेळाडूंपैकी एक असलेल्या नाकामुराला ४२ चालींमध्ये डाव जिंकण्यासाठी वेळेच्या दबावाखाली आणले आणि तीन गुण मिळवले. या विजयाबरोबरच गुकेश चीनच्या प्रथम क्रमांकाच्या वेई यीपेक्षा पुढे गुणतालिकेत पाचव्या स्थानावर पोहोचला. सहा खेळाडूंच्या दुहेरी राऊंड रॉबिन स्पर्धेत गत दोन डावात सतत वेळेच्या दबावाखाली खेळणाऱ्या गुकेशने तिसऱ्या फेरीत पांढऱ्या तुकड्यांसह खेळताना नाकामुराला घड्याळाकडे पाहण्यास भाग पाडले. विजयाबद्दल मला खूप चांगले वाटत आहे. आज माझे वेळेचे व्यवस्थापन पूर्वीपेक्षा खूपच चांगले होते. नाकामुरा काही ड्रॉच्या संधी मिळाल्या होत्या, पण त्याने वाया घालवल्या, असे गुकेश म्हणाला. सलग दोन पराभवांनंतर गुकेशसाठी हा एक उल्लेखनीय लढाऊ प्रतिकार होता. (वृत्तसंस्था)

# केंद्रीय विद्यालयाच्या वंशिका चुंगीवाडीयारला तीन सुवर्ण

## केंद्रीय विद्यालयाच्या राज्यस्तर जलतरण स्पर्धेतील कामगिरी

**सोलापूर, दि. २९ मे-**

केंद्रीय विद्यालयाच्या राज्य जलतरण स्पर्धेत येथील केंद्रीय विद्यालयाच्या वंशिका चुंगीवाडीयार हिने तीन सुवर्ण तसेच संघटनेच्या स्पर्धेत वरिष्ठ गटात कास्य पदक पटकाविले.

केंद्रीय विद्यालयाच्या विलेपार्ले, गोरेगाव (मुंबई) येथे झालेल्या ५४ व्या राज्यस्तर जलतरण स्पर्धेत १७ वर्षाखालील गटामध्ये वंशिकाने एक मीटर स्प्रिंग बोर्ड, तीन मीटर स्प्रिंग बोर्ड व हायबोर्ड प्रकारात ही सुवर्ण कामगिरी केली. तसेच भारतीय जलतरण महासंघ आयोजित पवई (मुंबई) येथे झालेल्या राज्य जलतरण स्पर्धेत वरिष्ठ गटामध्ये दहा मीटर, डायव्हिंग हायबोर्ड



प्रकारात तिने कांस्यपदकाची कमाई केली.

वंशिकाला आंतरराष्ट्रीय जलतरण प्रशिक्षक श्रीकांत शेटे यांचे मार्गदर्शन लाभले. यश प्राप्त केल्याबद्दल तिचा जिल्हा क्रीडा अधिकारी नरेंद्र पवार यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे, नदीम शेख, प्रशिक्षक श्रीकांत शेटे,भीमराव बाळगे, इकबाल शेख, माजी क्रीडा अधिकारी सत्येन जाधव, मनोज बाळगे उपस्थित होते

# खेलो इंडिया तलवारबाजी स्पर्धेत दमाणी प्रशालेच्या दोघांना सुवर्ण

**सोलापूर, दि. २८ मे-**

राजगीर (बिहार) येथे झालेल्या खेलो इंडिया युथ गेम स्पर्धेत तलवारबाजी प्रकारात येथील बी. एफ. दमाणी प्रशालेच्या आदित्य निकते व प्रथमेश कस्तुरे यांनी सुवर्ण पदक पटकाविले. त्यांनी ईपी या सांघिक प्रकारात ही कामगिरी केली.

सोलापूर शहरातून या स्पर्धेसाठी या दोघांचीच निवड झाली होती. त्यांना प्रशिक्षक पवन भोसले यांचे मार्गदर्शन लाभले. श्री भोसले यांचीही महाराष्ट्राच्या तलवारबाजी संघाचे मार्गदर्शक म्हणून निवड झाली होती. विशेष कौतुकाची बाब म्हणजे चि. निकते



याने इयत्ता १० वी च्या बोर्ड परीक्षेमध्ये ९२.६०% गुण मिळविलेले आहेत. त्यांना संस्थेच्या वतीने पुढील सरावासाठी स्कॉड देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संस्थेचे सदस्य गिरिधारिजी भुतडा, स्थानीय अध्यक्ष कालिदासजी जाजू, सचिवा मंगलजी काबरा, सहसचिव उज्वलजी तापडिया, मुख्याध्यापिका रेखा पेंबर्ती, पर्यवेक्षक राहूल इंगळे आदी उपस्थित होते.

# पुण्याचा हेयान रेड्डी व मुंबईची गिरीशा पै विजेतेपदाचे मानकरी

### ''चॅम्पियन चषक'' ९ वर्षाखालील राज्यस्तरीय निवड बुद्धिबळ स्पर्धा

### लक्ष दिघे व अन्वी हिंगे यांना उपविजेतेपद

**सोलापूर, दि. २८ मे -**

''चॅम्पियन चषक'' एचटूई पॉवर सिस्टिम्स ९ वर्षाखालील खुला व मुलींच्या राज्यस्तरीय निवड चाचणी बुद्धिबळ स्पर्धेच्या अंतिम आठव्या फेरीनंतर मुलांच्या गटात पुण्याच्या हेयान रेड्डीने आठ पैकी साडेसात गुण करून अजिंक्यपद पटकाविले. त्याला रोख दोन हजार रुपये, आकर्षक चषक व मेडल्स देऊन गौरविण्यात आले. मुलींच्या गटात मुंबईच्या आंतरराष्ट्रीय गुनांकन प्राप्त खेळाडू गिरीशच्या पै हिने स्पर्धेमध्ये निर्विवाद वर्चस्व राखत आठ पैकी आठ गुण मिळवत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले. तसेच मुलांच्या गटात मुंबईच्या लक्ष दिघे याने सात गुणांसह तर मुलींच्या गटात पुण्याच्या अन्वी हिंगे हिने देखील सात गुणांसह स्पर्धेचे उपविजेतेपद प्राप्त केले.



महाराष्ट्राचे चेस असोसिएशन व सोलापूर डिस्ट्रिक्ट चेस असोसिएशन यांच्या मान्यतेने सोलापूर चेस अकॅडमीने आयोजित ही स्पर्धा गांधीनगर येथील द हेरिटेज येथे संपन्न झाली. स्पर्धेचा बक्षीस समारंभ द हेरिटेजचे व्यवस्थापक श्रवण कुमार, खुशी हजारे, संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड, प्रमुख पंच मुंबईचे आंतरराष्ट्रीय पंच संदेश नागरनाईक, राष्ट्रीय पंच संतोष पाटील, आंतरराष्ट्रीय गुनांकन प्राप्त अतुल कुलकर्णी, सुभाष उपासे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी सहायक वरिष्ठ राष्टीय पंच उदय वगरे, शशिकांत मक्तेदार, रोहिणी तुम्मा, युवराज पोगुल, भरत वडीशेरला, विजय पंगुडवाले, यश इंगळे, नवीना वडीशेरला, नागराज वडीशेरला यांना देखील गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यापीठ खेळाडू संतोष पाटील यांनी केले. अतिशय चुरशीने झालेल्या मुलांच्या गटात पुण्याचा गोरांक्ष खंडेलवाल व ठाण्याचा दक्ष राऊत या दोघांनी साडेसहा गुण प्राप्त केले. परंतु सरस टायब्रेकवर गोरांक्षने तिसरा तर दक्षने चौथा क्रमांक पटकाविला. मुलींच्या गटात मुंबईच्या सानामेरी पॉल, छत्रपती संभाजीनगरची प्रियल शिखरे व पुण्याची ऋत्वि हरपुडे यांचे देखील प्रत्येकी सहा गुण झाले होते. परंतु सरस टायब्रेकवर सानामेरीने तिसरा, प्रियलने चौथा तर ऋत्विने पाचवा क्रमांक प्राप्त केला. मान्तिक अय्यर (पुणे), अनिश जवळकर (पुणे), आदित्य सिद्धार्थ (मुंबई), इवान दुबे (मुंबई), अन्वित सोनटक्के (नागपूर), नोवा अय्यर जुयल (मुंबई) यांनीदेखील उत्कृष्ट कामगीरी करत प्रत्येकी सहा गुणांसह अनुक्रमे सहावा ते दहावा क्रमांक मिळविला.

मुलींमध्ये रीवा चरणकर (सातारा), पृथा ठोंबरे (सोलापूर), विहा मेहता (अमरावती), अनन्या चव्हाण (मुंबई), अनिश्का बियाणी (मुंबई) यांनी देखील उल्लेखनीय यश मिळवीत प्रत्येकी साडेपाच गुणासह सरस टायब्रेकवर अनुक्रमे सहावा ते दहावा क्रमांक प्राप्त केला. सर्वांना रोख बक्षीस, चषक व मेडल्स देऊन सन्मानित केले. तसेच स्पर्धेतील साडेचार वर्षीय सर्वात लहान खेळाडु वल्लभ कुलकर्णी (छ. संभाजीनगर) याला देखील उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले.

**नऊ वर्षाखालील राष्ट्रीय निवड बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवडण्यात आलेला महाराष्ट्राचा संघः**

* **मुले -** हेयान रेड्डी (पुणे), लक्ष दिघे - (मुंबई )
* **मुली -** गिरीशा पै (मुंबई), अन्वी हिंगे (पुणे).

**उत्तेजनार्थ बक्षीसे याप्रमाणे**

**७ वर्षे वयोगट मुले** : रिधान करवा (कोल्हापूर)- ४.५, अद्वैत कुलकर्णी (कोल्हापूर) ४, हितांश सुराणा (संभाजी नगर)- ३.५.
**मुली**: श्रेया शेळके (संभाजी नगर) - ४.५, अरिशा वाघमारे (ठाणे) - ३.५, अनाईका कुमारी (संभाजी नगर) - ३.

**उत्कृष्ट सोलापूर**

**मुले**: हर्ष जाधव ५, नैतिक होटकर - ४.५, प्रथम मुदगी - ३.५. **मुली** : संस्कृती जाधव - ४.५, उत्कर्षा लोखंडे ४, ईशा पटवर्धन- ३

# भारताचा पुरुष रिले संघ अंतिम फेरीत

**मुंबई, दि. २८ मे**

रिन्स जोसेफ, धर्मवीर चौधरी, मनू थेक्किनालिल साजी आणि मोहित कुमार यांचा समावेश असलेल्या भारतीय ४ बाय ४00 मीटर पुरूष रिले संघाने गुरुवारी २६ व्या आशियाई ॲथ्लेटिक्स स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. भारताने या महाद्वीपीय स्पर्धेत आतापर्यंत आठ पदके जिंकली आहेत, यात २ सुवर्ण, ४ रौप्य आणि २ कांस्यपदकांचा समावेश आहे. ही चौकडी सायंकाळी उशिरा होणाऱ्या अंतिम पात्रता फेरीत ३:0६.२८ सेकंद वेळ नोंदविली. हीटमध्ये भारताने चीन (३:0६.७९) व यजमान कोरियाला (३:१0.0५) मागे टाकून थेट पात्रता मिळवली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सोडचिठ्ठी व पोटगीचा दावा दाखल केल्याने पत्नीचा चाकूने भोकसून खून

## पती, सासू, सासरा या तिघा विरुध्द मंगळवेढा पोलीसांत गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा दि. २९ मे -**

मंगळवेढा न्यायालयात पत्नीने सोडचिठ्ठी व पोटगी बाबत दाखल केलेल्या दाव्याचा राग मनात धरुन पत्नी आरती अमोल पाटील (वय३२) हिच्या पोटात तीन वेळा चाकूने भोकसून खून करुन अन्य दोघास गंभीर जखमी केल्या प्रकरणी अमोल अंबादास पाटील,अंबादास पाटील,विमल अंबादास पाटील (सर्व रा.ढेकळेवाडी) यांच्या विरुध्द मंगळवेढा पोलीसात खूनाचा व जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल झाला आहे.

पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील मयत आरती अमोल पाटील (वय ३२, रा.शनिवार पेठ,मंगळवेढा) हिचे ढेकळेवाडी येथील अमोल अंबादास पाटील याच्या सोबत २०१९ मध्ये विवाह झाला होता. लग्नाच्या वेळी आरोपी पती हा पुणे येथे टाटा मोटर्स कंपनीमध्ये नोकरीत असल्याचे त्याच्या वडिलाने मुलीच्या कुटूंबियास सांगितले होते. मयत आरती हिचा दोन वर्षाचा इलेक्ट्रीशीयन आयटीआयचा कोर्स झालेला असल्याने तिला देखील पुणे येथे नोकरी लावतो असे त्यावेळी सांगितले होते. त्यामुळे आरती हिचे लग्न लावून दिले. लग्न झाल्यानंतर आरोपी अमोल हा एक महिन्यामध्येच आपल्या गावी ढेकळेवाडी येथे रहावयास आला, तो पुन्हा पुण्यास गेलाच नाही. पत्नी आरती माहेरी यायची तेव्हां तिला माहेरहून पैसे घेवून येण्यास तिचे सासू सासरे व पती तगादा लावत असे. आरोपी अमोल हा काहीही कामधंदा करत नव्हता, घर खर्चासाठी पैसे देत नव्हता. त्यामुळे पत्नीला तो वारंवार शिवीगाळ करीत असे. लग्नाच्या वेळी तुझ्या आई वडिलांनी आम्हाला काही दिले नाही म्हणून शारिरीक,मानसिक त्रास करत असे. जुलै २०२० मध्ये आरती ही बाळंतपणाकरिता माहेरी आली होती. तिचे बाळंतपण मंगळवेढा येथील ग्रामीण रुग्णालयात झाल्यानंतर तिला मुलगा झाला. तीन दिवसामध्येच तिचा सासरा तिला घेवून जाण्यासाठी दवाखान्यात आला होता. तेव्हां आरतीच्या आई वडिलांनी सव्वा महिन्यानंतर तुमच्या घरी आणून सोडतो असे सांगितले. त्यावेळी तिच्या सासऱ्याने शिवीगाळी करुन भांडण करत ते निघून गेले. तेव्हांपासून मयत आरती ही आई वडिलाकडे माहेरी राहत होती. तेव्हांपासून तिच्या सासू,सासरे व पतीने आरतीच्या आई वडिलाशी कोणताही संपर्क केला नाही. म्हणून मयत आरती हिने मंगळवेढा येथील न्यायालयात सोडचिठ्ठी व पोटगी करिता अर्ज केला होता. न्यायालयाने आरोपी पतीस नोटीस दिल्यानंतर तो कोर्टात आला



होता. त्यानंतर दोन,तीन वेळा आरतीकडे येवून तु माझ्या विरुध्द कोर्टात का केस केली? असे म्हणून शिवीगाळी व दमदाटी करुन तुम्हाल नंतर बघतो अशी धमकी देवून निघून गेला होता. दि.२७ मे रोजी दुपारी १.३० वाजता यातील फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा प्रसाद,मयत मुलगी आरती, तिचा मुलगा सोहम असे सर्वजण घरी असताना पती अमोल त्याची आई विमल, अमोलचा चुलता राजू पाटील व दादा मेटकरी असे घरी आले व त्यांनी आरतीला तु घरी नांदायला येणार आहे का? तुझा काय निर्णय आहे? असे विचारले. तेव्हां आरतीने पतीचे व सासू,सासऱ्याच्या त्रासाला मी कंटाळून गेली आहे. मला सोडचिठ्ठी व पोटगी हवी आहे असे सांगितल्यावर अमोल पाटील याने तुम्हाला आज सोडत नाही, तुमचा निकाल लावतो अशी धमकी देवून शिवीगाळी करीत रागाने निघून गेला व थोड्या वेळाने मोठ मोठ्याने ओरडत शिवीगाळी करीत परत आले. पॅटच्या खिशातून चाकू काढून मुलगी आरती हिच्या पाठीत तीन वेळा व पोटात दोन वेळा चाकू खुपसल्याने ती रक्तबंबाळ होवून जमिनीवर पडली, तिला वाचविण्यासाठी फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा प्रसाद गेले असता त्याने त्यांनाही चाकूने डाव्या खांद्यावर खुपसले व प्रसाद यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने रक्तबंबाळ केले. या घटनेनंतर अमोलच्या हातात चाकू असल्याने भीतीपोटी गल्लीत राहणारे कोणीही सोडविण्यास आले नाही. आरोपीने घटनेनंतर तेथून पळ काढला. या घटनेनंतर गल्लीतील लोकांनी धाव घेवून एक टमटम बोलवून उपचाराकरिता आरती व मुलगा प्रसाद, फिर्यादीस ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. उपचारापुर्वीचे आरती हि मयत झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. तेथील डॉक्टरांनी फिर्यादी व मुलगा प्रसाद यांच्यावर प्राथमिक उपचार करुन पुढील उपचाराकरिता सिव्हील हॉस्पिटल मध्ये दाखल केले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत जखमी तथा फिर्याद सोनाली रामचंद्र चौगुले (वय ४५,रा.शनिवार पेठ,मंगळवेढा) यांनी म्हटले आहे. याचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक बनकर हे करीत आहेत. दरम्यान गेल्या दोन महिन्यात मंगळवेढा तालुक्यात गुंजेगाव दोन, मारोळी एक, बोराळे एक, मंगळवेढा एक अशा एकूण सलग चार खूनाचे प्रकार घडल्यामुळे खूनाची मालिका थांबता थांबेना अशा भावनिक प्रतिक्रीया नागरिकामधून उमटत आहेत. मागील दोन वर्षात मंगळवेढा तालुक्यात एकही खुनाची घटना न घडल्यामुळे मंगळवेढ्यात शांततामय वातावरण होते. सध्या मात्र सातत्याने खूनाचे प्रकार घडत असल्यामुळे एक चिंतेची बाब बनत आहे.

## महत्वाचे...



### दिनेश मडके यांचा महाराष्ट्र महागौरव पुरस्कार सोहळ्यात सन्मान

**करमाळा दि.२९ मे-**

डिजिटल मिडीया संपादक पत्रकार संघ महाराष्ट्र संघटनेच्या वतीने राज्य स्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रम पुणे येथे संपन्न झाला या मध्ये राज्यातील विविध क्षेत्रातील मान्यवर पुरस्कारत्यासह करमाळा डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे अध्यक्ष राज्य कार्यकारिणी सदस्य म्हणून पत्रकार दिनेश मडके महाराष्ट्र महागौरव पुरस्कार सोहळ्यात ट्रॉफी देऊन सन्मान करण्यात आला. २५ मे रोजी पुणे येथील जे डब्लू मरियट पंचतारांकित हॉटेलमध्ये डिजिटल मिडीया संपादक पत्रकार संघटनेच्या वतीने राज्यातील विविध क्षेत्रात अन्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तीचा महागौरव पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला होता या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी उच्च व तंत्रशिक्षण व संसदीय कार्य मंत्री चंद्रकांतदादा पाटील संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे आयुष्यमान भारत मिशन समितीचे अध्यक्ष डॉ. ओम प्रकाश शेटे विधीमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीपकुमार सपाटे, संपादिका सरिता कौशीक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजा माने, प्रदेश उपाध्यक्ष सतीश सावंत, प्रदेश कार्यकारणी सदस्य संतोष सूर्यवंशी, राज्य संघटक तेजस राऊत,राज्य समन्वयक इकबाल शेख, पश्चिम महाराष्ट्र सचिव प्रशांत कटारे, राष्ट्रीय संघटक राजू वाघमारे, सचिव दीपक नलावडे, राज्य उपाध्यक्ष नंदकुमार सुतार सचिव महेश कुगावकर सहसचिव केतन महामुनी राज्य संघटक श्यामल खैरनार, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष विकास भोसले, राज्य राज्य समन्वयक गणेश बोतालजी, राज्य प्रसिद्ध प्रमुख धीरज शेळके, सोलापूर जिल्हा अध्यक्ष प्रवीण नागणे उपस्थित होते. डिजिटल मीडियाचे संस्थापक अध्यक्ष राजा माने यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेचे काम मोठ्या जोमाने करणार असल्याचे दिनेश मडके यांनी सांगितले आहे.

### हॅलोच्या व्यसनमुक्ती केंद्राचे रविवारी उद्घाटन

**अणदूर, दि. २९ मे-**

माणूस हा केंद्रस्थानी ठेऊन, त्याच्या आरोग्याच्या शारीरिक, मानसिक, कौटुंबिक, आर्थिक व सामाजिक या सर्व बाजूंनी विचार करून, सर्वकष, सर्वांगीण आरोग्य सेवा देण्यासाठी कटिबध्द असलेल्या येथील हॅलो मेडिकल फाऊडेशन च्या वतीने, रविवार दिनांक १ जून, सकाळी ११ वाजता 'नवोदय व होप व्यसनमुक्ती केंद्र' या दोन नवीन प्रकल्पांचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा डॉ. शुभांगी अहंकारी यांनी दिली आहे. लातूर येथील प्रसिद्ध मानसोपचार तज्ञ डॉ मिलिंद पोतदार यांच्या मार्गदर्शाखाली हे केंद्र काम करणार असून, अणदूर येथील हॅलो मेडिकल च्या इमारतीत या व्यसनमुक्ती केंद्राचा शुभारंभ लेखक, अभिनेते, नाटककार व सामाजिक कार्यकर्ते अतुल पेठे यांच्या हस्ते करण्यात येणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्ह्याचे जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार हे राहणार आहेत या वेळी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरदास व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धनजंय चाकूरकर यांची उपस्थिती राहणार आहे , अणदूर व परिसरातील ३० गावामध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढले असून अशा प्रकल्पाची खूप गरज होती संपूर्ण उपचार व समुपदेशन या केंद्रात केले जाणार असून, परिसरातील नागरिक बंधू भगिनींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन हॅलो च्या अध्यक्षा डॉ शुभांगी अहंकारी, डॉ. विजय गायकवाड, डॉ. क्रांती रायमाने, डॉ. मिलिंद पोतदार यांनी केले आहे.

### निवृत्त पोलीस अधिकारी रमेश मोहिते यांचे निधन



**सोलापूर, दि. २९ मे-**

इतिहास अभ्यासक अमोल मोहिते यांचे वडील, निवृत्त पोलीस अधिकारी रमेश महादेवराव मोहिते (वय ८३) यांचे वृद्धापकाळाने आज गुरुवारी दुपारी निधन झाले. रमेश मोहिते यांनी पोलीस सबइन्स्पेक्टर म्हणून उल्लेखनीय कामगिरी केली. त्यानंतर ते आपल्या कार्य शैलीमुळे डीएसपी पदापर्यंत पोहोचले होते. सेवानिवृत्तीनंतर त्यांनी चिनी भाषेचा प्रसार आणि प्रचार केला. रामलाल चौकातील डॉ. द्वारकादास कोटणीस यांच्या स्मृतिभवनात ते चिनी भाषेचा वर्ग घेत असत. चिनी भाषेचे शिक्षक म्हणून त्यांनी सेवानिवृत्तीनंतर आपली वेगळी ओळख निर्माण केली होती. त्यांनी स्वतःच्या हाताने श्री स्वामी समर्थांच्या पोथी चे लिखाण केले आहे. चिनी भाषेची पुस्तके लिहिली आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा अमोल, मुली आशा व सीमा, सून, नातू नातनातवंडे असा परिवार आहे त्यांच्या पार्थिव देहावर मोदी खाना स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

## निधन वार्ता

### सिद्धेश्वर मेटकरी



**मंगळवेढा, दि. २९ मे-**

मेटकरी गल्ली येथील रहिवासी सिद्धेश्वर अण्णा मेटकरी (वय ७५) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातवंडे, सुना असा मोठा परिवार आहे. कडबा व्यापारी दत्तात्रय व दिगंबर मेटकरी यांचे वडील होत.

### विनायक हिबारे



**सोलापूर, दि. २९ मे-**

जुनी मिल चाळ येथील रहिवासी सुपर मार्केट येथील सुपर टेलर फर्मचे मालक विनायक रमेश हिबारे यांचे गुरुवारी २९ मे रोजी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले.

### वसंत जाधव



**सोलापूर, दि. २९ मे-**

सोलापूर येथील रहिवाशी वसंत शामराव जाधव (वय ७४) यांचे दि. २८ मे रोजी रोजी निधन झाले. त्यांच्यावर मोदी स्मशानभूमी येथे होणार आहे. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, सून तीन नातवंडे असा परिवार आहे.

### विनायक सोलापुरे



**सोलापूर, दि. २९ मे-**

स्वातंत्र्य सैनिक नगर गृह सोसायटीतील नागरिक व आधारस्तंभ कै. विनायक सोलापुरे यांचे सकाळी ९ वाजता निधन झाले.त्याचा पश्चात दोन मुली, एक मुलगा, व पत्नी, सून,जावई असे परिवार आहे. संगमेश्वर कॉलेजमध्ये लॅब असिस्टंट म्हणून काम केले.त्यांची अंत्यविधी संध्याकाळी ७ वाजता रुपाभवानी स्मशानभूमीत झाले.

# स्व. किसनलाल मर्दा यांनी दोन हजार कुटुंबांचे संसार उभे केले

## चेअरमन शिवानंद पाटील; दामाजी कारखाना कार्यस्थळावर अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि. २९ मे-**



कारखान्याचे संस्थापक चेअरमन स्व. मारवाडी वकिल यांनी तत्कालीन सहकारी स्व. रतनचंद शहा, स्व. चरणुकाका पाटील व तालुक्यातील इतर सहकाऱ्यांना बरोबर घेवून दुष्काळी तालुक्यात दामाजी कारखान्याची निमिती करुन दोन हजार कुटुंबाचे संसार उभा करण्याचे भरीव काम केले असल्याचे प्रतिपादन चेअरमन शिवानंद पाटील यांनी मारवाडी वकिल यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त मनोगत व्यक्त करताना केले.

मंगळवेढा तालुक्याचे लोकनेते श्री संत दामाजी सहकारी साखर कारखान्याचे संस्थापक-चेअरमन स्व. किसनलाल रामचंद्र मर्दा उर्फ मारवाडी वकील यांच्या १७ व्या पुण्यतिथीनिमित्त गुरुदत्त भजनी मंडळ मारापूर व हनुमान भजनी मंडळ शिरगांव यांचा भजनाचा कार्यक्रम व हभप औदुंबर कदम महाराज उपळाईखुर्द, ऊस पुरवठा अधिकारी बबनरावजी शिंदे शुगर तुर्कपिंपरी यांचे कीर्तन संपन्न झाले. याप्रसंगी कारखाना साईटवरील स्व. मर्दा व स्व. रतनचंद शहा शेठजी यांच्या पूर्णाकृती पुतळयास धनश्री परिवाराचे मार्गदर्शक प्रा. शिवाजीराव काळुंगे, कारखान्याचे चेअरमन शिवानंद पाटील व व्हाईस चेअरमन तानाजी खरात, मारवाडी वकिल यांचे जेष्ठ चिरंजिव रमेश मर्दा, माजी चेअरमन नंदकुमार पवार, माजी चेअरमन शशिकांत बुगडे, माजी व्हाईस चेअरमन राम चंद्र वाकडे, जिजामाता पतसंस्थेचे मार्गदर्शक रामकृष्ण नागणे, माजी संचालक यादाप्पा माळी, सुभाष मर्दा, किशोर मर्दा, प्रकाश मर्दा, श्रीकांत मर्दा, अनिल मर्दा यांच्या हस्ते पूजन करुन दुपारी १२ वाजता पुष्पवृष्टी करण्यात आली.

यावेळी कामगार संघटनेचे अध्यक्ष विठठल गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी कारखान्याचे संचालक सर्वश्री मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द् लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, तानाजी काकडे, सुरेश कोळेकर, क्रांती दत्तु, काशिनाथ पाटील, कल्याण रोकडे, शहाजी उन्हाळे, प्रदीप पाटील, संतोष सोनगे, सरपंच मल्लिकार्जुन भांजे, काशिनाथ लिगाडे, मुरलीधर सरकळे, दौलत माने, बसवेश्वर कोरे, बगले, बलभिम पाटील, चेअरमन सतीश औताडे, सुरेश पाटील, सुखदेव साळुंखे, बायानी शेठ, नारायण माने उपस्थित होते.

# करमाळ्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. २९ मे-**

करमाळा शहरात पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती निमित्ताने करमाळा येथे तीन दिवसीय सामाजिक उपक्रम आणि मिरवणुकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

३०० व्या जयंतीच्या अनुषंगाने दि. ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता प्रतिमा पूजन व नामफलकाचे अनावरण अहिल्यानगर तुळशीवृंदावन देवीचा रोड येथे उपस्थितीत मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तर जिल्हाभरातून चौंडी येथे जाणाऱ्या अनुयायी अहिल्या प्रेमींनासाठी सकाळी ११ वाजता नाष्टा व थंड पाण्याचे आयोजन के, हाईट्स बायपास रोड करमाळा येथे केलेले आहे. दि.१ जून रोजी सकाळी १० वाजता वृक्षारोपण कृष्णाजीनगर अहिल्यादेवी होळकर प्लॉट येथे करण्यात येणार तर सकाळी ११ वाजता कुटीर रुग्णालय येथे निवासी रूग्णांना फळे वाटप करण्यात येणार आहे. तर दुपारी २ वाजता पांजरपोळ गो-शाळा कोर्ट जवळ मुक्या जनावरांना ओला चारा वाटप करण्यात येणार आहे. तर सायंकाळी ५ वाजता पांडे रोड येथील मातोश्री वृद्धाश्रम येथे अनाथ वृध्दांना अल्पोपहार करण्यात येणार आहे. दि.२ जून रोजी दुपारी ३ वाजता देवीचा-रोड तुळशीवृंदावन, अहिल्यानगर येथून लोकमाता पुण्यश्लोक महाराणी अहिल्याबाई होळकर यांची मिरवणूक काढण्यात येणार आहे. मिरवणुकीत प्रामुख्याने शोभा वाढवण्यासाठी राजमाता यांच्या प्रतिमेचा रथ, बॉन्ड पथक, डीजे, घोडे, लेझीम पथक आणि पारंपरिक आसलेलीगजी-ढोल नृत्यांसह बेल-भंडारांसह फटाक्यांच्या आतिषबाजीने मुख्य रस्त्याने मिरवणूकीस प्रारंभ होणार आहे. मिरवणूक समाप्तीनंतर स्नेहभोजनाचे आयोजन देखील कार्यक्रमस्थळी केले असल्याची माहिती सकल धनगर समाज करमाळा तालुक्याच्या वतीने देण्यात आली आहे.

## तावशी येथे अवैध वाळू उपशाने घेतला वृद्धाचा बळी



**पंढरपूर, दि.२९ मे -**

पंढरपूर तालुक्यातील तावशी येथे गुरुवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास अवैध वाळू उपसा करणाऱ्या पिकअप वाहनाने एका वृद्धास धडक दिली. यामध्ये वृद्धाचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे ग्रामस्थातून तीव्र संताप व्यक्त होत असून अवैध वाळू उपसा बंद करावा अन्यथा आंदोलन करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तावशी येथील रहिवाशी अहमद आतार ( वय ६५) हे पहाटे शौचास जात होते. तेव्हा भरधाव वेगाने येणाऱ्या पिकअप वाहनाने त्यांना जोरात धडक दिली. या अपघातामध्ये आतार यांचा जागीच मृत्यू झाला आहे.तावशी येथील माण नदीतून अवैध वाळू उपसा करण्यात येत आहे. तो बंद करण्यात यावा अशी मागणी गेल्या अनेक महिन्यापासून ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे; मात्र याकडे महसूल व पोलीस दुर्लक्ष करत आहेत. यामुळे आज आतार यांचा मृत्यू झाला आहे. यापुढे अशा घटना घडू नयेत. यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करावी तसेच आतार कुटुंबियांना न्याय द्यावा अन्यथा ग्रामस्थ तीव्र आंदोलन करतील, असा इशारा देण्यात आला आहे.

# पावसाची स्थिती लक्षात घेऊन वारीचे नियोजन करा

## सीईओ कुलदीप जंगम यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे -**

आषाढी यात्रा कालावधीत संताच्या पालखी मार्गावरील ग्रामपंचायती मधील कामे वेळेत संपवा. पावसाची स्थिती लक्षात घेऊन वारकरी यांना सेवा द्या. त्या दृष्टीने वारीचे नियोजन करा अशा स्पष्ट सुचना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी दिल्या.

पंढरपूर पंचायत समिती येथे आज पालखी मार्गावरील ग्रामपंचायतीच्या ग्राम सेवक व विभाग प्रमुख यांच्या बैठकीचे आयोजन करणेत आले होते. या प्रसंगी महाराणा प्रताप यांचे जयंती निमित्त प्रतिमेचे पूजन सिईओ कुलदीप जंगम यांच्या हस्ते करण्यात आले.

या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशील संसारे यांचे उपविभाग प्रमुख उपस्थित होते.

यशवंत पंचायत राज अभियानात पुणे विभागात उत्कृष्ठ कामगिरी केलेबद्दल सिईओ जंगम यांनी पंढरपूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सुशील संसारे व अधिक्षक शहाजहान तांबोळी यांचा सत्कार करून टीमच्या या कामाचे कौतुक केले.

### माहिती फलक उभे करा

वारकरी यांना देणेत येणारे सुविघाबाबत माहितीचे दिशा दर्शक फलक लावा. फलक तयार करणेची कामे वेळेत पुर्ण करा. स्थळ निश्चिती करा. जेणे करून काय सुविधा आहे ते वारकरी यांना समजेल व त्या सेवेचा लाभ घेतील. त्या दृष्टीने काळजी घ्या असे आवाहन सिईओ कुलदिप जंगम यांनी केले.



### वारकरी निवारा कक्षात सुविधा द्या

पालखी मार्गावर मुक्कामाच्या ठिकाणी निवारा व्यवस्था करणेत येणार आहे. पावसाची स्थिती लक्षात घेऊन या ठिकाणी गर्दी होणार नाही या कडे लक्ष देणे आवश्यक आहे. गतवर्षी पालखी मार्गावरील गावात वारकरी यांचे साठी शौचालये कुटूंबानी उपलब्ध करून दिली होती. भाविकांना स्नानगृह सुविधा, पिण्याचे शुध्द पाणी , स्नागृहात स्नानासाठी पुरेसे पाणी याची देखील पुरेसी व्यवस्था करावी लागणार आहे. **- संदिप कोहिणकर, अतिरिक्त सीईओ**

### प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करा

या वर्षी यात्रेसाठी जादा भाविक येणेची शक्यता नाकारता येत नाही. पावसाची स्थिती तसेच पुर परिस्थिती या काळात आपत्कालीन सेवा देणे साठी प्रशिक्षीत मनुष्यबळ तयार करा. बाजूचे ग्रामपंचायती मधून कर्मचारी बोलवा. सेवाभाव ठेऊन काम केलेस आनंद मिळेल. कामाचा ताण जाणवणार नाही.

### सेवेत हालगर्जीपणा नको

गतवर्षी भाविकांना सेवा देताना काय अडचणी आल्या. त्या या यात्रेत दुरूस्त करून घ्या. पावसाची स्थिती लक्षात घेऊन त्या दृष्टीने उपाय योजना करा. जी कामे आहेत ती वेळेत संपवा. ऐनवेळी धावपळ करू नका. ज्या ठिकाणी निवारा शेड उभे करणेत येणार आहेत. त्या ठिकाणी जाणे साठी मार्ग, शौचालस व स्नानगृह सुविधा, मोबाईल चार्जींग , हिरकणी कक्ष, वृध्द भाविकांना वैद्यकीय सुविधा द्या. स्पिकर वरून काळजी घेण्याची सुचना देण्याची व्यवस्था करा.

# दरवाजे न उघडल्याने वडापूर बंधाऱ्याची साईडपट्‌टी गेली वाहून

## अधिकाऱ्याचे दुर्लक्ष; दोन तालुक्यांचा संपर्क तुटला

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे -**

नीरा नदीला आलेल्या पुरामुळे भीमा नदीच्या पात्रात अचानक वाढ झाली. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे दक्षिण सोलापूर तालुक्यातील वडापूर येथील बंधाराचे दरवाजे उघडले गेले नाहीत. त्यामुळे साईडपट्‌टी वाहून गेली आहे अन् दक्षिण सोलापूर व मंगळवेढा या दोन तालुक्यांचा संपर्क तुटला.

वडापूर सिद्धापूर दरम्यान भीमा नदीवर ३५ वर्षांपूर्वी बंधारा बांधण्यात आला. मात्र तेव्हा बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूला पिचींगचे काम पूर्ण केले नाही . त्यामुळे ज्या ज्या वेळी बंधारा ओव्हरफ्लो होतो, त्या त्या वेळी बंधाऱ्याच्या बाजूच्या साईडपट्‌टी वाहून जातात. असाच प्रकार यावेळी ही घडला.

### अधिकारी, लोकप्रतिनिधीनी फिरवली पाठ

वडापूर येथील बंधाऱ्याच्या पूर्वेकडील बाजूची २५ ते ३० फूट साईडपट्‌टी वाहून गेली आहे. पाण्याच्या प्रवाहामुळे साईडपट्‌टी आणखीन जास्तच वाहून जात आहे. एवढी मोठी घटना घडली असतानाही याकडे जलसंपदा विभागाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी यांनी पाठ फिरवल्याचे दिसून येत आहे.

### अफवेवर विश्वास ठेवू नये

वडापूर बंधाऱ्याच्या पिचिंगचे काम केले नसल्यामुळे बंधाऱ्याच्या पूर्वेकडील साईड पट्‌टी वाहून गेली आहे. परंतु वडापूर बंधारा फुटला, वडापूरच्या नदीने प्रवाह बदलला अशा अफवा पसरवल्या जात आहेत. यावर कोणीही विश्वास ठेवू नये, असे वडापूरच्या ग्रामस्थांनी सांगितले.



यावर्षी पहिल्याच पावसात नीरा नदी तुडुंब भरून वाहू लागली. नीरेचे पाणी भीमा नदी मोठ्या प्रमाणात आले. याबाबत जलसंपदा विभागाने नोटीस काढून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला होता, परंतु ही बाब अधिकाऱ्यांना माहीत असूनही त्यांनी बंधाऱ्याचे दरवाजे (प्लेटा) उघडले नाहीत. त्यामुळे बंधारा ओव्हर फ्लो होऊन पूर्वेकडील साईड पट्‌टी वाहून गेली.

जलसंपदा विभागाचे अधिकारी पावसाळा संपला की दगड व मुरूम टाकून तात्पुरती दुरूस्ती करतात. त्यानंतर बंधाऱ्यावरून वाहतूक सुरू होते, परंतु जोपर्यंत बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूकडील पिचिंगचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत प्रत्येक वेळेस नदी ओव्हरफ्लो झाली की अशी घटना घडतच राहणार असल्याचे सांगण्यात येते. जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आता तात्पुरती दुरुस्ती न करता पीचिंगचे काम पूर्ण करून घ्यावे, अशी मागणी वडापूर व सिद्धापूर ग्रामस्थांमधून होत आहे.

## महत्वाचे...



### नुकसानग्रस्त शेतीचे त्वरित पंचनामे करा; प्रा. सावंत यांनी दिले निवेदन

**सोलापूर, दि. २९ मे-**

सोलापूर जिल्ह्यात गेल्या पंधरा दिवसात प्रचंड मोठा पाऊस झाला असून त्यामुळे शेतीचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतीचे त्वरित पंचनामे करावेत, अशी मागणी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे गुरुवारी सोलापूर दौऱ्यावर असताना याबाबत शिवसेनेकडून त्यांना निवेदन देण्यात आले. जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या उभ्या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. द्राक्ष, भुईमूग, कांदा आणि इतर कडधान्यांची पिके जमीनदोस्त झाली आहेत. परिणामी शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाकडून नुकसानग्रस्त शेतीचे लवकरात लवकर पंचनामे व्हावेत आणि शेतकऱ्यांना न्याय मिळावा अशी मागणी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. याप्रसंगी शिवसेनेचे जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत, माजी नगरसेवक मनोज शेजवाल, शिवसेना उपजिल्हाप्रमुख हरिभाऊ चौगुले, युवासेना कार्यकारणी सदस्य सुजित खुर्द, समर्थ बिराजदार आदी शिवसैनिक उपस्थित होते.





### एमपीएससी यशस्वी विद्यार्थ्यांचा ऑर्किड अभियांत्रिकीमध्ये सत्कार

**सोलापूर, दि. २९ मे-**

नागेश करजगी ऑर्किड कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी येथे महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) परीक्षेत यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ पार पडला. महाविद्यालयाचे विद्यार्थी वैष्णवी गायकवाड (एमईएस - रँक ५ व मुलींमध्ये महाराष्ट्रात प्रथम) आणि परीस गायकवाड (एमईएस -महाराष्ट्र गुणवत्ता यादीत द्वितीय) यांच्या उल्लेखनीय यशाचा गौरव करण्यात आला. सत्कार समारंभात प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. एस. एस. मेतन आणि डॉ. व्ही. के. पत्की यांनी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सत्कारानंतर संवादात्मक पॅनल या चर्चासत्रात विद्यार्थ्यांनी त्यांच्या अभ्यास पद्धती आलेल्या अडचणी आणि यश मिळवण्यासाठी घेतलेल्या मेहनतीविषयी सविस्तर माहिती दिली. ही चर्चा प्रा. ए. पी. पाटसकर आणि प्रा. डी. डी. भोगे यांनी संयोजित केली होती. विद्यार्थ्यांच्या प्रेरणादायी अनुभवांमुळे उपस्थितांना मौल्यवान मार्गदर्शन मिळाले. उपस्थित विद्यार्थ्यांनीही उत्स्फूर्तपणे प्रश्न विचारून चर्चा अधिक समृद्ध केली. याप्रसंगी स्थापत्य विभागप्रमुख डॉ. सतीश मोरे तसेच उपस्थित प्राध्यापकांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करत इतर विद्यार्थ्यांनीही त्यांच्या यशाचा आदर्श घ्यावा, असे आवाहन केले. सूत्रसंचालन आयुष लोकरे आणि संजली सोनवणे यांनी केले.



### स.हि.ने. प्रशालेत सावरकर जयंती साजरी

**सोलापूर दि.२९ मे-**

सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेत स्वातंत्र्यवीर वि.दा. सावरकर यांची जयंती मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरस्वती मंदिर संस्थेचे अध्यक्ष ॲड. पी. एल. देशमुख हे होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमा पूजनाने झाली. मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी कार्यक्रमाचा उद्देश तसेच स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार आपल्या प्रास्ताविकातून व्यक्त केले. स्वातंत्र्यवीर सावरकर प्रखर हिंदुत्ववादी असले तरी त्यांनी जाती निर्मूलनाचे कार्य केले, असे प्रतिपादन ॲड. पी. एल. देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले. व्यासपीठावर संस्थेचे संचालक ॲड. रघुनाथ दामले, शिरीष कुलकर्णी, सुधीर देव, प्रशांत बडवे, दत्ता कुलकर्णी, राहुल औरंगाबादकर, शशिकांत जिद्दीमनी, प्राथमिकच्या मुख्याध्यापिका जयश्री राठोड, पूर्व प्राथमिकच्या सोनाळे मॅडम आदी मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन सुमित्रा भगत यांनी केले. दिलीप राठोड यांनी आभार मानले.

### विठ्ठल मंदिरात दगड कोसळल्याने भाविक जखमी

**पंढरपूर, दि.२९ मे -**

येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी आलेल्या एका वयोवृद्ध भाविकाच्या डोक्यात दगड पडून भाविक जखमी झाल्याची घटना बुधवारी मंदिरात घडली आहे. जखमी झालेल्या भाविकाचे नाव नंदकुमार चांगदेव बोटे (वय ७२, रा. बार्शी, सोलापूर) असे आहे. श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात मंदिर जतन व संवर्धनाचे काम करण्यात येत आहे. त्यातील काही कामे पूर्ण झाली आहेत, तर काही कामे शिल्लक आहेत. बार्शी येथील नंदकुमार चांगदेव बोटे हे विठ्ठल रुक्मिणी मातेच्या दर्शनासाठी बुधवारी येथे आले होते. देवाचे मुखदर्शन घेऊन ते बाहेर पडताना मंदिरात सुरू असलेले काम ते पाहत होते. नैवेद्य दरवाजा परिसरात ते गेले असता त्यांच्या डोक्यावर दगड कोसळला.यामध्ये ते जखमी झाले. तत्काळ मंदिर समितीच्या कर्मचाऱ्यांनी व रुग्णवाहिकेमध्ये बोटे यांना उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

# धनगर समाजाच्या मागण्या पूर्ततेकरिता शासन कटीबद्ध



### महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे प्रतिपादन

### 30 मंडळांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी मूर्तींचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

विकसित महाराष्ट्राच्या पर्यायाने विकसित भारताच्या निर्मितीसाठी राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची कार्यप्रेरणा उपयुक्त ठरणार आहे. धनगर समाजाला न्याय मिळण्यासाठी धनगर समाजाच्या मागण्यांच्या पूर्ततेकरिता शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन महसूल मंत्री आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त नरेंद्र काळे मित्र परिवारातर्फे ३० जयंती उत्सव मंडळांना अहिल्यादेवी होळकर यांच्या पूर्णाकृती मूर्तींचे वितरण गुरुवारी ड्रीम पॅलेस पोलीस कल्याण केंद्र येथे श्री. बावनकुळे यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी व्यासपीठावर भाजपाचे प्रदेश महासचिव आमदार विक्रांत पाटील, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार देवेंद्र कोठे, पद्मश्री डॉ. विकास महात्मे, संयोजक आणि भाजपाचे माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे, भाजपा महिला आघाडीच्या प्रदेश सचिवा रंजीता चाकोते, जिल्हा सरचिटणीस विकास वाघमारे उपस्थित होते.प्रारंभी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या मूर्तीचे पूजन झाले. यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह मान्यवरांना घोंगडी, काठी आणि बेलभंडार हे पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे चरित्र देऊन सन्मानित करण्यात आले. आमदार गोपीचंद पडळकर, संयोजक आणि भाजपाचे माजी शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनीही मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी संजय कोळी, राजकुमार पाटील, संजय कणके, प्रसाद कुलकर्णी, राम वाकसे, नागेश खरात, अमर दुधाळ, विनोद मोटे, केदार पुजारी, राज बंडगर, सिद्धाराम बेडगनुर, पोकळे महाराज, सतीश महाले, व्हनमाने, अभिषेक भाईकट्टी, देवेंद्र मदने, विवेक खिलारे, संदीप कुलकर्णी आदी उपस्थित होते. संयोजक नरेंद्र काळे यांनी प्रास्ताविक तर श्वेता हुल्ले यांनी सूत्रसंचालन केले.

#### तुम्ही अभियान सुरू करा; मी सही करतो

धनगर समाजाच्या तरुणांना न्याय मिळावा अशी मागणी संयोजक नरेंद्र काळे आमदार गोपीचंद पडळकर यांनी भाषणातून केली होती. त्यांच्या मागणीला उत्तर देताना महसूल मंत्री आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, धनगर समाजाला न्याय मिळण्याकरिता राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने तुम्ही अभियान तयार करा, मी त्यावर सही करतो. तुमच्या भावना आणि निरोप मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत निश्चित पोहोचवतो, असे आश्वासन चंद्रशेखर बावनकुळे यांनी देताच उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांना प्रतिसाद दिला.



### महाराणा प्रताप जयंती मिरवणूक

**सोलापूर :** महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते गुरुवारी सायंकाळी महाराणा प्रताप जयंती मिरवणुकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठानचे पदाधिकारी, आमदार देवेंद्र कोठे, आ. ठाकुर, दर्शन दुबे, रवींद्र दुबे व सरकारी वकील प्रदीपसिंग परदेशी.

# शिवसेना नेत्यांना निवडणुकी संदर्भातील अहवाल सादर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**



शिवसेना सोलापूर शहर मध्य व उत्तर मतदार संघातील शिवसेना पदाधिकारी याची आगामी महापालिका निवडणुकीच्या तयारीसाठी आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना शिवसेना नेते चंद्रकांत खैरे व जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांना निवडणूक संदर्भात महत्वाची पक्षसंघटना बांधणी बाबतीत अहवाल सादर केला

यावेळी जिल्हा प्रमुख अजय दासरीसर उपजिल्हाप्रमुख दत्तात्रय गणेशकर प्रताप चव्हाण शहर प्रमुख लक्षण गायकवाड दत्ता माने शशिकांत बिराजदार अन्य पदाधिकारी उपस्थित होते. ही बैठक वेंकटेश सांस्कृतीक सभागृहात सोलापूर येथे आयोजित करण्यात आली होती यावेळी शिवसेना उपशहरप्रमुख विभाग प्रमुख शाखाप्रमुख प्रमुख शाखाप्रमुख शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# थेट झोनमध्ये जात पालिका आयुक्तांनी जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या

### महापालिकेच्या इतिहासात प्रथमच घेतला विभागीय कार्यालयात जनता दरबार

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २९ मे-**

महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी थेट दत्त चौक येथील झोन कार्यालयात (क्रमांक १) येऊन जनता दरबारात नागरिकांच्या विविध समस्या, अडचणी जाणून घेतल्या. त्याचा निपटरा करण्याचे आदेश तत्काळ अधिकाऱ्यांना दिले. यानिमित्ताने जनतेच्या अडचणी सोडविण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या रूपात थेट महापालिका झोन कार्यालयात आले होते. यामुळे समाधानकारक चित्र पाहायला मिळाले.

महापालिका आयुक्त महापालिकेत दर सोमवार आणि गुरुवारी जनता दरबार घेतात. मात्र अनेक नागरिकांना महापालिकेत येणे जमत नाही. तेव्हा महापालिकेतील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आज थेट महापालिकेच्या विभागीय कार्यालय (झोन) येथे जनता दरबार घेतला. महापालिकेच्या इतिहासात प्रथमच अशा पद्धतीने महापालिका आयुक्तांनी थेट झोन कार्यालयात जनता दरबार घेतल्याचे दिसून आले. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, नगररचना उपसंचालक मनीष भिष्णूरकर, सार्वजनिक आरोग्य अभियंता तपन डंके, नगर अभियंता सारिका अकुलवार, उपअभियंता नीलकंठ मठपती, प्रभारी झोन अधिकारी प्रकाश सावंत, अंतर्गत लेखा परीक्षक राहुल कुलकर्णी आदींसह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.गुरुवारी सकाळी ११ वाजता आयुक्तांचा हा जनता दरबार सुरू झाला. या परिसरातील नागरिकांनी आपापल्या समस्या आणि तक्रारी आयुक्तांसमोर मांडल्या. यामध्ये पाणीपुरवठा, घाण पाणी, कचरा, ड्रेनेज आदी समस्या नागरिकांनी मांडल्या. आयुक्तांनी आस्थेने नागरिकांचे म्हणणे ऐकून घेतले. नेमकी समस्या कशी सुटेल यासंदर्भात अधिकाऱ्यांशी चर्चा केली.



#### अडचणी तत्काळ सोडविण्याचा प्रयत्न : आयुक्त डॉ. ओम्बासे

सर्व नागरिकांना महापालिकेत येणे शक्य होत नाही. त्यामुळे गुरुवारी टप्प्याटप्प्याने विविध झोन कार्यालयात जनता दरबार घेण्यात येणार आहे. तेथील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अडचणी जाणून घेण्यात येतील.लोकांच्या अडचणी तत्काळ सोडविण्यासाठी नियोजन आणि प्रयत्न आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी ''माय सोलापूर ॲप'' वर आपल्या समस्या, तक्रारी मांडू शकतात. पाणी, ड्रेनेज आणि कचरा या समस्यांवर ४८ तासांमध्ये संबंधित अधिकारी पाहणी करून कार्यवाही करेल. तर इतर नागरी समस्या सात दिवसात सोडविण्यात येतील. त्यामुळे नागरिकांनी या ॲप चा वापर करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

#### एसीतले अधिकारी आले पंख्याखाली !

महापालिकेतील इंद्रभुवन इमारतीमध्ये एसी कार्यालयातून कामकाज पाहणारे अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त व इतर अधिकारी झोन कार्यालयाच्या पंख्याखाली सुमारे दोन तास बसल्याचे या निमित्ताने दिसून आले. एसीत बसून शहरातील नागरिकांच्या समस्या कशा सुटणार ? असा आरोप काही जणांकडून होत होता. मात्र कृतीतून तो आरोप आयुक्तांनी खोडून काढल्याचे पाहायला मिळाले. महापालिका आयुक्त नागरिकांच्या अडचणी जाणून समस्यांच्या ठिकाणी थेट पाहणी करायलाही जात आहेत. आयुक्तांच्या लोकाभिमुख कामामुळे नागरिकांमधून समाधानाची भावना व्यक्त होत आहे.

#### ड्रेनेज संदर्भात प्रामुख्याने अधिक तक्रारी

झोन कार्यालयातील या जनता दरबारात आज प्रामुख्याने ड्रेनेज संदर्भात अधिक तक्रारी होत्या. त्या पाठोपाठ पाणीपुरवठा, घाण पाणी येणे, कचरा साठणे , अतिक्रमण आदी समस्या नागरिकांनी मांडल्या. एकूण २३ नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. मनोहर नगर झोपडपट्टीत घरात पाणी शिरणे आणि ड्रेनेज लाईन तुंबण्याच्या तक्रारीचा यात समावेश होता.

# बोलक्या बाहुल्यांद्वारे भगवद् गीतेतील १८ अध्याय, ७०० श्लोक सादर

### सोलापूरचा बालकलाकार सोहम येमूल याचा अभिमानास्पद उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

भारतातील सर्वात कमी वयाचा बोलक्या बाहुल्या आणि कटपुतली कलाकार सोहम शाम येमूल याने एक निश्चय केला. निश्चय होता तो भगवद् गीतेतील १८ अध्याय, ७०० श्लोक संस्कृत आणि नंतर मराठीत अनुवाद करून सादर करण्याचे. प्रत्येक श्लोक गणपती पपेटद्वारे ओठ न हलविता संस्कृत भाषेत सादर करायचे. आणि त्याचे मराठीत अनुवाद एका वारकरी पपेटकडून ओठ न हलविता सादर करायचे. हा उपक्रम सोहम याने पार पाडून अभिमानास्पद विक्रम केला आहे.

आंतराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून सोहम याच्या या उपक्रमाला सुरुवात दिनांक २१ जून २०२३ रोजी झाली होती. पहिला अध्यायचा पहिला श्लोक गणपती आरती करून सुरुवात करण्यात आले. सोहमची आजी सौ विजया येमूल, आत्या सौ लता चन्ना , मित्र चनवीर मठ, तनुश्री हांडे ह्यांच्या हस्ते गणपती आरती करून झाले. त्यानंतर नियमितपणे श्लोक सादर करून युट्युबवर व्हिडीओ प्रसारित करण्यात आले. सदरील सर्व श्लोकचे व्हिडीओ युट्युबसह इंस्टाग्राम, ट्विटर(एक्स), लिंक्डइनवर उपलब्ध आहेत. मे २०२५ च्या सुट्टीच्या दिवसात पूर्ण दिवसभर भगवद गीतेचे श्लोक व्हिडीओ रेकॉर्ड करण्यात आले. ह्या उपक्रमाला श्रेयस श्रीनिवास रच्चा ह्याने अध्याय पाच पासून व्हिडिओ रेकॉर्ड करण्यास मदत केली. त्यानंतर श्रीरंग संतोष पवार, शिवाली श्रीनिवास श्रीराम , अमृता जयंत येमूल ह्यांनी मदत केली. व्हिडीओ रेकॉर्ड झाल्यानंतर त्याचे एडिटिंग करून अपलोड करण्यास , योग्य दुरुस्ती करून कम्पाइल करण्याचे कार्य सध्या श्रेयस रच्चा करीत आहे. गणपती पपेट शाम येमूल यांनी तयार केले असून पपेटचे ओठ हलतात आणि डोळ्यांचे पापणी उघडझाप , मान, सोंड, हात ह्यांचेही हालचाल करता येते. हरी हा मराठीतून अर्थ सांगण्यासाठी वापरलेला पपेट अमेरिकेतून आणला आहे. तिथे त्याचे नाव डॅनी ओ डे असे होते वारकरी आणि गणपती पपेटचे वेशभूषा तसेच सजावट सौ सोनाली येमूल ह्यांनी केले. अठरावा अध्याय , शेवटचा श्लोक साताशेवा श्लोक सादर केल्यानंतर गणपती आरतीसाठी विशेष कार्यक्रम करण्यात आला.संगमेश्वर महाविद्यालाचे प्रा. संतोष पवार यांच्या हस्ते गणपती पपेटचे पूजन करण्यात आले. साखरपेठ प्रभागाच्या माजी नगरसेविका सोनाली मुटकीरी यांच्या हस्ते गणपती पपेटचे पूजा आणि आरती करण्यात आले. अठरा अध्याय, सातशे श्लोक संस्कृत भाषेत आणि त्याचे मराठीत अर्थ सांगणे असा उपक्रम, तेदेखील ओठ न हलविता सादर करण्याचा विक्रम पपेटियर सोहम याने केला. अविरत भगवद् गीता १८ अध्याय, ७०० श्लोक सादर करून व्हिडीओ रेकॉर्ड करण्याचे 'चिल्ला' सोहम याने केला आहे.



चिल्ला काटना किंवा चिल्ला ह्या शब्दाचा अर्थ आहे, सलग ४० दिवस अविरत संगीताचा रियाज करणे. ह्या तपस्येत विश्रांतीहि घ्यायची नसते. ह्या तपस्येतून विद्यार्थ्यांच्या संगीत कलेत बरेच प्रगती, परिवर्तन घडते. चिल्ला करणे हि प्रत्येक कलाकारास शक्य नसते. परंतु ज्यांनी केला त्यांचे नेहमीच कौतुक केले जाते. श्रीमद् भगवद् गीता हि केवळ हिंदू धर्म ग्रंथ नसून आयुष्यात नीतिमत्तेचे तत्वज्ञान सांगणारे मार्गदर्शक ग्रंथ आहे. भगवद गीता हि वेदिक तत्वज्ञानावर आधारित धर्म (योग्य आचरण), सांख्य योग , ज्ञान आणि भक्ती ह्या चार मुख्य तत्वावर विभागले आहे. वेद व्यास (कृष्ण द्वैपायन वेद व्यास ) ह्यांनी महाभारत ह्या महाकाव्याचे निर्मिती केले असून भगवद् गीता त्याचा एक महत्वाचा भाग आहे. भगवद गीतेत एकूण १८ अध्याय असून ७०० श्लोक आहेत. मूळ भगवद गीता हि संस्कृत भाषेत आहे. महाराष्ट्रात संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज यांनी साधारण १२०० सालात मराठीत अनुवाद केले. आणि हि ज्ञानसंपदा मराठी भाषेत उपलब्ध झाली. भारतीय संस्कृती, मराठी भाषा शब्दभ्रम आणि कटपुतली कलेतून जगभर पोहचविण्याचा सोहम याचा हा कौतुकास्पद प्रयत्न म्हणजे मराठी पाऊल पडती पुढे!

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर : राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे सोलापुरात आगमन झाल्यानंतर आमदार देवेंद्र कोठे, भाजपचे किशोर देशपांडे यांनी स्वागत केले. यावेळी भाजपाच्या शहर अध्यक्षा रोहिणी तडवळकर, रामचंद्र जन्नू, प्रशांत बडवे, अविनाश महागावकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी तात्काळ रुजू व्हावे

- महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे
- काम सुरळीत झाल्यानंतर करणार चर्चा
- भविष्यात काम बंद केल्यास कठोर कारवाई




सोलापूर : नियोजन समिती सभागृहात आयोजित महसूल विभागाच्या आढावाप्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे स्वागत करताना जिल्हाधिकारी आशीर्वाद.

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे सोलापूर दौऱ्यावर आले असता, त्यांनी महसूल विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची बैठक घेतली. तत्पूर्वी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी भूमी अभिलेख कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी सुरू केलेले काम बंद आंदोलनावर ताशेरे ओढले ते म्हणाले, भुमिअभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनी तात्काळ कर्तव्यावर रुजू व्हावे.

तुमच्या ज्या काही मागण्या असतील त्या मागण्यांवर मंगळवारी मंत्रालयात सकारात्म क चर्चा करण्यात येईल. परंतु कर्मचाऱ्यांनी तात्काळ आपले कार्य सुरळीत करावे, त्यानंतरच विविध प्रलंबित प्रश्नावर चर्चा करण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या ज्या काही सम स्या असतील त्या मुख्यमंत्र्यांच्या समोर ठेवून सोडवण्यात येतील. परंतु कर्मचाऱ्यांनी असे कामबंद आंदोलन करून शासनाला व जनतेला वेठीस धरू नये. त्याच पद्धतीने भविष्यात कर्मचाऱ्यांनी असे जर आंदोलन पुन्हा केले तर त्यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई केली जाईल असा सज्जड इशाराही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिला आहे.

दरम्यान, महसूल मंत्री बावनकुळे यांनी राज्यातील नवीन वाळू धोरणावर भाष्य करताना ते म्हणाले, राज्यात नैसर्गिक वाळूची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. वाळूची म गणी वाढल्याने तीचा नियमित पुरवठा होत नाही. त्यामुळे राज्यात वाळू माफिया वाढत आहे. त्यावर उपाययोजना म्हणून कृत्रिम पद्धतीने वाळूची निर्मिती केली जाणार आहे. (एम सॅन्ड) कृत्रिम वाळू तयार करून ती राज्यातील वीस लाख घरकुलांसाठी मोफत पाच ब्रास याप्रमाणे वितरित केली जाणार आहे. कृत्रिम वाळू निर्मितीसाठी राज्यामध्ये नवीन प्रकल्प उभारले जात आहेत. भविष्यातील तीन वर्षात वाळूमाफिया पूर्णतः नष्ट होईल. कृत्रिम पद्धतीची वाळू बाजारात आल्यानंतर मागणी व पुरवठा समप्रमाणात राहून काळाबाजार रोखता जाईल. असेही त्यांनी यावेळी सांगितले.

### ● जिवंत सातबारा आणि ॲग्रीस्टॅक

राज्यातील शेतकऱ्यांचे सातबारे हे जिवंत सातबारे राहावे यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. म्हणजेच मृत व्यक्तीच्या नावावर सातबारा मर्यादित न राहता, तो सातबारा जिवंत व्यक्तीच्या नावावर करण्यात येणार आहे. तसेच ॲग्रीस्टॅक या माध्यमातून शेतकऱ्यांची नोंदणी केली जाणार आहे. युनिकोड माध्यमातून शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ याद्वारे घेता येणार आहे. शासनाच्या विविध योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी याचा फायदा होणार आहे. यांसह शेतकऱ्यांना येणाऱ्या विविध अडचणी नुकसान भरपाई, बीज सबसिडी, नैसर्गिक आपत्ती, किसान सन्मान योजना, याबाबत तात्काळ माहिती व तक्रार करता येणार आहे. ग्राम सेवक तलाठी कोतवाल यांच्यामार्फत शेतकऱ्यांची नोंदणी केली जाणार आहे. शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी पायवाट व रस्ते यांचे नकाशे ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध करण्यात येणार आहेत. हे नकाशे सर्व स्तरावर उपलब्ध करण्यात येणार असून त्याची मागणी शेतकऱ्यांना ग्रामपंचायत कार्यालयामध्ये करता येणार आहे.

### ● गोरगरिबांसाठी रेशन धान्य सोडावे

अंत्योदय योजनेअंतर्गत इष्टांक देणे सध्या बंद आहे. यामुळे वाढीव इष्टांक देणे मोठे जिकिरीचे कार्य आहे. त्यामुळे ज्या लाभार्थ्यांची एकंदर आर्थिक आणि कौटुंबिक स्थिती चांगली असेल, तर त्यांनी गरिबांसाठी धान्य सोडावे. जेणेकरून गोरगरीब आणि अत्यंत हालाखीचे जीवन जगणाऱ्या गरजूंना हे धान्य वाटप करता येईल. असे आवाहन देखील यावेळी बावनकुळे यांनी केले.

### ● राहुल गांधी पार वेडे झाले आहेत

राहुल गांधी यांनी वेळोवेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा अपमान केलेला आहे. त्या पार्श्वभूमीवर न्यायालयाने त्यांना फटकारलेले आहे. तरीदेखील राहुल गांधी यांची निरर्थक बडबड सुरू असते. राहुल गांधी हे फार वेडे झाले आहेत. त्यांच्याकडे लक्ष देऊ नये. त्यांच्या नादी लागू नये. असे देखील बावनकुळे यांनी सांगितले.

### ● उजनीसाठी नागपूर पॅटर्न :

सोलापूर शहर जिल्ह्याची वरदायनी म्हणून ख्याती असलेल्या उजनी धरणाची खोली वाढवण्याचा सरकारचा विचार आहे. त्या अनुषंगाने उजनी धरणाची खोली वाढवणे व त्यातील गाळ वाळू एकत्रित करून उपलब्ध वाळू शासकीय बांधकाम ासाठी वापरणे. यासाठी सरकारचे प्रयत्न सुरू आहेत. नागपूरमध्ये असे पॅटर्न राबवण्यात आले होते. त्यामुळे राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये हे पॅटर्न राबवण्यात येणार आहे. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्याकडे याचे सर्व अधिकार राहणार आहेत. उजनी धरणाची खोली वाढवल्यास पाणी साठवण वाढणार आहे. तसेच तेथील वाळू आणि गाळ याचा वापर शासकीय कामांना होणार आहे असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

### ● न्यायालयीन कामकाजात गती आणण्यात येईल

राज्यातील भूमी अभिलेख कार्यालयातील विविध न्यायालयीन प्रकरणावर गतीने कामकाज सुरू. येत्या तीन-चार महिन्यात न्यायालयीन काम काज पूर्णतः शून्य करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवलेले आहे. त्यानुसार भूमी अभिलेख कार्यालयातील सर्व न्यायालयीन केसेस निकाली काढण्याचा प्रयत्न आमचा राहणार आहे जनतेच्या सोयीसाठी सरकार अधिक प्रयत्नशील व गतिमान राहील यासाठी कार्यरत राहू असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

### ● भाजपमध्ये मोठ्या प्रमाणात इन्कमिंग

राज्यातील भूमी अभिलेख कार्यालयातील विविध न्यायालयीन प्रकरणावर गतीने कामकाज सुरू. येत्या तीन-चार महिन्यात न्यायालयीन काम काज पूर्णतः शून्य करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवलेले आहे. त्यानुसार भूमी अभिलेख कार्यालयातील सर्व न्यायालयीन केसेस निकाली काढण्याचा प्रयत्न आमचा राहणार आहे जनतेच्या सोयीसाठी सरकार अधिक प्रयत्नशील व गतिमान राहील यासाठी कार्यरत राहू असे देखील त्यांनी यावेळी सांगितले.

### ● बाजार समितीमध्ये पक्षविरहित राजकारण

सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पक्षविरहित राजकारण पहावयास मिळाले. त्या पद्धतीची मुभा संघटनेमार्फत देण्यात आली होती. सहकार क्षेत्रामध्ये आमची ताकद कमी आहे. येथे पक्ष विरहित राजकारण केले जाते. त्यामुळे स्थानिक पातळीवरील राजकारणात मुभा देण्यात आली होती. परंतु यामुळे भारतीय जनता पार्टीचे अनेक नेत्यांची जवळी काढलेली आहे. त्यामुळे भविष्यातील महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये भाजप पक्षात मोठी इन्कमिंग होईल. त्याचा नक्कीच फायदा पक्षाला आणि संघटनेला होणार आहे. असे देखील बावनकुळे यांनी सांगितले.

### ● निवडणुकांसाठी सरकार आणि भाजप सज्ज

सर्वोच्च न्यायालयाने येत्या चार महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे निर्देश राज्य सरकारला व राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोग कार्यरत आहे. साधारणतः सप्टेंबर ते ऑक्टोबर महिन्यात निवडणुका होतील. या निवडणुकांसाठी राज्य सरकार आणि भाजप सज्ज आहे. राज्य निवडणूक आयोगाने यंत्रणा सज्ज करण्याचे निर्देश द्यावे. सरकार तात्काळ निवडणूक यंत्रणा कार्यरत होईल. निवडणुकांसाठी सरकार आणि भाजप तयार आहे. उद्या निवडणूक घेतली तरी, आम्ही सर्वजण सज्ज आहोत. असे देखील बावनकुळे यांनी सांगितले. तसेच सोलापूरमधील भाजप हा एकसंध आहे. सहकार क्षेत्रासाठी पक्षविरहित राजकारण झाले. परंतु आता भाजप संघटना म्हणून सर्वजण एकत्र येतील. भाजपमध्ये कोणतेही गटतट नाहीत असे देखील बावनकुळे यांनी ठणकावून सांगितले.

### घरकुल नोंदणीसाठी केवळ एक हजार रुपये फी

राज्यातील घरकुल प्रकल्पांसाठी शासनांतर्गत प्रत्येकी पाच ब्रास वाळू मोफत दिली जाणार आहे. नव्या वाळू धोरणांतर्गत यासंबंधी राज्य सरकारने शासनादेश काढलेला आहे. तसेच घरकुल रजिस्ट्रेशन अर्थात नोंदणीसाठी केवळ एक हजार रुपये शासन फी आहे. त्या व्यतिरिक्त घरकुल संबंधित कोणत्याही परवानासाठी पैसे द्यावयाचे नाहीत. घरकुलासंबंधी सर्व मंजुरी शासनाकडून मोफत दिली जाणार आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवेला बळी पडू नये.




## ▶▶ महत्वाचे...

### पल्लवी करडे एटीएसइ परिक्षेत केंद्रात प्रथम

**सोलापूर, दि. २९ मे-**

महाराष्ट्रात घेण्यात आलेल्या एटीएसइ परिक्षेत श्री विरतपस्वी बालक मंदिर प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनी पल्लवी सोनाली सुर्यकांत करडे हिने १६२ गुण मिळत केंद्रात प्रथम क्रमांक मिळवला आहे. पल्लवी हिचा जिल्हात ११वा तर राज्यात १८वा क्रमांक मिळवला आहे. पल्लवी कडरे हिला वर्गशिक्षक वडगावे आणि मुख्याध्यापक के. पी.बचाटे यांचे मार्गदर्शन लाभले आहे. पल्लवीने मिळवलेल्या यशाबद्दल डॉ. विशाल क्षिरसागर, बळीराम क्षिरसागर, महेश बऱ्हाणपुरे, उज्वला बऱ्हाणपुरे, दिपाली एडके, डॉ. पल्लवी क्षिरसागर, चंद्रकला क्षिरसागर यांनी अभिनंदन केले आहे.



### घराच्या गॅलरीत पाय घसरून पडल्याने वृद्धाचा मृत्यू

**सोलापूर, दि. २९ मे-**

घराच्या गॅलरीत थांबल्यानंतर अचानक पाय घसरून पडल्याने ८६ वर्षीय वृद्धाचा मृत्यू झाला. ही घसरून पडल्याची घटना २७ रोजी दुपारी ३.४५ वाजता घडली होती. कालिका प्रसाद कैलास प्रसाद दुबे (वय ८६, रा. उत्तर कसबा, नवजीवन गल्ली, सोलापूर) असे मृत पावलेल्या व्यक्तीचे नाव आहे. कालिका हे २७ मे रोजी दुपारी ३.४५ च्या सुमारास घराच्या गॅलरीत थांबले होते. त्यावेळी त्यांचा पाय घसरून ते गॅलरीत पडून डोक्याला मार लागून जखमी झाले. त्यांना जखमी अवस्थेत खासगी रुग्णालयात उपचारास दाखल केले होते. परंतु प्रकृतीत सुधारणा होत नसल्याने बुधवारी दुपारी ४.३० वाजता मुलगा संजय दुबे यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. परंतु उपचारादरम्यान रात्री ७.५५ वाजता ते मृत पावल्याचे डॉक्टरांनी घोषित केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### माहेरी आलेल्या मुलीला वडीलांनी बदडले

**सोलापूर, दि. २९ मे-**

सासूरवाशीन ही माहेरात आल्यानंतर झालेल्या घरगुती वादातून वडीलांनी तिला बदडले. ही मारहाण गुरुवारी सायंकाळी सातच्या सुमारास झाली. सुजाता गौतम गायकवाड (वय ३२, रा. बक्षी हिप्परगा ता. द. सोलापूर) असे मारहाण झालेल्या विवाहितेचे नाव आहे. सुजाता यांचे सासर हे दक्षिण सोलापूर तालुक्यातील बक्षी हिप्परगा हे आहे. त्या गुरुवारी सायंकाळी जुळे सोलापुरातील माहेरच्या घरी आल्या होत्या. तेथे घरगुती कारणातून त्यांचा वडील यांच्याबरोबर वाद झाला. त्यातून वडील वसंत घाडगे व आई विजया गायकवाड यांनी लाकडाने मारहाण केली. तसेच लाथाबुक्यांनी मारहाण केल्याने डाव्या हाताला मार लागल्याने रात्री १०.२८ वाजता शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### घरगुती कारणातून माशाळ वस्तीत तरुणाला मारहाण

**सोलापूर, दि. २९ मे-**

विजापूर रोडवरील माशाळवस्तीत घरगुती कारणातून तरुणाला मारहाण करण्यात आली. यात मुकामार लागल्याने शासकीय रुग्णालयात त्याच्यावर उपचार करण्यात आले. ही मारहाण मंगळवारी रात्री ११ च्या सुमारास झाली होती. सिध्दाराम महादेव विभुते (वय ३६, रा. माशाळ वस्ती, सोलापूर) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. मंगळवारी रात्री अकराच्या सुमारास सिध्दाराम हा घरात होता. त्यावेळी घरगुती कारणातून वाद झाल्याने राजेश सितारे व इतर दोघांनी दगड तसेच लाथाबुक्यांनी त्यास मारहाण केली. बुधवारी मध्यरात्री १ च्या सुमारास पत्नी पदमावती हिने त्यास शासकीय रुग्णालयात उपचारास दाखल केल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.

### बारा हजारांच्या दुचाकीची चोरी

**सोलापूर, दि. २९ मे-**

देगाव (ता. उत्तर सोलापूर) येथून चोरट्याने १२ हजार रुपयांची दुचाकी चोरून नेली. १९ मे रोजी सकाळी आठच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. याप्रकरणी अनोळखी चोरट्याविरुद्ध सलगरवस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. यातील फिर्यादी रविशंकर नागनाथ ढोबळे (वय ४५, रा. कराळे गल्ली, देगाव, ता. उत्तर सोलापूर) यांनी १८ मे रोजी रात्री नऊच्या सुमारास दुचाकी (एम एच १३ बी एस ४२४१) हँडल लॉक करून घरासमोर लावली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी ती गायब होती. म्हणून सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार जोंधळे पुढील तपास करीत आहेत.




## पालिका निवडणुका महायुती म्हणूनच लढणार; नाही तर मैत्रीपूर्ण लढत शक्य : बावनकुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

राज्यातील सर्व महापालिका निवडणुका महायुती म्हणून लढण्याचा प्रयत्न करणार आहोत जर जमलेच नाही, तर मैत्रीपूर्ण लढत होतील, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले. सोलापूर दौऱ्यावर आले असता बावनकुळे पत्रकारांशी बोलत होते.

ते म्हणाले की सोलापूरच्या भाजपम ध्ये कोठेही मतभेद नाहीत. शहराध्यक्ष निवड करताना विचारपूर्वकच केले आहे. शहराध्यक्ष आणि आमदार ही पक्षाची दोन चाकं आहेत.त्यांच्यात समन्वय आहेत.बाजार समिती निवडणूक पक्ष विरहित असल्यामुळे सर्वांना मुभा दिली होती. त्यामुळे ही निवडणूक झाली. येत्या ऑक्टोबर महिन्यामध्ये महापालिका निवडणुका होतील. सर्व महापालिका निवडणुका महायुती निश्चितच जिंकेल असा विश्वास चंद्रशेखर बावनकुळे यांनी यावेळी व्यक्त केला. सोलापूर शहर जिल्ह्यातूनही भाजपमध्ये अनेक नेते येण्यास इच्छुक आहेत, त्यांना योग्य वेळी प्रवेश होतील असेही ते म्हणाले. आमची सत्ता पाच वर्षे राज्यात असणार आहे. त्यामुळे आता सोलापूर जिल्ह्याला मंत्रीपद मिळाले म्हणून निराश होण्याचे कारण नाही.आगामी काळात निश्चित न्याय मिळेल,असे बावनकुळे म्हणाले. माढा लोकसभा मतदारसंघातून आम दार रणजीतसिंह मोहिते-पाटील यांनी विरोधात काम केले आहे. त्यांच्यावर कारवाई कधी होईल असा प्रश्न विचारला असता,त्यांनी एखाद्या विधान परिषद सदस्याला जर कारवाई करायची असेल तर त्याला त्यावर केंद्रीय समि ती निर्णय घेते.तेथे सर्व चौकशी चालू आहे, असेही ते म्हणाले. या पत्रकार परिषदेला आम दार देवेंद्र कोठे, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर उपस्थित होते.



### पत्नी बनली दुर्गा, त्रिशूलने केली पतीला मारहाण

**सोलापूर :** घरगुती कारणातून सतत होणा-या वादाला कंटाळलेली पत्नी दुर्गा बनली आणि तिने चक्क त्रिशूलने पतीच्या डोक्यात मारून त्यास जखमी केले. ही मारहाण गुरुवारी सकाळी बापूजी नगरच्या येथील स्लटर हाऊस येथे घडली.

कन्हैया तुळजाराम धनेवाले (वय ४५) असे मारहाण झालेल्या पतीचे नाव आहे. कन्हैया आणि त्याच्या पत्नीत गुरुवारी सकाळी सातच्या सुमारास घरगुती कारणातून चांगलाच शाब्दिक वाद झाला. यानंतर संतापलेल्या कन्हैयाच्या पत्नीने घरातील त्रिशूल कन्हैयाला फेकून मारला. या हल्ल्यात कन्हैयाच्या डोक्याला जखम झाली. सकाळी ९.५० वाजता कन्हैया स्वतः उपचारास दाखल झाल्याची नोंद सिव्हील पोलीस चौकीत झाली आहे.



## 'स्त्री शक्ती'कडून हिरकणी योध्यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

महिलांच्या समस्या वाढत चालल्या मुळे स्त्री शक्ती फाउंडेशनने मोठे पाऊल उचलत महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी हिरकणी योध्यांची निवड केली आहे.

महिलांच्या अत्याचार वर खूप समस्या ऐकण्यात येत आहेत त्या करिता स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन ने एक मोठा पाऊल उचलले आहे.सोलापूरात स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन चे हिरकणी योद्धा म्हणून ८ महिलांची निवड करण्यात आली. महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी, महिलांच्या हितासाठी, महिलांच्या उद्योग व रोजगार, तसेच फाउंडेशन च्या माध्यमांतून उभी राहणारी चळवळ, अनेक उपक्रम ,महिलांवरील होणारे अत्याचार इतर सर्व महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन च्या वतीने ही कोअर कमिटी सदस्यांची निवड करण्यात आली आहे.

यामध्ये भाग्यश्री राठोड, माधवी अंधे, प्रिया मेहेरकर, आशा फुलेवार, शिल्पा गाईगवळी, निशा मरोड, मिनाक्षी पट्टनशेट्टी, स्वाती खरवळे यांची निवड करण्यात आली. स्त्री शक्ती सोशल फाउंडेशनची साथ कायम महिलांच्या पाठीशी आहे. महिलांच्या समस्या सोडवण्यासाठी स्त्री शक्ती सोशल फाउंडेशन कायम तत्पर आहे असे संस्थेच्या संस्थापिका अध्यक्षा किरण माशाळकर यांनी सांगितले.

# श्री श्री श्री बसवारूढ महास्वामीजी मठाचे संस्थापक श्री सद्गुरू ईश्वरानंद महास्वामीजी यांचे लिंगैक्य

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे**

श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठाचे संस्थापक श्री सद्गुरू ईश्वरानंद महास्वामीजी (आप्पाजी) (वय ८८) यांचे गुरुवारी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर सोलापुरातील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते.

श्री सद्गुरू ईश्वरानंद महास्वामीजी यांचा जन्म सद्गुरु श्री बसवारूढ महास्वामी व माता बंगारम्मा यांच्या पोटी २८ नोव्हेंबर १९३८ रोजी जत तालुक्यातील सिंदूर गावात झाला. वयाच्या १२ व्या वर्षी दीक्षा घेऊन तसेच वयाच्या १४ व्या वर्षी विचार चंद्रोदय हा ग्रंथ श्रवण करून त्यांनी अवघ्या १५ व्या वर्षी वृत्ती प्रभाकर हा ग्रंथ ऐकला. वेद, उपनिषद, निजगुणांचे शडशास्त्र, न्यायघटित निश्चलदासांचे साहित्य, नीतीशास्त्र अशा अनेक ग्रंथांचे अध्ययन आणि चिंतन करून आप्पाजी यांनी आयुष्यभर लाखो भक्तांना आध्यात्मिक मार्गात प्रबोधनाचे कार्य केले. अनेक कुटुंबांना त्यांचा आध्यात्मिक व पारमार्थिक आधार होता. १९७४ साली विमानतळाच्यामागे कस्तुरबा नगरात श्री श्री श्री सद्गुरु बसवारूढ महास्वामीजी मठाची स्थापना, श्री राजेश्री देवीचे मंदिर, भक्त निवास, अन्नछत्राचीही उभारणी त्यांनी केली. तसेच सर्व जातीतील मुलांसाठी वेद अध्ययन गुरुकुलाची स्थापनाही आप्पाजी यांनी केली. आप्पाजी या नावाने महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि राजस्थानात त्यांचा संख्येने शिष्य परिवार आहे.



### या मान्यवरांनी वाहिली श्रद्धांजली

माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, माजी सहकारमंत्री आमदार सुभाष देशमुख, माजी महापौर किशोर देशपांडे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक सुनील इंगळे, विवेकानंद केंद्राचे महाराष्ट्र व गोवा प्रांत प्रमुख अभय बापट, प्रथमेश कोठे आदींनी श्री सद्गुरू ईश्वरानंद महास्वामीजी यांचे अंत्यदर्शन घेऊन श्रद्धांजली वाहिली.

महाराष्ट्राचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, कर्नाटकचे माजी उपमुख्यमंत्री लक्ष्मण सौदी, आंध्र प्रदेशचे माजी मंत्री जी. जयराम, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे, माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख, माजी सहकारमंत्री आमदार सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे यांच्यासह धार्मिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय अशा विविध क्षेत्र मधील मान्यवर मंडळी श्री श्री श्री बसवारूढ महास्वामीजी मठाचे साधक, भक्त आहेत. श्री सद्गुरू ईश्वरानंद महास्वामीजी यांच्या निधनाची वार्ता समजताच भक्तवर्गामध्ये शोककळा पसरली. त्यांचे पार्थिव गुरुवारी दिवसभर सोलापूर विमानतळाच्या मागील श्री श्री श्री बसवारूढ मठात अंत्यदर्शनासाठी ठेवण्यात आले होते. दुपारी समाधीचा विधी झाला.

## चारचाकी वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वार महिला ठार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

सोलापूर टेक्स्टाईल ते शेळगी दरम्यान हैद्राबाद रस्त्याकडून येणारे चार चाकी वाहनाची धडक लागल्याने जखमी झालेल्या महिलेचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातात आणि एक महिला जखमी झाली आहे. हा अपघात गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास घडला.

रोहिणी सुरेश पुप्पल (वय ४५, रा. दगे रेसिडन्सी, शेळगी) असे मृत पावलेल्या महिलेचे नाव आहे. तर उषा नारायण वाघे (वय ३८, रा. लोहारा जि. धाराशिव) असे जखमी झालेल्या महिलांची नावे आहे. बुधवारी दुपारी यातील महिला या दुचाकीवरून सोलापूर टेक्स्टाईल ते शेळगी असे जात होते. त्यावेळी सोलापूर टेक्स्टाईल समोर हैद्राबाद रोडने आलेले चार चाकी वाहन सुरुवातीला दुभाजकाला धडकले. त्यानंतर त्या वाहनाची महिला जात असलेल्या दुचाकीला धडक बसली. यात दोघी जखमी झाल्याने त्यांना रुग्णवाहिकेतून शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे. यातील रोहिणी यांची शुध्द हरपली होती. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाल्याची नोंद सिव्हिल पोलिस चौकी झाली आहे.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ११३१

**गेले मानामान । सुख दुःखाचें खंडण ।।**

सुखासाठी माणूस सदैव धडपडत असतो. सुखाच्या प्राप्तीसाठी वाट्टेल ते करण्याची तो मानसिकता जोपासतो. केवळ मानसिकताच काय? तर सुखासाठी माणूस वाट्टेल ते करतो सुध्दा! इच्छित साध्य झाले म्हणजे तो सुखी होतो व इच्छित प्राप्त झाले नाही तर तो दुःखी होतो. सर्वांना सुखच पाहिजे असले तरीही प्रत्येकाची सुखाची परिभाषा वेगळी असते हे विशेष आहे. एखाद्याला अत्यंत लहान-सहान घटना, बाबीतून सुख मिळते तर एखाद्याला अशा घटनाचे कांही वाटत नाही. पोटभर साधे जेवण मिळण्यात कांही सुख मानणारे आहेत, तर कांही पंचपक्वान्न मिळूनही त्यात सुख मानत नाहीत. सुखाप्रमाणे प्रत्येकाची दुःखाची परिभाषाही वेगळी असते.



सुख-दुःखाचा अनुभव नाही असा व्यक्ती असूच शकत नाही. आपला मान-सन्मान वाढला म्हणजे सुख व अवमान झाला म्हणजे दुःख मानणारे कांही कमी नाहीत. ज्याच्याकडे मी आहे तो व्यक्ती तर प्रामुख्याने मान-सन्मानातूनच सुखी होतो व मान सन्मान नसेल तर दुःखी होतो. आपण निर्माण केलेल्या मी चे लालन-पालन करणे तसे अवघड आहे. मी हा तसा खूप बलवान असतो. माणसाचे सर्वस्व हरण करण्याची ताकद त्याच्यात असते. मी हा मानवावर राज्य करतो. मी च्या ताब्यात जाणारा माणूस मान-सन्मान, अवमान याचेच सातत्याने गणित करतो. या गणिताचे उत्तर सदैव सुख-दुःखातच निघत असते. मान अवमान , सुख-दुःखाचा विचार ज्याच्याकडे आहे तो स्थिर असू शकत नाही. जो स्थिर नाही, तो समाधानी असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. असे अस्थिरत्व आपल्या जीवनात न येण्यासाठी व आपली एकाग्रता टिकून राहण्यासाठी मान अवमानाला आपल्या जीवनात समान स्थान असावे. मान, अवमान नष्ट झाले म्हणजे सुख-दुःखही आपोआप नष्ट होतात. हे स्पष्ट करतांना तुकाराम महाराज म्हणतात,

**गेले मानामान । सुख दुःखाचें खंडण ।।**
**तुका म्हणजे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ।।**

आपणच निर्माण केलेला मी आपल्या दुःखाला कारणीभूत होत असल्याने त्याला नष्ट करणे आवश्यक आहे. हा मी प्रयन्ताअंती नष्ट होऊ शकतो. मी नष्ट झाला म्हणजे मान अवमानाचे कांही वाटत नाही. मानवाची स्थिरता खऱ्या सुखाला आमंत्रित करते. स्थिरत्व जोपासणाऱ्याला सुख-दुःखाचे कांही वाटत नाही. स्थिरत्वाची ही स्थिती प्राप्त होणे अवघड आहे, मात्र अशक्य नाही. मान अवमान निघुन जाण्याचे व सुख-दुःखाचे खंडण होण्याचे, महाराजांचे शब्द हे त्यांच्या अनुभवाचे आहेत. त्यांच्या जीवनातील ही वस्तुस्थिती आहे. त्यांच्यावर कितीही आघात झाले तरी ते दुःखी झाले नाहीत किंवा त्यांना मोठ्या प्रमाणावर धनसंपदा मिळण्याची संधी आली तरी ते सुखी झाले नाहीत. मानसिक स्थिरत्व ही आत्मज्ञानाच्या मार्गातील महत्वाची पायरी आहे. मान अवमान मानणाऱ्याला सुख-दुःखाच्या जाळयात अडकावे लागते. सुख-दुःखाचे जाळे आत्मज्ञानाच्या मार्गातील मोठा अडसर आहे. संतांकडे या अडसराला स्थान नसते. मान-अवमानाची नष्टता म्हणजे चित्ताची स्थिरता होय. चित्ताची स्थिरता मनावर ओझे वाढू देत नाही. डोक्यावरचे ओझे उतरविता येते पण मनावरचे ओझे उतरविणे अवघड असल्याने मान-अवमानतून बाहेर पडून मनाला सुख-दुःखाच्या, मीच्या ओझ्यातून मुक्त करणे योग्य असेल.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : शुक्रवार | दिनविशेष - चांगला दिवस |
| दि. ३० मे २०२५ | गुरु अर्जुनदेव शहीद दिन, |
| विक्रम संवत् २०८१ | गोवा राज्य दिन |
| शके - १९४७ | ....राहू काल.... |
| संवत्सर - विश्वावसु | रविवार : दु.४.३० ते ६.०० |
| मास - ज्येष्ठ | सोमवार : स. ७.३० ते ९.०० |
| शु. चतुर्थी (२१.२२) | मंगळवार : दु. ३.०० ते ४.३० |
| ऋतु - ग्रीष्म | बुधवार : दु. १२ ते १.३० |
| नक्षत्र - पुनर्वसु (२१.२८) | गुरुवार : दु. १.३० ते ३.०० |
| योग - गंड (१२.५६) | शुक्रवार : स.१०.३० ते १२ |
| करण - वणिज (१०.१४) | शनिवार : स. ९ ते १०.३० |

### राशीभविष्य

**मेष** : अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील. कौटुंबिक परिवारात सुख - शांती मिळेल.

**वृषभ** : मुलांनी केलेल्या कामांमुळे प्रतिष्ठा वाढेल. कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**मिथुन:** व्यवसायाच्या विस्तारा संबंधी योजना आखाल. आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता.

**कर्क:** अडकलेला पैसा मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.

**सिंह** : व्यावहारिक अडचणी दूर होतील. विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता. पत्नीसोबत मतभेद.

**कन्या** : कुटुंबात प्रसन्न वातावरण राहील. व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा, आर्थिक स्थिती चांगली राहील.

**तुळ** : आवश्यक कामांसाठी पूर्ण वेळ द्यावा. आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा.

**वृश्चिक** : अनिश्चिततेमुळे अडचणी वाढतील. व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**धनु** : योजनेनुसार कामे पार पडणार नाहीत. व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दुःखी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत.

**मकर** : फायद्याच्या बातम्या ऐकण्यास मिळतील. सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ** : मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वतः निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** कर्मा विषयी उत्साह ठेवा. बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

# लालपरीचे रुपडे बदलणार; एसटी हायटेक

## आता प्रवाशांना मिळणार आरामदायी सेवा

### प्रत्येक विभागांना अत्याधुनिक सेवा अन् सुविधांनी सज्ज बसेस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**

स्वारगेट येथील घटनेनंतर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेसाठी प्राधान्य क्रमाने वापरले जाणारी सेवा अर्थात एसटी महामंडळ प्रवाशांच्या सेवेसाठी अधिक गतिमान होणार आहे. यामध्ये प्रवाशांची सेवा तसेच सुरक्षितता यावर जास्तीचा भर असणार आहे. नुकतेच याबाबत परिवहन मंत्र्यांनी बैठकी घेऊन एसटीच्या सेवा आणि सुरक्षितता यामध्ये अमुलाग्र व अत्याधुनिक बदल करण्याच्या गोष्टी नमूद केल्या आहेत. त्याच पार्श्वभूमीवर मागील काही दिवसांपासून एसटीच्या सेवेमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होत आहे.

दरम्यान, प्रवाशांना लांब व जवळच्या अशा दोन्ही प्रवासात कोणत्याही अडचणी येऊ नये, यासाठी विशेष लक्ष दिले जात आहे. प्रवाशांना प्रवास हा अधिक आरामदायक व्हावा यासाठी महामंडळातर्फे आता नव्या बस घेतल्या जाणार आहेत. या नव्या बसेसची बांधणीही ३ बाय २ अशी असणार आहे. यामध्ये प्रवाशांना यापूर्वीपेक्षा अधिक आरामदायी व टेन्शन फ्री प्रवास करता येणार असल्याची माहिती एसटीच्या अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, महामंडळाकडून तीन हजार नवीन बस घेतले जाणार असल्याची घोषणा करण्यात आली. यातील काही बस आता तीन बाय दोनच्या आसनाच्या असणार आहेत. या बस प्रत्येक जिल्ह्यात देण्यात येणार आहे.यामुळे एसटी ही आता हायटेक होऊ लागली आहे. ती लक्झरी बससारखी असणार आहे. यात टीव्ही पाहत प्रवास करता येणार आसल्याचे सांगण्यात आले आहे.




### रेडिमेड गाड्या मिळणार

एसटीने १५ वर्षांनंतर ३ बाय २ आसन व्यवस्थेच्या, स्लिपर व इतर ३ हजार नवीन बसेस खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर नव्या रूपातील लालपरी थेट कंपनीकडूनच बांधणी करण्यात येणार आहे. यात लालपरीच्या केबिनमध्ये डिजिटल बोर्ड दिले जाणार आहे. यात एसी, आरामदायी सीट, ऑटोमॅटिक दरवाजा अशा सोयी असणार आहेत. यामुळे एसटी ही आता हायटेक होऊ लागली आहे. ती लक्झरी बससारखी असणार आहे. यात टीव्ही पाहत प्रवास करता येणार आहे.

### प्रत्येक बसेसमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा पॅनिक बटन व वायफाय

नव्या रंगात लालपरी कंपनीकडून थेट रस्त्यावर उतरणार आहे. यात डिजिटल बोर्ड, इंजीनमध्ये सेन्सर्स, एलईडी टीव्ही, आरामदायी आसन असणारच आहेत. शिवाय त्यामध्ये वायफायची सोय असणार आहे. महत्त्वाचे म्हणजे सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे आणि पॅनिक बटनही असणार आहे. त्याशिवाय यात जीपीएसही असणार आहे.




## सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन

**सोलापूर, दि.२८ मे-**

जनतेच्या तक्रारी, गाऱ्हाणी ऐकण्यासाठी जिल्हास्तरीय लोकशाही दिनाचे सोमवार, दि. २ जून रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, सात रस्ता, सोलापूर येथे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली. या लोकशाही दिनात मागील सहा महिन्यातील लोकशाही दिनाच्या निवेदनावर केलेल्या कारवाई अहवाल तसेच माहिती अधिकार अधि.-२००५ अंतर्गत प्राप्त अर्ज, आपले सरकार पोर्टलवरील प्रलंबित तक्रारीवर केलेली कार्यवाही याबाबत निपटारा करण्यात येणार असल्याची माहिती निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांनी दिली.

# दुहेरी पाईपलाईनचा नागरिकांना लाभ कधी?

## एमआयएमचा सवाल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

सोलापूर हे कामगारांचे, गोरगरिबांचे, विडी कामगारांचे शहर आहे. येथे मोठ्या प्रमाणावर आर्थिकदृष्ट्या दुर्बल व मध्यमवर्गीय नागरिक राहतात. अनेक वर्षांपासून सोलापूर मधील नागरीक खडतर आयुष्य जगत आहेत.सोलापूर महापालिकेमार्फत विविध माध्यमांतून नागरिकांना आश्वासन दिले जात आहे. ''सोलापूरकरांना दोन दिवस आड पाणी मिळणार .'' मात्र, वस्तुस्थिती अशी आहे की हे आश्वासन वर्षानुवर्षे फसवे ठरत आहे. आजही सोलापूरकरांना रात्री उशिरा अथवा अनियमित पाणी मिळत आहे. एमआयएम पक्षाच्या वतीने या प्रमुख मागण्यां करत वेळोवेळी निवेदन देत आले आहे. अद्यापपर्यंत नागरिकांना महापालिकेकडून आश्वासनांची पूर्तता झाली नाही. मंगळवारी सायंकाळी एमआयएम पक्षाच्या वतीने फारूक शाब्दी यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले.



महापालिका दरवर्षी टॅक्स आकारते, नागरिक जबाबदारीने तो भरतात, मात्र त्यांना मूलभूत गरज असलेल्या पाण्यासाठी त्रास सहन करावा लागतो ही खेदाची बाब आहे.सोलापुरात दुहेरी पाणीपुरवठा योजना राबविण्यात आलेली असूनही, तिचा नागरिकांना अपेक्षित लाभ होताना दिसत नाही. पावसाळ्याचे दिवस लवकर सुरू झाले आहे. आगामी काळात पाण्याची मागणी अधिक वाढणार आहे. अशा स्थितीत नियोजनपूर्वक आणि त्वरित उपाययोजना आवश्यक आहेत.फारूक शाब्दी यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयएम पक्षाने प्रमुख मागण्या केल्या आहेत. सोलापूर शहराला नियमित आणि वेळेवर पाणीपुरवठा करण्यात यावा.दुहेरी पाणीपुरवठा योजनेचा प्रभावी उपयोग करण्यात यावा. नागरिकांना आठवड्यातून कमीतकमी ३ वेळा पूर्ण दाबाने आणि वेळेत पाणी देण्यात यावे.योजनेबाबत पारदर्शक माहिती प्रसिद्ध करण्यात यावी. ज्याठिकाणी पाणी वेळेवर पोहोचत नाही, तेथे विशेष उपाययोजना त्वरित कराव्यात.महानगरपालिका अधिकाऱ्यांना निवेदन देताना नगरसेवक अहजर हुंडेकरी, वाहेदा भंडाले,शौकत पठाण, तोफिक हत्तुरे, इलियास शेख, नदीम डोणगावकर, इजाज कोरबू, सादिक नदाफ, एजाज बागवान अयाज दिना पक्षाचे पदाधिकारी व इतर कार्यकर्ते उपस्थित होते




## आई प्रतिष्ठानचा महाराष्ट्र महागौरव पुरस्काराने सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

डिजिटल मीडिया संपादक पत्रकार संघटना महाराष्ट्रतर्फे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या आई प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेला महाराष्ट्र महागौरव पुरस्कार २०२५ ने सन्मानित करण्यात आले. पुणे येथे झालेल्या या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, आयुष्यमान भारत मिशनचे प्रमुख डॉ. ओमप्रकाश शेटे, ज्येष्ठ पत्रकार सरिता कौशिक, मंत्रालय तथा विधिमंडळ वार्ताहर संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, डिजिटल मीडिया संघाचे राजा माने यांची प्रमुख उपस्थिती होती.




## सुकळे प्रशालेचा दहावीचा निकाल ८२ टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

सुनील नगर येथील श्री यतिराज शिक्षण प्रसारक मंडळ संचालित अरुण प्राथमिक शाळा व लक्ष्मीबाई रामभाऊ सुकळे प्रशालेचा दहावीचा निकाल ८२.०५ टक्के लागलेला आहे. यंदाही मुलींनीच बाजी मारली. यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक शंकर चौगुले व सचिव विजयकुमार चौगुले यांनी अभिनंदन केले. प्रथम क्रमांक वेनेला यनगदुंल, द्वितीय भाग्यलक्ष्मी मादास व तृतीय यमुना मैले या विद्यार्थिनींनी घवघवीत यश मिळविले. मुख्याध्यापिका अंबुबाई पोतू यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन केले

## बुद्धिवादी विचारसरणीच्या निर्मितीसाठी एज्युगेम्स इन्फिनिटी मोहीम

**सोलापूर, दि. २९ मे-**

भारतातील आघाडीच्या नोटबुक आणि स्टेशनरी उत्पादन कंपनी असलेल्या आयटीसीच्या क्लासमेटने एज्युगेम्स इन्फिनिटी ही एक नावीन्यपूर्ण खेळांचा समावेश असलेली वही बाजारात दाखल केली आहे, ज्यामध्ये खेळ आणि शिक्षणाचे अखंड मिश्रण आहे. यामध्ये शिक्षणाचे भन्नाट अनुभवात रूपांतर करण्याच्या उद्देशाने एक मजेदार आणि आकर्षक उपक्रमही समाविष्ट करण्यात आले आहेत. दरम्यान, क्लासमेट एज्युगेम्स इन्फिनिटी आता एक अनोखी मोहीम सुरू करत आहे.हे प्रत्यक्षात आणण्यासाठी क्लासमेट येत्या २४ मेपासून ३० शहरांमध्ये एक मोहीम राबवत आहे. यात सोलापूरचा समावेश आहे. भावंडांची प्रसिद्ध अशी जोडी आणि भारतीय बुद्धिबळ ग्रँडमास्टर्स आर. प्रज्ञानंद आणि आर. वैशाली हेदेखील ३० दिवसांसाठी एज्युगेम्स इन्फिनिटीमध्ये सहभागी होणार आहेत.

# पोलिस कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करून हाताच्या अंगठ्याला घेतला चावा

## मोबाईल गल्ली सलगर कॉम्प्लेक्समध्ये घडली घटना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

दिलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ स्पा उघडून ठेऊन साऊंडवर आवाज मोठा ठेऊन नाचणाऱ्या स्पा चालकास आवाज कमी करून स्पा बंद करण्याबाबत सांगणाऱ्या पोलिस कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की करून कर्मचाऱ्याच्या हाताच्या अंगठ्याचा चावा घेऊन सरकारी कामात अडथळा आणल्याप्रकरणी तिघांवर फौजदार चावडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २६ मे रोजी रात्री आकराच्या सुमारास नवी पेठेतील मोबाईल गल्लीतील सलगर कॉम्प्लेक्स येथील चौथ्या मजल्यावर असलेल्या इरा स्पा सेंटर येथे घडली.

याबाबत पोलिस हवालदार प्रविण चुंगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सुलेमान रफिक शेख (वय ३६, रा. २९६, सहारा नगर, मुलतानीया बेकरीजवळ, होटगी रोड), हर्षल अमोल हजारे (वय २२, रा. पिंपळा मारूती मंदीरजवळ, नवजवान गल्ली, चौपाड) आणि ओमकार अविनाश शिंदे (रा. महादेव मंदीरजवळ, जय मल्हार चौक, बुधवार पेठ) याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

२६ मे रोजी पोलिस हवालदार प्रविण चुंगे व विनोद पुजारी यांना पोलिस ठाण्याच्या हद्दीत रात्रगस्तीकरीता नेमण्यात आले होते. रात्री पेट्रोलिंग करताना साडेबाराच्या सुमारास नवी पेठ मोबाईल गल्ली येथील सलगर कॉम्प्लेक्स समोरून जाताना चुंगे यांना मोठमोठ्याने आवाज येत असल्याने त्यांनी सलगर कॉम्प्लेक्समध्ये जाऊन आवाज कोठून येतो याची तपासणी करण्यास सुरुवात केली. त्यावेळी कॉम्प्लेक्समधील चौथ्या मजल्यावर असलेल्या इरा स्पा सेंटरचा दरवाजा उघडा ठेऊन तेथे तीन जण साऊंडवर मोठ्या आवाजात गाणे लावून मोठ मोठ्याने आरडा ओरड करीत असताना दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी आम्ही पोलिस आहोत, स्पा बंद करा, साऊंड बंद कराव आवाज करू नका असे सांगत होते. त्यावेळी त्या तिघांनी पोलिस कर्मचाऱ्यांच्या अंगावर येऊन तू कोण का असेना, त्यातील एकाने तुझा काय संबंध मला सुलेमान शेख म्हणतात आम्ही काहीही करू असे म्हणून पोलिसांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यावेळी सुलेमान शेख याने चुंगे याची गच्ची धरून ओढून हाताच्या डाव्या अंगठ्याला चावा घेतला. त्यामुळे चुंगे यांनी याबाबत पोलिस ठाण्याला कळविले असता पोलिसांचा जादा कुमक घटनास्थळी आली. पोलिसांनी त्या तिघांनाही ताब्यात घेतले असता त्यांची नावे सुलेमान शेख, हर्षल हजारे आणि ओमकार शिंदे अशी सांगितली. हर्षल हजारे हा इरा स्पा सेंटरचा चालक असून शेख व शिंदे हे दोघे कामगार आहेत. या तिघांनाही पोलिसांनी ताब्यात घेऊन पोलिस ठाण्यात आणले. पोलिस उपनिरीक्षक पाटोळे तपास करीत आहेत.

# टेट परीक्षेसाठी केंद्र निवडले एक आणि परीक्षा दुसऱ्याच केंद्रावर

## एकाच वेळी अनेक स्पर्धा परीक्षा, उमेदवार संभ्रमात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

मे महिन्याच्या शेवटच्या टप्प्यात महाराष्ट्र लोकसेवा आयोग एमपीएससी व केंद्रीय लोकसेवा आयोग यूपीएससी आणि राज्यातील विद्यापीठांच्या परीक्षा नियोजित असतानाच शिक्षक भरतीसाठीची शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी ही परीक्षा २७ मे ते ५ जून या कालावधीत घेण्यात येत आहे. या सर्व परीक्षा एकाच कालावधीत आल्यामुळे अनेक उमेदवारांपुढे एकाच वेळी तीन परीक्षा असल्याने कोणती परीक्षा द्यावी? असा गोंधळ निर्माण झाला आहे. परिणामी शेकडो उमेदवारांवर मानसिक व आर्थिक ताण येत असून, एका परीक्षेला मुकण्याची वेळ त्यांच्यावर येणार आहे.

महाराष्ट्र लोकसेवा आयोग राज्य सेवा मुख्य परीक्षा २७ ते २९ मे दरम्यान तर गट-क अराजपत्रित परीक्षा १ जून रोजी आहे. युपीएससी ची नागरी सेवा पूर्व परीक्षा सुद्धा या कालावधीतच घेण्यात येणार आहे. दरम्यान, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद ही टिआयटी परीक्षा २४ मे ते ५ जून या कालावधीत घेत आहे. विशेष म्हणजे, यासंदर्भात विद्यार्थ्यांनी वेळापत्रकातील अडचणी नोंदवून दिलेल्या होत्या, तरीसुद्धा परीक्षांचे नियोजन जसंच्या तसं ठेवण्यात आलं आहे. अनेक उमेदवारांनी निवडलेली परीक्षा केंद्रे लक्षात घेतली असताना देखील त्यांना इतर जिल्ह्यांमध्ये केंद्र देण्यात आली आहेत. भर पावसात प्रवास,आर्थिक खर्च आणि वेळेचा अपव्यय यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. एकाच वेळी अनेक महत्त्वाच्या परीक्षा होणं ही विद्यार्थ्यांवर अन्यायकारक गोष्ट आहे. उमेदवारांनी दिलेली परीक्षा केंद्र वेगळे होते मात्र महाराष्ट्र परीक्षा परिषदने अचानक परीक्षा केंद्रही बदलल्याने अधिक अडचणी येत आहेत. परीक्षा केंद्रे स्थानिक पातळीवर ठेवल्यास सोयीचं होईल.यामुळे भावी गुरुजीना अडचण निर्माण होणार नाही.



सोलापूर जिल्ह्यातून जवळपास १२ हजार पेक्षा जास्त उमेदवार शिक्षक अभियोग्यता परीक्षा देणार असून जिल्ह्यातील जवळपास ८ हजार पेक्षा जास्त उमेदवारांच्या परीक्षा आहेत. त्यांनी निवडलेल्या जिल्हा सोडून च मराठवाडा, विदर्भ या ठिकाणीअसलेले परीक्षा केंद्रावर परीक्षा होणार असल्याने त्या जिल्ह्यात जाऊन त्यांना परीक्षा द्यावा लागत आहे . त्यामुळे त्यांची धावपळ होणार आहे.

### परीक्षा केंद्रांबाबतही गोंधळ

माझे विद्यापीठाच्या परीक्षा आणि टेट परीक्षा एकाच दिवशी असल्याने कोणती परीक्षा द्यायची, हे ठरवणं कठीण जात आहे. त्यामुळे माझी एक वर्षाची शैक्षणिक नुकसान होणार असून याची जबाबदारी कोण घेणार असे अनेक उमेदवार मानसिक तणावात आहेत.

**-अमोल पाचलिंग,**
**अभियोग्यताधारक परीक्षार्थी**

_फक्त दहा दिवस आधी वेळापत्रक जाहीर करून परीक्षा घेतल्या जात आहेत. त्यामुळे नियोजनात कमी वेळ मिळत आहे. या वेळापत्रकात योग्य ते बदल व्हावे. टेट परीक्षा पुढे घ्यावी अशी आमची मागणी होती. मात्र परीक्षा परिषद ने तीनच दिवस पुढे घेतल्यामुळे नियोजन होऊ शकले नाही. मात्र परीक्षा केंद्र बदलून द्यावी, ही आमची मागणी आहे.

**- तुषार देशमुख, अध्यक्ष,**
**युवा विद्यार्थी असोसिएशन**




## ऑलिंपियाडमध्ये सोलापूरच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

सोलापूर येथील श्री चतुरबाई श्राविका प्राथमिक शाळेतील विप्रकाश शिंदे यांनी जगातील सर्वात मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षा २०२४ - २५ मध्ये आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये दुसरा क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय रौप्य पदक आणि प्रमाणपत्र जिंकले.या वर्षीच्या सोफ ऑलिंपियाडमध्ये ७२ देशांतील सुमारे लाखो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता ज्यात सोलापूरमधील २७५४० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता. सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (एसओएफ) ने दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे २०२४-२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेतील टॉपर विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमात विविध शाळांमधील ७५० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. या प्रसंगी, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे.के. माहेश्वरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.यावर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर २२२ विद्यार्थ्यांना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे.के. माहेश्वरी, सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनचे संस्थापक संचालक महाबीर सिंग यांच्या उपस्थितीत सन्मानित करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# लोकाभिमुख प्रशासनात जिल्हा सर्वोत्कृष्ट असला पाहिजे

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे; नियोजन समिती सभागृहात बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ मे-**

राज्य शासनाच्या फ्लॅगशिप उपक्रम व योजनांची महसूल अधिकारी कर्मचारी यांनी सविस्तर माहिती घेऊन त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. जिल्ह्यातील सर्व महसूल अधिकारी कर्मचाऱ्यांनी पुढील सहा महिन्यात महसूल अंतर्गतची सर्व कामे अत्यंत पारदर्शकपणे करून संपूर्ण राज्यात सोलापूर हा सर्वोत्कृष्ट महसुली जिल्हा झाला पाहिजे यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

नियोजन समिती सभागृहात आयोजित महसूल विभागाच्या आढावा प्रसंगी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे बोलत होते. यावेळी आमदार देवेंद्र कोठे, जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, अपर जिल्हाधिकारी मोनिका सिंह ठाकुर, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, तहसिलदार श्रीकांत पाटील, तहसिलदार दिनेश पारगे यांच्या सह सर्व उपविभागीय अधिकारी व तहसीलदार उपस्थित होते.

महसूल मंत्री बावनकुळे पुढे म्हणाले की, महसूल अधिकाऱ्यांनी विशेषत: तहसीलदार यांनी प्रत्येक आठवड्यातील किमान एक दिवस एका गावात जाऊन तेथील लोकांशी संवाद साधावा. त्या लोकांना शासकीय योजनांची माहिती द्यावी. त्यांचे काही प्रश्न व समस्या असतील त्या ऐकून घ्याव्यात त्या सोडवण्यासाठी तात्काळ कार्यवाही करावी. हे शासन प्रशासन पारदर्शक व गतिमान असून अशा पद्धतीने लोकात मिसळून त्यांचे प्रश्न समस्या ऐकून त्यावर कारवाई केल्यानंतर ते अधिक लोकाभिमुख होईल. त्यांचा प्रशासनावरील विश्वास अधिक दृढ होईल. त्यामुळे अधिकाऱ्यांनी जनसंवादाचा हा सोलापूर पॅटर्न तयार करून संपूर्ण राज्यासाठी पथदर्शक ठरेल या पद्धतीने काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.

अपार, जीवंत सातबारा तसेच शंभर दिवस कार्यक्रम अंतर्गत प्रशासनाने केलेल्या कामांचे महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी कौतुक केले. तसेच पाणंद रस्त्यासाठी नागपूर पॅटर्न जिल्ह्यात राबवावा. यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून १२ फूट रुंद व एक किलोमीटर लांब रस्त्यासाठी दहा लाखाचा निधी देण्यात येतो. यासाठी प्रयत्न करून जास्तीत जास्त रस्ते कामे मार्गी लावावी असे आवाहन त्यांनी केले. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती बैठकीत दिली. यामध्ये गौण खनिज वसुली ९७ कोटी झाली असल्याचे सांगून नवीन शासन निर्णयाप्रमाणे नवीन वाळूधरणार नुसार जिल्ह्यात नऊ वाळू गटाची टेंडर प्रक्रिया लवकरच सुरू होणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील २०६६ भूमिहीनांपैकी २५२ भूमीहिनांना घरकुलासाठी जमीन वाटप करण्यात आलेले असून उर्वरित सर्वांना २० जून पर्यंत जमीन वाटप केले जाणार आहे. महाराज स्वाभिमान अंतर्गत १३४ शिबिरे घेण्यात आलेली असून विद्यार्थ्यांना त्वरित दाखल्यांचे वाटप करण्यात आलेले आहे. प्रारंभी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते सोलापूर जिल्ह्यातील प्राथमिक स्वरूपात पाच घरकुल लाभार्थ्यांना नवीन वाळू धोरणानुसार मोफत वाळू घेऊन जाण्यासाठी रॉयल्टी प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. यावेळी मंत्री महोदयांनी लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू घेऊन जाऊन घरकुल बांधण्याचे आवाहन केले.

### ५.१२ लाख शेतकऱ्यांची ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत नोंदणी

सोलापूर जिल्ह्यात ८.९३ लाख शेतकऱ्यांची संख्या असून ॲग्रीस्टॅक उपक्रमांतर्गत ५.१२ लाख शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली आहे. केंद्र व राज्य शासनाच्या शेतकऱ्यांसाठी असलेल्या सर्व योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांना मिळण्यासाठी ॲग्रीस्टॅक अंतर्गत नोंदणी करणे आवश्यक असल्याने ज्या शेतकऱ्यांनी नोंदणी केलेली नाही त्या शेतकऱ्यांनी अत्यंत तत्परतेने नोंदणी करून घ्यावी. जोपर्यंत शेतकरी या अंतर्गत नोंदणी करणार नाहीत, तोपर्यंत त्यांना वीज बिलात सवलतीचा लाभ मिळणार नाही याची शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी, असेही आवाहन महसूल मंत्री बावनकुळे यांनी केले.

---

## महत्वाचे...



### लायसन्सड इंजिनिअर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी सारंग कोळी यांची निवड

**पंढरपूर, दि. २९ मे-**

लायसन्सड इंजिनिअर्स असोसिएशनचा पदग्रहण समारंभ साजरा करण्यात आला. यावेळी असोसिएशनच्या अध्यक्षपदी इंजि.सारंग कोळी आणि सचिव पदी इंजि. सोमनाथ काळे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सिंहगड कॉलेजचे प्राचार्य डॉक्टर कैलास करांडे आणि कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून स्वेरी कॉलेजचे अध्यक्ष इंजिनिअर दादासाहेब रोंगे हे उपस्थित होते. यावेळी सचिवपदी इंजिनियर सोमनाथ काळे, उपाध्यक्षपदी इंजिनीयर राजकुमार आटकळे, सहसचिव पदी इंजिनियर ललित कुमार पाटील, खजिनदारपदी इंजिनिअर सचिन माळवदे, आणि कार्यकारणी सदस्य म्हणून इंजिनियर संतोष कचरे इंजिनियर संतोष रोपळकर आर्किटेक्ट बाळ कुंभार आर्किटेक्ट यतिन गांधी इंजिनियर ज्ञानेश्वर कोले इंजिनीयर प्रवीण जगताप यांना सन्मानपूर्वक पदनियुक्त करण्यात आले. पदग्रहणाचा कार्यक्रम पार पाडण्यासाठी अल्ट्रा टेक सिमेंट कंपनी कडून मोठे सहकार्य लाभले. या कार्यक्रमास अल्ट्राटेक चे टेक्निकल मॅनेजर इंजिनीयर राजेश कांबळे सेल्स मॅनेजर श्री संदीप कदम सेल्स अधिकारी राकेश पाटील, आर एम सी प्लांटचे इंजिनियर शेख साहेब व इंजिनियर सुहास वसेकर हे उपस्थित होते या प्रसंगी अल्ट्राटेक कंपनीकडून सर्व नूतन पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा देऊन गौरवण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी इंजिनिअर राजेश कांबळे व इंजिनिअर शेख साहेब यांनी कंपनीचे प्रेझेंटेशन केले. सूत्रसंचालन इंजिनिअर जितू बत्रा यांनी केले तर आभार सोमनाथ काळे यांनी मानले.



### सांगोला महाविद्यालयात सावरकर जयंती साजरी

**सांगोला, दि. २९ मे-**

सांगोला येथील सांगोला महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्र. प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करून प्रतिमेचे पूजन करण्यात आले. सावरकरांचा जन्म २८ मे १८८३ रोजी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील भगूर गावात झाला होता. तरुणपणापासूनच त्यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात संघर्ष करण्याचा निर्धार केला. १९०९ मध्ये त्यांनी १८५७चे स्वातंत्र्यसमर हे ग्रंथलेखन करून इतिहासाची नवीन मांडणी केली. इंग्लंडमध्ये असताना त्यांनी अभिनव भारत या क्रांतिकारी संघटनेची स्थापना केली होती. ब्रिटिश सत्तेविरोधातील कटात सहभाग असल्यामुळे त्यांना अटक झाली आणि त्यानंतर अंदमानच्या सेल्युलर जेलमध्ये कठोर कारावास भोगावा लागला. तुरुंगातील त्यांचे अनुभव आणि विचार पुढे माझी जन्मठेप या आत्मचरित्रात उलगडले गेले असे मनोगत डॉ. सुरेश भोसले यांनी यावेळी व्यक्त केले. कार्यक्रमाचे नियोजन कार्यालयीन अधीक्षक प्रकाश शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.ए.एम.पवार व बाबासो इंगोले यांनी केले.



### स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या कार्यापासून प्रेरणा घ्यावी : मल्लिनाथ कल्याणशेट्टी

**अक्कलकोट, दि. २९ मे-**

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत इंग्रजांच्या सत्तेविरुद्ध आंदोलन करून देशभक्तीचा आदर्श घालून देणाऱ्या स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कार्यापासून युवकांनी प्रेरणा घेतली पाहिजे, असे प्रतिपादन मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांनी व्यक्त केले. मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने सावरकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेस पुष्पहार अर्पण केल्यानंतर ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मल्लिकार्जुन मसुती होते.यावेळी सेमी विभाग प्रमुख रूपाली शहा हे उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. एस. आर. लोखंडे यांनी केले तर आभार प्रा. शितल फुटाणे त्यांनी मानले. कार्यक्रमास प्रा. राजशेखर पवार, प्रा. हर्षदा गायकवाड, प्रा. शिल्पा धूमशेट्टी, प्रा. शितल टिंगरे, प्रा. सविता कळ्ळीमठ उपस्थित होते.




### फॅबटेक कॉलेजच्या विद्यार्थ्यांची विविध कंपनीस भेटी

**सांगोला, दि. २९ मे-**

सांगोला येथील फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च मधील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातील विद्यार्थ्यांनी सांगली, कोल्हापूर व मालवण येथील कंपनीस भेटी दिल्या असल्याची माहिती विभाग प्रमुख डॉ. सोमनाथ ठिंगळे यांनी दिली. फॅबटेक कॉलेज मधील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातील द्वितीय व तृतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांनी सांगली येथील इन्फोयशोनंद टेक्नॉलॉजी प्रायव्हेट लिमिटेड, कोल्हापूर येथील प्रोमैक्सिस प्रोग्रॅमिंग सोल्युशन प्राइवेट लिमिटेड आणि मालवण येथील सोफ्टलॉब ग्रुप प्राइवेट लिमिटेड याठिकाणी भेटी देऊन त्या कंपनीच्या उत्पादनाची माहिती घेतली. व्हिजिट यशस्वी करण्यासाठी प्रा. गणेश हुंडेकरी, प्रा.विनायक साळे, प्रा. चैत्राली धुमाळ, प्रा.प्रियंका गुजरे यांनी परिश्रम घेतले.

---

# प्रत्येकाने एक तरी कला जोपासावी

## डॉ. किसन झिपरे; अक्कलकोटमध्ये छंदवर्गाचा समारोप



**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ मे-**

मनुष्य हा कलेने अजरामर होतो म्हणून प्रत्येकाने किमान एक तरी कला जोपासली पाहिजे, असे प्रतिपादन राजेराय मठाचे सचिव तथा अक्कलकोट महाविद्यालयाचे सेवनिवृत्त प्राचार्य डॉ. किसन झिपरे यांनी केले. श्री राजेराय मठ आयोजित बेला फौंडेशनच्या सहकार्याने अतुल जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली आणि श्रध्दांक झिपरे यांच्या नियोजनाने घेण्यात आलेल्या छंदवर्ग समारोप व चित्रकला स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ विद्यार्थ्यांच्या विविध कला गुणदर्शनाने संपन्न झाला. त्या प्रसंगी ते बोलत होते. छंदवर्ग हा ११ ते २६ मे या कालावधीत पार पडला. अक्कलकोटच नव्हे तर परजिल्यातील विद्यार्थ्यांनी सुध्दा यास उत्तम प्रतिसाद दिला. सद्गुरू बेलानाथ बाबांच्या २२ व्या पुण्यतिथीचे औचित्य साधून चित्रकला स्पर्धा घेतली गेली. सदर स्पर्धा एकूण पाच गटात विभागली होती. यात विश्वम दंतकाळे, समर्थ काकडे, तेजस्वी महिंद्रकर, समर्थ स्वामी, तनुजा लष्करे यांनी विविध गटात प्रथम पारितोषिकाचे मानकरी ठरले तर द्वितीय क्रमांक अनुक्रमे अक्षता फुलसे, प्रसन्न गुजरे, रुद्राक्ष हल्लाळे, पूर्वा गुजरे, समदानी नदाफ यांनी मिळविला तर त्रुतिय क्रमांकामध्ये भक्ती तेलंगी,पवनकुमार बेंद्रे, पुर्वी करकी, श्रेया पाटील, रतिकांत पाटील हे विजेते ठरले. राजेराय मठाच्या प्रांगणात पार पडलेल्या कार्यक्रमास विचार पिठावर मठाचे सचिव किसन झिपरे, उपाध्यक्ष विकास दोडके, विश्वस्त नागनाथ गाजुल,बालाजी गाजुल, भाऊ महाराज राऊत, शक्ती टोणे,ललिता गाजुल, माधुरी गाजुल, वैशाली गाजुल यांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले, वरील मान्यरांना बेला फौंडेशनचे अध्यक्ष श्रध्दांक झिपरे यांनी सन्मानित केले. सूत्रसंचालन अतुल जाधव यांनी केले तर आभार श्रध्दांक झिपरे यांनी मानले. कार्यक्रमास सुदाम पाटील, विक्रम पाटील, रतिकांत पाटील, सुनील भाले, सिध्दाराम पुजारी, विशाल मंगरुळे, राहुल बिराजदार, अमोघसिध्द पुजारी, नमित झिपरे, संतोष बळुरगी उपस्थित होते.

---



# अति पावसामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे करा; तहसीलदारांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ मे-**

बार्शी तालुक्यात गेली पंधरा दिवस झाले, अवेळी (अवकाळी) पावसाने रब्बी हंगामातील कांदा, भुईमूग तसेच कलिंगड, खरबूज, टोमॅटो, मिरच्या, वांगी, भोपळा व इतर भाजीपाला पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडलेला आहे. तहसीलदारांनी संबंधित तलाठी, ग्रामसेवक आणि कृषी सहाय्यक यांना रब्बी हंगामातील कांदा व भुईमूग पिकाचे अवेळी पावसाने नुकसान झालेल्या पिकाचे पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत. या मागणीचे निवेदन तहसीलदार यांना राहुल भड, अशोक माळी, पाडूरंग घोलप, अशोक आगलावे, सौदागर डोंगरे, गणेश मगर आदी शेतकऱ्यांनी दिले आहे.

---

# पिलीव परिसरातील शेतकरी पेरणीसाठी सज्ज

### पावसाच्या उघडीपीकडे लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. २९ मे-**

महाराष्ट्रात यंदा मे महीन्यातच समाधानकारक पाऊस झाल्यामुळे शेतकरी सुखावला आहे. माळशिरस तालुक्यासह पिलीव परीसरात सुदधा यंदा मे महीन्यातच चांगला पाऊस झाला आहे. गेलया आठवडाभरापासून पिलीव परीसरात चांगला पाऊस पडत आहे. अजुनही दररोज पाऊस सुरु आहे. यामुळे पाऊस उघडीप कधी देतो आणी कधी वापसा येतोय याकडे सध्या शेतकरी लक्ष देऊन आहे.

सध्या पिलीव परीसरात रोजच पाऊस येत असल्याने शेतकऱ्यांना पेरणीला वावच नाही. उन्हाळ्यात शेतकऱ्यांनी आपली जमीन नांगरुन म्हणजे मशागत करुन ठेवली आहे. आता पाऊस कधी एकदा उघडीप देतोय याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

पिलीव परीसरातील सुळेवाडी, बचेरी, शिंगोर्णी, काळमवाडी, कुसमोड, झिंजेवस्ती, चांदापुरी, साळमुखवाडी या सगळयाच गावात समाधान कारक पाऊस पडला. यातील झिंजेवस्ती, कुसमोड या भागातील शेतकऱ्यांनचा जास्त कल हा ऊस लागवडीकडे असतो तर सुळेवाडी, बचेरी शिंगोर्णी या दुष्काळी पटटयातील शेतकरी बाजरी, मका, तूर, कडवळ व इतर पिके घेणयाकडे या शेतकऱ्यांनचा कल असतो. हे सर्व शेतकरी पेरणीसाठी सज्ज आहेत पण पाऊस बंद होऊन वापसा कधी येतोय याकडे लक्ष लागले आहे. सध्या पिलीव बाजारपेठेत बि-बियाणे, खते भरपूर प्रमाणात उपलब्ध आहेत. वेळेत समाधान कारक पाऊस पडल्यामुळे यंदाचा खरीप हंगाम वेळेत व मोठा असेल यामध्ये पेरणीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. या पावसामुळे जमीनीतील पाणयाची पातळी वाढून विहीरीतील पाण्याच्या पातळीत चांगली वाढ झाली आहे. यामुळे आता पेरलेल्या खरीप हंगामातील पिकांना मुबलक प्रम ाणात पाणी उपलब्ध होईल तसेच आता कुठे पावसाळा सुरु झाला आहे. यामुळे संपूर्ण पावसाळ्यात थोडा थोडा जरी पाऊस पडला तरी खरीप हंगामातील पिकांना काहीही अडचण येणार नाही. यामुळे धान्यांबरोबरच, जनावरांच्या चाऱ्यांचाही प्रश्न मिटणार असून दुष्काळात होरपळलेल्या जनतेला या पावसाने चांगलाच दिलासा दिला.

---

# पांडुरंग आणि भगवंतांची झाली भेट

## मुक्ताईनगरहून पंढरपूरकडे निघालेला पालखी सोहळा मंदिरात विसावला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ मे-**



संत मुक्ताबाई अंतर्धान समाधी सोहळ्याचा कार्यक्रम संपवून मुक्ताईनगरहुन परतीच्या प्रवासासाठी पंढरपूरकडे निघालेल्या श्री पांडुरंगराय पालखी सोहळ्याचे भगवंत मंदिरात उत्साहात स्वागत करण्यात आले. भगवंताची भेट घेऊन पालखी सोहळा पुढे पंढरीकडे मार्गस्थ झाला.

क्षेत्र कोथळी मुक्ताईनगर येथील अंतर्धान समाधी सोहळा संपल्यानंतर परतीच्या प्रवासासाठी पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला होता. चिखली येथे पहिला मुक्काम व बीड येथे दुसरा मुक्काम झाल्यानंतर आज सकाळी पालखी सोहळा बीड, कुंथलगिरी फाटा, वाशी मार्गे दुपारी भगवंत मंदिरात दाखल झाला. या ठिकाणी माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले, भगवंत महोत्सव समितीचे अध्यक्ष सुभाष लोढा, ज्येष्ठ नेते विलास रेनके, धैर्यशील पाटील, अमोल आजबे, सरदार गव्हाणे, संतोष सूर्यवंशी, गणेश भोळे, शहाजी फुरडे-पाटील यांनी पालखी सोहळ्याचे स्वागत केले. मंदिरात पालखी आल्यानंतर मंदिर प्रदक्षिणा पूर्ण करुन पादुका भगवंताच्या गाभाऱ्यात नेण्यात आल्या या ठिकाणी भगवंताची पांडुरंगाची भेट झाल्यानंतर देवस्थान भगवंत देवस्थान समितीच्यावतीने पुजारी सुशांत बडवे यांनी देवास वस्त्र अर्पण केले. त्यानंतर मान्यवरांच्या उपस्थितीत आरती झाल्यानंतर पालखी सोहळा पंढरपूरकडे मार्गस्थ झाला. पालखी सोहळा प्रमुख सूर्यकांत भिसे यांचाही भगवंत देवस्थान समितीच्यावतीने सत्कार करण्यात आला.

---

# ‘स्वेरी’मध्ये जलतारा प्रकल्पाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ मे-**



स्वेरीमध्ये ‘विकसित गाव अभियान’ अंतर्गत ‘जलतारा प्रकल्प शुभारंभ’ व ‘सेंद्रिय रत्न पुरस्कार’ सोहळा नुकताच संपन्न झाला. यामध्ये ‘मिशन विकसित गाव अभियान अंतर्गत खेड्यांचा समृद्ध विकास या विषयावर सोलापूर जिल्हा (ग्रामीण) चे पोलीस अधीक्षक, अतुल कुलकर्णी यांनी उदघाटक म्हणून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक व जलताराचे जनक प्रा. डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले.

पंढरपूर तालुका पोलीस स्टेशनकडून स्वेरीमध्ये आयोजिलेल्या कृषी कार्यक्रमात सोलापूर व जवळपासच्या जिल्ह्यातील अनेक शेतकरी, पोलीस पाटील उपस्थित होते. प्रास्ताविक किसान संस्थापक व मिशन विकसित गाव अभियानचे जिल्हा समन्वयक व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी नानासाहेब कदम यांनी केले. स्वेरीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी स्वागत केले. जलतारा प्रकल्पचे जनक प्रा.डॉ. पुरुषोत्तम वायाळ यांनी जलतारा प्रकल्पाच्या माध्यम ातून एका पावसाळ्यात चार लाख लिटर पाणी जमिनीमध्ये कसे मुरवले जाते याचे स्वेरी कॅम्पसमध्ये वैज्ञानिक सादरीकरण केले व प्रत्यक्ष जलतारा प्रकल्प शुभारंभ केला. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी ‘मिशन विकसित गाव अभियान’ अंतर्गत जलसंधारण, वृक्षारोपण, गुन्हेगारी मुक्त गाव, शाश्वत कृषी व्यवस्था’ या संदर्भात उपस्थितांना अतिशय उपयुक्त मार्गदर्शन केले व सोलापूर जिल्ह्यातील पोलीस स्टेशन माध्यमातून हा मॉडल प्रकल्प १०० गावांमध्ये राबविण्याचे सुतोवाच केले. यावेळी चाळीसगावच्या फर्टीलायझर लॉक टेक्नॉलॉजीचे संशोधक शास्त्रज्ञ प्रकाश पवार यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा समन्वयक नानासाहेब कदम यांनी मिशनद्वारा एकरी शंभर टन ऊस उत्पादन, केळी, द्राक्ष, बेदाणा, डाळिंब, भाजीपाला क्लस्टर कशा पद्धतीने वर्षभर राबवू शकतो याबाबत मार्गदर्शन केले. तसेच राज्यस्तरीय कृषी संमेलन जून मध्ये घेणार असल्याची घोषणा केली. जलतारा प्रकल्पाच्या या कार्यक्रमासाठी शेषेगिरी राव, पंढरपूर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अर्जुन भोसले, पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर उपस्थित होते. डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

### या शेतकऱ्यांचा झाला सन्मान

अंध शेतकरी मालोजी चव्हाण (जामगाव, ता.माढा), स्वप्निल आसबे (अनवली), गणेश नवले (टेंभूर्णी), संजय साबळे (पंढरपूर), शुभम बागल (पंढरपूर), उमेश म हाराज देशमुख (बार्शी), अजिंक्य लोकरे (टेंभूर्णी), रवि भोसले (अनवली) व संतोष पवार (वैराग) या सोलापूर जिल्ह्यातील ‘सेंद्रिय शेती’ करणाऱ्या नऊ सेंद्रिय शेतकरी यांना ‘सेंद्रिय शेती रत्न पुरस्कार’ प्रदान करण्यात आले.

---

# पठाणवस्ती येथील पुलाचा अनेक वर्षांचा प्रश्न मिटला

### नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. २९ मे-**

माळशिरस तालुक्यातील पठाणवस्ती येथील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असणारा पुलाचा प्रश्न माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी मिटविला आहे. यामुळे पठाणवस्ती व लाडेवस्ती येथील नागरिकांनी पहील्याच पावसात ओढयाला पाणी आल्यानंतर येथील नागरिकांना सुखद धक्काच बसलाय.

दरवर्षी पावसाळ्यात ओढयाला पाणी आले की पठाणवस्ती गावातीलच लाडेवस्ती येथील नागरिकांना ये-जा करता येत नव्हती. ओढयाला पाणी आले की विद्यार्थ्यांना घरीच बसावे लागत होते, तसेच नागरिकांना सुद्धा ये-जा करता येत नव्हते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत होते तर नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत होता. याबाबत पठाणवस्ती येथील ग्रामस्थांनी अनेक वर्षापासून या पुलासाठी पाठपुरावा केला होता. पण कोणत्याही लोकप्रतिनिधी यांनी याची अजिबात दखलच घेतली नव्हती. यामुळे नागरिक कमालीचे नाराज होते तसेच लोकप्रतिनिधी वर नाराज होते.रात्री अपरात्री व इतर वेळी होणारा नाहक त्रास याची कैफीयत येथील नागरिकांनी आमदार रामभाऊ सातपुते यांच्या पुढे मांडली याची दखल माजी आमदार रामभाऊ सातपुते यांनी या पुलासाठी तब्बल ५० लाखांचा निधी मंजूर केला होता. मे महीन्याच्या सुरुवातीला या पुलाचे काम पूर्ण झाले. नुकत्याच जोरदार झालेल्या पावसामुळे येथील ओढयाला प्रचंड पाणी आले. पण गेल्या अनेक वर्षांपासूनचा त्रास यावेळी नागरिकांना झालाच नाही. कारण याठिकाणी या पावसाळया अगोदरच पुलाचे काम पूर्ण झाल्यामुळे नागरिकांनी या पुलावरुन ये-जा करणयाचा सुखद अनुभव घेतला. नागरिक माजी आमदार रामभाऊ सातपुते यांचे याबद्दल मनापासून आभार मानत आहेत.

यविषयी पठाणवस्ती येथील शाहीद शेख यांना विचारले असता गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असणारा पुलाचा प्रश्न माजी आ. रामभाऊ सातपुते यांनी सोडविला. नागरिक व विद्यार्थी यांना होणारा नाहक त्रास संपविला यामुळे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.



# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## एटीएसई प्रज्ञाशोध परीक्षेत राघव देशमुख राज्यात चौथा

**सोलापूर, दि. २९ मे-**
मार्च २०२५ मध्ये झालेल्या पुण्याच्या राज्यस्तरीय एटीएसई प्रज्ञाशोध परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बागलवस्ती-बारलोणी या शाळेतील विद्यार्थी राघव निलेश देशमुख याने १०० पैकी ९४ गुण मिळवून राज्यात चौथा क्रमांक मिळविला आहे. तसेच लातूरच्या श्रेया आयएएस परीक्षेत केंद्रात पहिला व राज्यात दहावा क्रमांक मिळविला आहे.



शाळेतील मयुरी बागल, आरव गोरे, शौर्य बागल, संकेत ढेरे या विद्यार्थ्यांनी प्रज्ञाशोध परीक्षेत यश संपादन केले. यशस्वी विद्यार्थ्यांचे गटशिक्षणाधिकारी विकास यादव, माजी विस्तार अधिकारी शोभा हंडे, केंद्रप्रमुख संजीवनी पौळ-उबाळे, माजी केंद्रप्रमुख सिमिंता कुंभार, माजी उपसभापती सुरेश बागल, मुख्याध्यापक निलेश देशमुख, सहशिक्षका सुजाता वाघ, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रभाकर बागल, संभाजी ब्रिगेडचे बारलोणी गटप्रमुख व सुरज डेअरी फार्मचे चेअरमन संदेश बागल, तडवळेचे सरपंच प्रतिनिधी चेअरमन विश्वनाथ परबत, लोकसेवा क्लिनिकचे डॉ. बालाजी शिंदे, आदित्य बिर्ला हॉस्पिटलचे डॉ. संग्राम परबत यांनी अभिनंदन केले.

## महत्वाचे...




### बार्शीचे सचिन वायकुळे यांचा महाराष्ट्र महागौरव पुरस्काराने सन्मान

**बार्शी, दि. २९ मे-**
वंचिततेच्याही पलीकडे असणारा तृतीयपंथी घटक व देहविक्रय करणाऱ्या महिलांसाठी दिलेल्या सामाजिक योगदानाबद्दल येथील सचिन वायकुळे यांना पुण्यात महागौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्राचे प्रमुख ओमप्रकाश शेटे व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते वायकुळे यांचा हा गौरव करण्यात आला. डिजीटल मीडिया पत्रकार संपादक संघटनेच्यावतीने हा गौरव करण्यात आला. संघटनेचे संस्थापक राजा माने यावेळी उपस्थित होते. तृतीयपंथी व देहविक्रय करणाऱ्या महिलांना आधार कार्ड, रेशन कार्ड, मतदान ओळखपत्र, घरकुल योजनेचा लाभ मिळवून देणे तृतीयपंथी यांना सामाजिक प्रतिष्ठा मिळवून देणे आदींसाठी यासाठी वायकुळे यांनी मोठे योगदान दिले आहे. तृतीय पंथी समुदायाच्या आरोग्य समस्या सोडवण्यासाठी आपण तत्पर असून यासाठी मुंबईत बैठक घेणार असल्याचे आयुष्मान भारतचे शेटे म्हणले.



### संजय क्षिरसागर यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार

**माढा, दि. २९ मे-**
वाकाव व धानोरे (ता. माढा) येथील वृक्षमित्र ग्रामपंचायत अधिकारी संजय तुकाराम क्षिरसागर यांना महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास खात्याचा राज्यस्तरीय आदर्श ग्रामपंचायत अधिकारी पुरस्कार मुंबई येथे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत व ग्रामविकासमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी ग्रामविकास राज्यमंत्री योगेश कदम उपस्थित होते. त्यांनी वडाचीवाडी (अंजनगाव ऊमाटे) शासकीय जागेत वृक्षलागवड करून संरक्षण व संगोपन करत ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली. वाकाव, बुद्रुकवाडी, धानोरे येथे ऑक्सिजन पार्कची निर्मिती केली. स्मशानभूमी मध्ये वृक्षारोपण करून स्मशानभूमीचा कायापालट केला. जन्म-मृत्यू, विवाह नोंदणीसाठी कमीतकमी दोन वृक्षांची लागवड बंधनकारक कण्याचा ठराव करून अंमलबजावणी केली.याबद्दल आमदार अभिजीत पाटील, माजी आमदार बबनराव शिंदे, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. शिवाजीराव सावंत, जिल्हा दूध अध्यक्ष रणजितसिंह शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील, गटविकास अधिकारी महेश सुळे, भैरवनाथ शुगरचे कार्यकारी संचालक पृथ्वीराज सावंत, सरपंच ऋतुराज सावंत, सरपंच छाया दावणे, माजी सरपंच अनिल देशमुख, सरपंच रमेश भोईटे, सरपंच पुजा माने, शरद भुजबळ, नारायण ढवळे, आनंद शेंडे, सिध्देश्वर माळी, गोरख नरसाळे यांनी अभिनंदन केले.

### माणगंगा भ्रमणसेवा संस्थेच्यावतीने वृक्षारोपण व संवर्धन खुल्या स्पर्धा

**सांगोला, दि. २९ मे-**
माणगंगा भ्रमणसेवा संस्थेच्यावतीने सांगोला तालुक्यातील माण नदीकाठावर वृक्षारोपण करुन वर्षभर त्या वृक्षांचे उत्कृष्ट संवर्धन करणाऱ्या वैयक्तिक, संस्था, ग्रामपंचायत, माध्यमिक शाळा, महाविद्यालय यांच्यासाठी खुल्या स्पर्धा आयोजित केल्या असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष वैजिनाथ घोंगडे यांनी दिली. सांगोला तालुक्यातील माणगंगा नदी काठावर पर्यावरण पूरक वड, पिंपळ, चिंच, कडूलिंब, जांभळ, उंबर, करंज, देशी बाभळ, पळस यापैकी विविध प्रकारच्या दहा वृक्षांची लागवड करून वर्षभर उत्कृष्ट संवर्धन करणाऱ्या स्पर्धकांची निवड करून त्यांना प्रथम क्रमांक १० हजार, द्वितीय क्रमांक ७ हजार, तृतीय क्रमांक ३ हजार रुपये व प्रत्येक विजेत्यास सन्मान चिन्ह व गौरव पत्र मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार म्हणून देण्यात येणार आहे. पुरस्कारासाठी माणगंगा नदी पात्राचे तीन टप्पे केले असून प्रत्येक टप्प्यासाठी स्वतंत्र पुरस्कार देण्यात येणार आहेत. त्यामध्ये पहिला टप्पा खवासपूर ते अनकढाळ, दुसरा टप्पा वाटंबरे ते आलेगाव-बेले मळा व तिसरा टप्पा वाढेगांव ते मेथवडे याप्रमाणे राहणार आहे. माणनदीच्या काठावर वृक्ष लागवडीसाठी दोन फूट लांब, दोन फूट रुंद व दोन फूट खोल याप्रमाणे स्पर्धकांनी खड्डे काढावे. दोन खड्ड्यातील अंतर ७ मीटर ठेवावे. रोपे लागवडीची तयारी करून ज्या गावच्या ग्रामपंचायत हद्दीत वृक्षारोपण करणार आहे, त्या ग्रामपंचायतीकडे दि.३० जून पर्यंत प्रवेशपत्र भरून द्यावीत. ज्यांचे प्रवेश पत्र मुदतीत येईल अशा स्पर्धकांना संस्थेमार्फत विविध प्रकारची योग्य ती जास्तीत-जास्त १५ रोपे देण्यात येतील. परंतु स्पर्धेसाठी १० रोपे गृहित धरली जातील. पुरस्कारासाठी निवड करताना जीवंत रोपांची संख्या, रोपावरील टवटवी, रोपांची झालेली वाढ, वृक्ष लागवड परिसरातील स्वच्छता, वृक्ष लागवडीच्या ओळीतील व समोरच्या नदीपात्रातील उपद्रवी वनस्पतीचे निर्मूलन इत्यादी बाबी विचारात घेतल्या जातील अशी माहिती वैजिनाथ घोंगडे यांनी दिली.

### शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानावर मोफत बियाणे ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**पिलीव, दि. २९ मे-**
चालू खरीप हंगामात शेतकऱ्यांना तूर, मूग, उडीद, सोयाबीन, बाजरी व मका बियाणे शंभर टक्के अनुदानावर मोफत बियाणे शेतकऱ्यांना देणयात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी महाडिबीटी आनलाईन पोर्टलवर २९ मे पर्यत अर्ज करण्याचे आवाहन कृषी खात्याने केले आहे. जे शेतकरी २० आर ते एक हेक्टर क्षेत्र असणारे शेतकरी यासाठी अर्ज करु शकतात. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी पाच दिवसाच्या आत बियाणे नेणे आवश्यक आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन कृषी खात्याच्या वतीने करणयात आले आहे.

# एक जिल्हा एक नोंदणी मोहिमेची अंमलबजावणी करावी

## नक्शा उपक्रमातंर्गत पंढरपूर हा पायलट प्रोजेक्ट असून हा उपक्रम राज्यात लागू करणार

### महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ मे-**
सोलापूर जिल्ह्यातील नागरिकांना नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने जिल्ह्याच्या कोणत्याही भागातून एक जिल्हा एक नोंदणी मोहिमे अंतर्गत उपनिबंधक कार्यालयात नोंदणी करता येणार आहे. याच योजनेच्या अनुषंगाने पुढील काळात शासन संपूर्ण राज्यासाठी 'एक राज्य एक नोंदणी' हा उपक्रम सुरू करणार असल्याची माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

नियोजन समितीच्या सभागृह येथे आयोजित नोंदणी व मुद्रांक तसेच भूमी अभिलेख विभागाच्या जिल्हा आढावा बैठकीत महसूल मंत्री बावनकुळे मार्गदर्शन करत होते. यावेळी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आमदार समाधान आवताडे, देवेंद्र कोठे, उत्तम जानकर, रणजीत सिंह मोहिते पाटील, राजू खरे, अभिजीत




पाटील,बाबासाहेब देशमुख, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी, उपजिल्हाधिकारी महसूल संतोषकुमार देशमुख, सहजिल्हा निबंधक खोमणे, जिल्हा भूमी अभिलेख अधिक्षक सचिन भंवर उपस्थित होते.

एक जिल्हा एक नोंदणी अंतर्गत जिल्ह्याच्या कोणत्याही भागातून नागरिकांना आपल्या प्रॉपर्टीची नोंदणी करता येते. आत्तापर्यंत सोलापूर जिल्ह्यातील सहाशे दोन नागरिकांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. जास्तीत जास्त नागरिकांनी याउपक्रमात सहभागी व्हावे. तसेच मंत्रिमंडळाने पाचशे रुपयात शेतकऱ्यांचे जमीन वाटपाची नोंदणी करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्याचीही जिल्ह्यात योग्य अंमलबजावणी करावी. नोंदणी व मुद्रांक कार्यालयाकडे जिल्हाधिकारी यांनी लक्ष द्यावे. प्रत्येक महिन्यातून या कार्यालयाची एक बैठक घेऊन त्यांनी केलेल्या कामकाजाचा सविस्तर आढावा घ्यावा. या अंतर्गत नागरिकांना योग्य सुविधा उपलब्ध होतात का. याबाबत खात्री करावी अश्या सूचना महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

नोंदणी व मुद्रांक कार्यालयाने शासनाची भूमिका लक्षात घेऊन आपल्या कामात सुधारणा करावयात तसेच नागरिकांच्या दस्त नोंदणी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची गडबड होणार नाही याची काळजी घ्यावी. सर्वसामान्यांची अडवणूक होणार नाही या अनुषंगाने उपाययोजना करावयात असेही निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. प्रारंभीस जिल्हा निबंधक खोमणे यांनी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या वतीने जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दिली. राज्य मंत्रिमंडळाने नुकताच पोट हिस्सा मोजणीसाठी शेतकऱ्याकडून फक्त दोनशे रुपये घेण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने जिल्ह्यात त्याची प्रभावीपणे अंमलबजवणी करावी. सर्व मोजणी प्रकरणे तात्काळ निकाली काढावेत. आपल्या तालुकास्तरीय अधिकाऱ्यांनी संबंधित आमदार यांच्याशी संपर्क करून त्यांना विभागाच्या वतीने करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दर तीन महिन्याला द्यावी असेही महसूल मंत्री बावनकुळे यांनी सुचित केले. प्रारंभी जिल्हा भूमी अभिलेख अधिक्षक सचिन भंवर यांनी विभागाच्या वतीने सोलापूर जिल्ह्यात करण्यात येत असलेल्या कामकाजाची माहिती दिली. यामध्ये स्वामीत्व योजना अंतर्गत ड्रोनद्वारे ६४३ गावाची मोजणी पूर्ण करण्यात आल्याचे सांगितले. काही गावांचा विरोध होता परंतु समुपदेशन करून बहुतांश गावांचे ड्रोन फ्लाय पूर्ण झालेले आहे असे सांगून भूमी अभिलेख विभागाच्या वतीने पारदर्शकपणे कारभार करून लोकाभिमुख प्रशासन देण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्यात येतील असे सांगितले.

### गावठाणाबाहेरील घरांची मोजणी करणार

केंद्र शासनाच्या स्वामीत्व योजना टप्पा एक अंतर्गत द्रोणद्वारे गावातील घराची मोजणी करण्यात येत आहे यातील बहुतांश काम पूर्ण झालेले असून प्रत्येक गावात गावठाणा बाहेर असलेल्या घरांची मोजणी करण्यासाठी राज्य शासनाच्या वतीने स्वामीत्व योजना टप्पा क्रमांक दोन सुरू करण्यात येणार आहे. तरी या अनुषंगाने भूमी अभिलेख विभागाने गावठाणा बाहेरील घरांची मोजणी करण्याच्या अनुषंगाने माहिती तयार ठेवावी, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. केंद्र शासनाच्या नक्शा उपक्रमांतर्गत राज्यातील दहा शहरांचा समावेश असून त्यापैकी पंढरपूर हे एक शहर आहे. भूमी अभिलेख विभागाने पंढरपूर नगरपालिकेच्या हद्दीतील सर्व घरांची ड्रोन द्वारे मोजणी करून प्रॉपर्टी कार्ड तयार करून ठेवावे. पंढरपूर येथील काम हे एक पायलट प्रोजेक्ट म्हणून करावे व हाच उपक्रम पुढे राज्यासाठी लागू करण्यात येईल, असेही बावनकुळे यांनी सांगितले. भूमी अभिलेख विभागाने अत्यंत पारदर्शकपणे काम करावे सर्वसामान्य नागरिकांच्या या विभागाविषयी खूप तक्रारी आहेत त्या तक्रारी येणार नाहीत या अनुषंगाने कार्यपद्धतीत बदल करावा असेही त्यांनी निर्देशित केले.

## संत नामदेव महाराज संजीवन समाधी सोहळा

### मुख्यमंत्री फडणवीस यांना कार्यक्रमाचे निमंत्रण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ मे-**
तीर्थक्षेत्र पंढरी नगरीत २३ आणि २४ जुलै रोजी साजर्या होत असलेल्या संत नामदेव महाराज व परिवाराच्या ६७५ व्या संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमाचे निमंत्रण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना अ.भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाच्या शिष्टमंडळाने दिले. दरम्यान या कार्यक्रमास आपण उपस्थित राहणार असल्याचे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले असल्याची माहिती एकसंघाचे प्रदेशाध्यक्ष तथा समस्त नामदेव शिंपी समाज पंढरपूरचे अध्यक्ष गणेश उंडाळे यांनी दिली.

अ. भा. संत नामदेव क्षत्रिय एकसंघाच्या शिष्टमंडळाने बुधवारी (ता.२८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबई येथे



सह्याद्री अतिथीगृहात भेट घेतली. यावेळी संत नामदेव महाराजांचे वंशंज हभप निवृत्ती महाराज नामदास, एकसंघाचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष ॲड. महेश ढवळे, एकसंघाचे राष्ट्रीय सचिव तथा केशवराज संस्थेचे प्रमुख रुपेश खांडके, उपाध्यक्ष धनंजय गोंदकर, प्रदेशाध्यक्ष गणेश उंडाळे, प्रभु सोनवणे, वैभव सदावर्ते उपस्थित होते. यावेळी पंढरीत भक्तीसागर येथे उभारण्यात येणार्या संत नामदेव महाराज राष्ट्रीय स्मारक तसेच ६७५ व्या संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमाबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली.

संत नामदेव महाराज स्मारकाचे काम लवकरात लवकर सुरु करण्याचे तसेच ६७५ व्या संजीवन समाधी सोहळा कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आश्वासन यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले असल्याचेही प्रदेशाध्यक्ष गणेश उंडाळे यांनी सांगितले.

### अपघातात मृत चालकाविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. २९ मे-**
चारचाकी वाहन दुभाजकाला धडकल्याने घडलेल्या अपघातात पादचारी जखमी झाल्याप्रकरणी मृत चालकाविरुद्ध जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. संतोष रमेश असे गुन्हा दाखल झालेल्या मृत चालकाचे नाव आहे. यातील फिर्यादी संतोष शितलसंगि (वय ४०, रा. मंगल हार्ट धूलपेठ, हैदराबाद, तेलंगणा) हे त्यांचे बंधू शैलेंद्रसिंग हे २७ मे रोजी रात्री पावणेआठच्या सुमारास सोलापूर - हैदराबाद रस्त्यने पायी निघाले होते. तेव्हा भरधाव चारचाकी वाहन (क्र. डब्ल्यू बी ०२ ए जे ८४५२) रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे दुभाजकाला धडकल्याने हा अपघात घडला. त्यात शैलेंद्रसिंग यास साधी दुखापत झाली. तर चालक संतोष रमेश हा जखमी झाल्याने मरण पावला. याबाबत जोडभावी पेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक येडे पुढील तपास करीत आहेत.

## पाच आधुनिक बसगाड्या सांगोला बसस्थानकात आज दाखल होणार

### शहाजीबापू पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. २९ मे-**
राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या आश्वासनानुसार पहिल्या टप्प्यातील ५ आधुनिक बीएस-६ श्रेणीतील बसगाड्या सांगोला बसस्थानकात दाखल होणार आहेत, अशी माहिती माजी आमदार शहाजीबापू पाटील यांनी दिली.



शहाजीबापू पाटील यांनी ना.प्रताप सरनाईक यांची भेट घेऊन सांगोला तालुक्यातील प्रवाशांच्या दैनंदिन अडचणी मांडत सांगोला बस स्थानकासाठी २० नव्या बसगाड्यांची मागणी केली होती. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत ना.प्रताप सरनाईक यांनी सहा महिन्यांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने बसगाड्या उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. त्या आश्वासनानुसार पहिल्या टप्प्यातील ५ आधुनिक बीएस-६ श्रेणीतील बसगाड्या आज सांगोला बस स्थानकात दाखल होणार आहेत. या बसगाड्या अशोक लेलँड कंपनीच्या असून, त्या अत्याधुनिक सुविधा असलेल्या आहेत. त्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुसज्ज आणि आरामदायक होणार आहे. विशेषतः विद्यार्थ्यांना, नोकरदारांना आणि महिला प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे.

## तत्वनिष्ठ व्यक्तीमत्व : कै. सौ. रुपालीताई इंगळे

नश्वर मानवी जीवन इतरांच्या कल्याणार्थ कार्यासाठी व्यतीत करण्यातच आपल्या जीवनाचे सार्थक आहे याचे सार्थ उदाहरण म्हणजे येथील श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन तथा मा.नगराध्यक्ष / नगरसेवक महेश इंगळे यांच्या सुविद्य पत्नी सौभाग्यवती कै. रूपालीताई इंगळे (वहिनीसाहेब) यांनी व्यतीत केलेले जीवन कार्य होय. कै.सौ.रूपालीताई इंगळे यांना बालवयातील शालेय जीवनापासून शिक्षणासोबतच इतरांना मदत करणे, निराधार गोरगरीबांना मायेचा घास भरविणे.

आपल्या मित्र-मैत्रिणींसोबत आसपासच्या गरजूंना संकटकाळात आवश्यक ते मदत करून त्यांना मानसिक धीर देणे, प्राणीमात्रांवर दया मायेचा वरदहस्त ठेवून माणुसकीची वागणूक देणे इत्यादी छंद जोपासून जीवनाची सुरुवात केली होती. हे करताना जीवनात आपल्या कार्याप्रती तत्व व निष्ठा असली पाहिजे असे ते नेहमी सांगत असत. आपले शिक्षण पुर्ण झाल्यानंतर त्या पुढील जीवनातही त्यांनी आपल्या तत्वांना नेहमीच प्राधान्य दिले. तुमच्या पवित्र स्मृतीची ज्योत देवते अखंड आमच्या मनी, तुमच्या कर्तुत्वाचा सुगंध दरवळतो आमच्या जीवनी. या त्यांच्या जीवनशैलीवरील काव्यरचनेप्रमाणे आम्हाला आयुष्यभर येणाऱ्या त्यांच्या आठवणींना कुठलीच तोड नाही. काहीजण जीवन मार्गातून कधीच जाऊ नये असे



**प्रथम पुण्यस्मरण दिन विशेष**

काही व्यक्तीमत्व असतात, त्यापैकीच त्या काळी सर्वांना हवे हवेसे वाटणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे कै.सौ. रूपालीताई इंगळे. त्यांच्या स्मृती ताज्या झाल्या की नेहमीच वाटते कै.सौ.रुपालीताई ह्या धार्मिक मनोवृत्तीच्या होत्या. त्या भक्ती मार्गातील एक महान पूजक होत्या. त्या नेहमी भारतीय संस्कृतीतील देव देवतांची पूजा, विधी, उपवास, नामस्मरण करीत असत. भगवान गणेश, मारुती, महादेव, खंडोबा, सौंदत्ती यल्लमा देवी, येथील श्री स्वामी समर्थ महाराज, पंढरीचे पांडुरंग अशा अनेक विविध देवदेवतांचे त्या भक्त होत्या. याशिवाय त्या अनेक धार्मिक गुरुजनांची तन-मन-धनाने सेवा करीत असत. विविध सण उत्सवाच्या प्रसंगी स्वामीजींना, गुरुजनांना घरी बोलावून विधिवत पूजा करून भक्तिमय वातावरणात परिवारासह इतरांनाही भक्तीमय आनंद देण्याचा त्यांचा हा सुस्वभाव होता. त्या स्वत: उच्च विद्याविभूषित होत्या, म्हणून त्यासोबत त्यांचे चिरंजीव प्रथमेश महेश इंगळे यांनाही त्यांनी बालवयापासूनच सुसंस्काराचे धडे दिले. त्यांच्या सर्वांगीण विकासाचे ध्येय समोर ठेवून त्यांना चांगले व आदर्श शिक्षण दिले. चि.प्रथमेश यांना शांत, संयमी त्याचबरोबर जबाबदारीची शिकवण दिली. त्यांना जीवन महात्म्याची जाणीव घडवून देवून मानसिक व शारीरिक दृष्ट्या बलवान बनवीत आदर्श माता ठरल्या. घर एक मंदिर आहे असे मानून जगातील सर्वाधिक सुख आणि समाधान आपल्या घरात नांदतो याचा कधीही हेवा न बाळगता आपल्या समाधानी वृत्तीनेच त्यांनी आपले सासू-सासरे, पती, मुलगा, पाहुणे, नातेवाईक, सासर माहेर व मित्रमंडळी यांच्याकडील आप्तेष्ट व अन्य आप्तेष्टांना सन्मानाची सेवापूर्वक वागणूक देऊन सर्वांच्या आनंदातच आपले आनंद मानत त्यांनी जगलेले जीवन म्हणजे महापुण्यकार्य आहे असे नेहमीच वाटते. धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक व सहकार क्षेत्रात कार्यरत असलेले येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे चेअरमन व कै.सौ.रुपालीताई इंगळे यांचे यजमान महेश कल्याणराव इंगळे यांना त्यांच्या सर्वांगीण कार्यात खंबीरपणे पाठीशी उभे राहून कुटुंबाच्या जबाबदारीतूनही अनमोल सहकार्य केले. त्यांना त्यांच्या श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान येथील इंगळे कुटुंबीयांच्या पिढीजात स्वामी सेवेसह त्यांना विविध क्षेत्रात कार्य करण्यास बहुमूल्य वेळ देऊन आपले पती परमेश्वर या भावनेने महेश इंगळे यांना नेहमीच मानसिक पाठबळ दिले. निसर्ग ही देवाने आपल्याला दिलेली सर्वात मौल्यवान देणगी आहे. ज्या निसर्गाकडून मानवी गरजा पूर्ण होत असतात, त्या निसर्गाकडे कै.सौ.रुपालीताई इंगळे यांनी निसर्गाचे ऋणी आपले हे जीवन या उद्देशाने पाहीले. त्यांच्या हसापूर येथील शेतमळ्यात विविध जातीचे झाडे व फळझाडे लावून त्या वृक्षांचे संवर्धन करून जतन केले, त्यामुळे जणू त्यांना निसर्ग संवर्धन दूत असेही म्हटले तरी त्यांच्याप्रती ही बिरुदावली यथायोग्य आहे. पशु, पक्षी, प्राणी यावर त्यांची नितांत श्रद्धा व आस्था होती. शेतमळ्यात पाखरांकरिता योग्य असे खाद्य आहाराचे नियोजन करणे, गाय, बैल यांच्याकरिता उन्हाळा, पावसाळा, हिवाळा या तिन्ही ऋतूमध्ये योग्य अशा आहाराची व्यवस्था करून प्राणीमात्रांचे उत्तम पालन पोषण करून त्यांची सेवा करीत असत. आपल्या घरात व शेतात काम करणाऱ्या महिला व पुरुषांना तसेच श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान व देवस्थानशी निगडित असलेल्या सर्व कर्मचारी व सेवेकऱ्यांना बंधू भगिनींची वागणूक देत आपल्याच परिवारातील आहेत असे समजून त्यांना योग्य वेळी अडीअडचणीच्या काळात धनदौलत, विविध साहित्य, गरजे प्रसंगी अन्नधान्य इत्यादी मदत करीत असत. परिसरातील नागरिकांच्या वैद्यकीय गरजा लक्षात घेत त्यांना वेळोवेळी औषधोपचार पुरविणे, वैद्यकीय, आरोग्यविषयक कामासाठी आर्थिक मदत करणे इत्यादी सेवाभावातून त्यांच्यातला आनंद पाहत असत. त्यांच्या निष्ठा-तत्त्व या पुढील पिढीसाठी नेहमीच आदर्शवादी राहतील. शरीराने आज जरी त्या आमच्यात नसल्या तरी आपल्या विचारांनी व तत्वनिष्ठ धोरणात्मक जगलेल्या जीवनशैलीमुळे त्या आमच्या सदैव सोबतच आहेत. आपल्या स्मृती सदैव अजरामर राहतील.

**।। तुमचं अस्तित्व म्हणजे आम्हांस मार्गदर्शन होतं ।। ते आमच्या आयुष्यातील एक सुंदर पर्व होतं ।। आज सर्व काही असल्याची जाणीव आहे।। पण तुमचं नसणं हीच मोठी उणीव आहे ।।**

आपल्या पवित्र आत्म्यास शांती लाभो हीच आपल्या प्रथम पुण्यस्मरण दिनानिमीत्तश्री स्वामी समर्थांच्या चरणी प्रार्थना व आपल्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण आदरांजली.

**शब्दांकन -**
**प्रा. शरणप्पा उर्फ शिवशरण अचलेर**
**श्रीशैल चंद्रकांत गवंडी,**
**अक्कलकोट**